म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. ७०५६
REFBK-0016977
REFBK-0016977

# आहुती

कवी

पं. वि. हुलके एम्. ए.; बी. टी.

( आदर्श शिक्षक म्हणून राष्ट्रपती–पुरस्कार विजेते, १९६५ )

REFBK-0016977

सेवा प्रकाशन

अमरावती

मूल्य — साडेतीन

सेवा प्रकाशन : क्रमांक २३

कवी : पं. वि. हुलके

प्रथमावृत्ती : १५ जानेवारी १९६८

सर्व हक्क : सुरक्षित

प्रकाशिका : सौ. सिंधू मांडवकर
सेवा प्रकाशन
अमरावती - २ (महाराष्ट्र)

मुद्रक : व. म. गुप्ते
व्यवस्थापक : वि. गो. जोशी,
सुभाष मुद्रणालय,
तपोवन - अमरावती.

साडेतीन रुपये

# अर्पण–

( वृत्त-पृथ्वी )

तुझ्या, शकुन–जन्मदे !
        करुण आहुतीची स्मृती
सगद्गद करी, सदैव
        नयनी जले साचती
जिच्यास्तव, सचेत
        भग्न मनि भावना नाचती
प्रिये ! निज समर्पितो
        विकृत ही तिला 'आहुती'

– पंढरीनाथ हुलके

# प्रस्तावना

लेखक: पां. श्रा. गोरे

☆ ☆ ☆

उभ्या हयातीत आणि आजतागायत ज्यांना जवळून वा दुरून प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहण्याचा मला कधीच सुयोग लाभला नाही, ज्यांची तोंड-ओळख देखील नाही, त्या अपरिचित सत्कवीच्या काव्याचे परीक्षण आणि समीक्षण करण्याचा माझ्यावर आज जो हा अचानक प्रसंग उद्‌भवला, तो माझ्या दृष्टीने अगदीच विलक्षण योगायोग नव्हे काय ? असे असताही या 'आहुती' काव्यसंग्रहाचे जनक श्री. पं. वि. हुलके यांनी आपल्या प्रास्ताविक निवेदनात 'विदर्भाचे आद्य जानपदकवी' म्हणून माझा जो गौरव-पूर्वक उल्लेख केला, त्या गौरवास देखील खरोखर मी कितपत पात्र आहे हा एक प्रश्न आहे ! कारण लौकिकदृष्टचा जरी मी नाममात्र कवी असलो, तरी संतश्रेष्ठ तुकाराम महाराज यांच्या शब्दांत सांगावयाचे झाल्यास '**घरोघरी झाले कवी, नेणे प्रसादाची चवी**' या खास मालिकेत आणि तीही अगदी शेवटच्या रांगेत उभा राहणारा मी केवळ बिंदुस्रावी कवी ! तेव्हा कवी म्हणून माझी काय थोरवी आहे हे अगदीच स्पष्ट आहे ! उलट श्री. हुलके हे उच्च पदवीविभूषित सुसंस्कृत कवी आणि शिवाय राष्ट्रपतिपारितोषिक मिळविणारे एक थोर आदर्श शिक्षक-म्हणून गाजलेली त्यांची थोरवी ! अशा सत्कवीच्या काव्यास, ज्याचे शिक्षण केवळ प्रवेश परीक्षेच्या आतच घोटाळलेले, अशा माझ्यासारख्या

अल्पशिक्षित सामान्य व्यक्तीने प्रस्तावना लिहिण्याचा हिय्या करावा, म्हणजे लहान तोंडी मोठा घास घेण्याचेच हे एकप्रकारचे धाडस नव्हे काय ? पण यात माझा तिळमात्र दोष नाही. कारण हा घास मी स्वखुशीने घेतला नाही वा तो घेण्याचा कोणताही अट्टाहास केला नाही; तर माझे जवळचे आणि जिव्हाळ्याचे तरुण कविमित्र प्रा. भाऊ मांडवकर यांनी माझ्या मुखी तो हट्टाने पण प्रेमळपणाने भरविला आहे. तेव्हा त्यांच्या प्रेमळ हट्टास मान झुकविणे मलाही भाग पडले. मात्र यात मान मिळविण्याचा माझा कोणताही उद्देश नाही. स्त्रीहट्ट, बालहट्ट आणि राजहट्ट यांची मातब्बरी मोठमोठ्या कवींनी आपआपल्यापरी वर्णन केली आहे. पण मला वाटते या सर्वांपेक्षा मित्रहट्ट हा अत्यंत प्रबळ आहे. तसे नसते तर रोमच्या सम्राटाने– ज्यूलियस सीझरने " God save me from my friends." "परमेश्वरा मला माझ्या मित्रांपासून वाचव" असे अगतिकपणाचे दीनवाणे उद्‌गार काढले नसते. लाक्षणिक अर्थाची ही नागमोडी भाषा सोडून सरळ वाच्यार्थाने सांगावयाचे झाल्यास काही दिवसांपूर्वी प्रिय भाऊ मांडवकर यांची यवतमाळ येथे भेट झाली असता त्यांनी श्री. हुलके यांच्या काव्यसंग्रहास प्रस्तावना लिहिण्याचा मला प्रेमळ आग्रह केला. पण त्यावेळी मी त्यांना त्या बाबतीत नकारात्मक उत्तर दिले. कारण माझी पायरी काय आहे हे मी त्यांच्या नजरेस आणले. पण भाऊंनी ते मनात न घेता श्री. हुलके यांच्या कवितेची छापील पाने माझ्याकडे पाठवून प्रस्तावना लिहावयास मला अगदी आर्जवून लिहिले. तेव्हा माझ्या या प्रिय मित्राच्या मनाचा केवळ हिरमोड न व्हावा म्हणून आणि तितकीच महत्वाची दुसरी गोष्ट म्हणजे श्री. हुलके यांची कविता-कामिनी ही सुस्वरूप, देखणी असल्यामुळे आणि पाहताक्षणीच तिने माझ्या मनाला मोहिनी पाडल्यामुळे मी तिचे गुणवर्णन करण्यासाठी ही लेखणी हातात घेतली. अर्थात माझी ही प्रस्तावना म्हणजे कवीच्या काव्याचे पर्यालोचन नसून शुद्ध गुणवर्णन आहे. माझी ही प्रांजळ भूमिका स्पष्ट करण्यासाठीच एवढा प्रपंच मला करावा लागला. तेव्हा ती

विचारात घेऊन उदार रसिकांनी माझ्याकडे सहृदयतेनेच पाहावे एवढीच त्यांना माझी विनम्र विनंती आहे

श्री. हुलके यांच्या या समग्र काव्यसंग्रहावर वरवर जरी नजर फिरविली तरी त्यांच्या प्रसन्न आणि अभिजात काव्यप्रतिभेचे विविध विलास त्यात सहजपणे दृष्टोत्पत्तीस येतात. विषयांची विविधता, नादमधुर वाणीची प्रसन्नता, उदात्त कल्पनेची चारुता आणि प्रगल्भ विचारांची मौलिकता या काव्यगुणांनी त्यांची कविताकामिनी ही मंडित असल्यामुळे थोर पंडितांनाही भूल पाडण्याचे तिच्यात एकप्रकारचे सामर्थ्य आहे. तसेच त्यांनी गणवृत्त, मात्रावृत्त आणि अक्षरछंद या तिन्ही काव्यरचनाप्रकारांचा सहज आणि यशस्वीरीत्या परामर्ष घेतला आहे आणि रेखीव रचनेच्या बाबतीत तर काही ठिकाणी त्यांनी परमोत्कर्ष साधला आहे हे त्यांचे विशेष वैशिष्टय होय. अर्थात ते त्यांनी आपल्या कुशल लेखणीने खुमासदार पद्धतीत व्यक्त केल्यामुळे त्यांच्या कवितेस वेगळे आणि आगळे पण सोज्वळ स्वरूप प्राप्त झाले आहे. त्यांच्या या सुंदर कवितेस उपमाच द्यावयाची झाल्यास बाळबोध वळणाची पण स्वाभिमानी वृत्तीची, डोक्यावर पदर आणि खाली नजर करून चालणारी, अंगावर निवडक अलंकारांचा साज धारण करून घराचा बोज राखणारी घरंदाज विनयवती युवतीचीच द्यावी लागेल. या तिच्या वर्णनात अतिशयोक्ती नसून खरी वस्तुस्थिती आहे. प्रस्तुत काव्यसंग्रहांत केवळ विषयाच्या वैशिष्टयांकडे पाहिले तर त्यांत भक्तिगीते, राष्ट्रगीते, बालगीते, किसानगीते इत्यादी विषयांचा समावेश केल्याचे आढळून येईल. केवळ भक्तिगीतांचाच विचार केला तर भोगलालसेने विटलेल्या कवीच्या मनाचा त्यांत आविष्कार आहे. नकली जीवनाचा एकप्रकारचा वीट आल्याचे दिसते आणि त्यामुळे या कवीपंढरीनाथाचे पंढरीच्या पांडुरंगाच्या पायाकडे मन आपोआप नीट ओढ घेते. पण ही त्यांनी आपल्या जीवनात जी शरण्यवृत्ती धारण केली आहे, तिचे मूळ मात्र अगतिक असल्याचे स्पष्ट दिसून येते. त्यांच्या या साऱ्या

आराध्यदेवतांत कृष्णाला त्यांनी अग्रमान बहाल केला आहे, पण त्या बरोबरच सरस्वती वा पांडुरंग यांनाही त्यांच्या प्रेमळ अंतरंगात मानाचे स्थान आहे. थोडक्यात सांगावयाचे झाल्यास 'सर्वदेव नमस्कारः । केशवं प्रतिगच्छति ' अशी त्यांची श्रद्धा आहे.

आयुष्यात जीवनाचे यथार्थ दर्शन घेत असताना मंगल मानवतेला लागलेली कीड त्यांना पदोपदी जाणवली आणि म्हणून त्वेषाच्या भरात "**अहा मानवा! तुझी क्रूरता मात करी पशुतेवरती** " या जळजळीत शब्दांत मानवासंबंधी, नव्हे रक्तावर टपलेल्या त्या गोचीडासंबंधी त्यांनी आपली तीव्र चीड व्यक्त केली आहे. पण मला वाटते ' **नरेचि केला हीन किती तर**" या कविवर्य केशवसुतांच्या सुप्रसिद्ध काव्यपंक्तीची तीवर छाप पडलेली असावी आणि ते असंभवनीय नाही. पण यात अनुचित असे काही नसून त्यामुळे कवीला मुळीच उणेपणा येत नाही. अनुभव-जन्य जीवनदर्शनाने केवळ जीवनावरचीच नव्हे, तर प्रत्यक्ष जगन्नियं-त्यावरची देखील कवीची निष्ठा हळूहळू ढळू लागली आणि ती इतकी की 'माणुसकीचे धूड सडू दे ' असे म्हणण्यापर्यंत तिची मजल गेली आहे. एवढेच नव्हे तर ' वाढू दे पाखंड भयंकर — आम्हीच देऊ त्याशी टक्कर— तू पण देवा येथुन लवकर — आवर निज व्यापार ' म्हणून आपला गाशा गुंडाळण्याबद्दल कवी परमेश्वरालाही एकदम दम देऊ लागतात. कारण जगातील मानवतेचा उद्धार हा केवळ मानवच करील; तिथे देव वा दानव यांनी अवतार घ्यावयास नको वा संचार करावयास नको; आणि म्हणूनच ते मानवास स्पष्टपणे सांगतात — ' हो मानवा मानव भला. ' परमेश्वराशिवाय हे जग व्यवस्थित चालविण्याची रग मानवाच्या मनात आणि मनगटात आहे असा त्यांचा ठाम आत्मविश्वास आहे. यावरून स्वावलंबनावर कवीचा भर असल्याचे दिसून यते. अर्थात ते योग्यच आहे. समर्थ रामदासांनी देखील '**जो दुसऱ्यावरी विश्वासला। त्याचा कार्य-भाग बुडाला** ' पण ' **जो स्वयेचि कष्टत गेला तोचि भला रे भला** ' असा स्पष्ट इषारा दिला आहे. यात परावलंबनाचा तिटकाराच दिसून येत नाही काय ? आणि म्हणूनच कवी हे मानवाला भला होण्याचा

त्याच्याच हिताचा, स्वावलंबनाचा सल्ला देतात, यात गैर ते काय आहे ?

सांप्रत या जगात संकुचितपणाचा घातक आजार उद्भवला आणि स्वार्थाचा बेसुमार बाजार माजला. त्यामुळे साहजिकच जगाच्या प्रगतीचे दार बंद झाले आहे. ते सताड उघडे करण्याच्या आड येणाऱ्या आडदांड शासकास ते चक्क बजावतात– **"थांब शासका तिथेच, वरती एक पायरी चढू नको–चढू पाहशिल–पडशिल उलटा, फंदामधि या पडू नको** " तसेच माणुसकीचा मुर्दा पाडणाऱ्या मदांध शासनालाही ते सणसणीत शब्दांत सुनावतात की, " जनतेच्या स्वातंत्र्यास लगाम लावण्याचे आपले काम इतःपर बंद कर. तसे न केल्यास तुझी पाशवी हराम सत्ता कोलमडून क्षणात 'राम' म्हणेल. " या आणि यासारख्या राष्ट्रगीतांत आवेश आणि त्वेष आहे, तसेच जुलमी सत्तेविषयी कवीचा जळजळीत द्वेष असल्याचे स्पष्टत्वाने दिसून येते. 'अधोगती' आणि 'खरे वर्म जाणे तुका' इत्यादी कवितांतही हाच सत्यवादी सूर दिसून येतो. पण 'खरे वर्म जाणे तुका' या कवितेचे स्वरूप मात्र काहीसे भिन्न आहे. ती रोचक पण बोचक असून शिवाय मार्मिक आहे आणि त्यामुळेच तिचे वैशिष्टय हे वेगळे खुलून दिसते.

सैतानी रझाकारांनी निजामाच्या राजवटीत माजविलेल्या बंडाचा बीमोड करून हैद्राबाद आझाद आणि आबाद करण्याचे गोड वर्णन कवीने 'विजयपताका' या आपल्या कवितेत केले आहे. पण त्यातही कवीने शासकास सावधगिरीचा सल्ला दिला आहे. तो समर्पक आणि समुचित नाही असे कोण म्हणेल ? या साऱ्या कवितांवरून कवीचा दृष्टिकोण हा निराशावादी नसून आशावादी आहे. पण विजयकाल हा प्रमादकालही असू शकतो याचीही समयोचित सूचना द्यावयास कवी विसरत नाहीत. ज्यांचा पूर्वकाल दिव्य त्यांचे भवितव्यदेखील निश्चित उज्वल आहे असा कवीचा आत्मविश्वास आहे आणि याबद्दल कुणाचे दुमत असण्याचे कारण नाही.

आजची कविता ही केवळ बिंदुस्रावी असल्यामुळे ती जनमनाची पकड घेण्याइतपत प्रभावी ठरू शकत नाही अशी अनेकांनी टीका केली आहे. पण कवीने या संग्रहात 'बुध्दकृपा' 'शकुंतला' 'आहुती' ही दीर्घकाव्ये लिहून ती टीका अन्वर्थक नसून कशी निरर्थक आहे हे दाखवून दिले आहे. 'बुध्दकृपा'मधील कथा आणि व्यथा सर्व-परिचित आहे. पण कवीने तिला थोडा नवा साज चढविल्यामुळे ती आपल्या वैशिष्टयामुळे गाजेल असा मला विश्वास आहे. मरणावाचून एकही गेह या जगतीतलावर नाही हा संदेह फिटल्यानंतर शेवटी प्रस्तुत काव्यातील मुलाची माता बुद्धास शरण जाते आणि म्हणते, **'प्रभो हरावा संभ्रम, एक न मरणाविन गेह–'** आणि म्हणून **'द्या मज-ही प्रभु मरण.'**कारण **'वृथा हा बाळाविन देह.'** प्रस्तुत कवितेत नाविन्य असल्यामुळे तिचे स्वरूप अनन्य ठरेल. तसेच या संग्रहातील 'शकुंतला' हे दीर्घकाव्य अतीव करुणरम्य असून मनाला चटका लावण्याइतपत हृदयंगम आहे. प्रस्तुत काव्यातील रचनादेखील नितांत रेखीव असून त्यात नादमाधुर्याची गोड भर पडल्यामुळे त्याला एकप्रकारची अवीट गोडी आली आहे. शकुंतला ही कण्वाचा निरोप घेताना त्या महत्पद ताताच्या पदांवर जेव्हा आपला माथा वाकविते त्यावेळी तिच्या त्या-वेळच्या सौंदर्याचे कवीने केलेले वर्णन रुचिर कल्पनेच्या आणि गोड नादमाधुर्याच्या दृष्टीने अगदीच अप्रतिम आहे. खालील नादमधुर काव्यपंक्ती माझ्या या विधानाची प्रत्यक्ष साक्ष पटवितील--

**उषःप्रभा जणु मूर्त शुभांगी चंपक रंगाची।**
**तारांकित कनकावर अंबर रंगतरंगाची**
**छटा जयावर असे लेउनी रत्नखचित लेणे**
**शोभविते सौंदर्य अलौकिक देवाचे देणे**

हे देवाचे देणे लाभलेली शकुंतला ही सर्वांच्या जिव्हाळयाचा विषय बनावा अशा रीतीने कवीने तिला आपल्यापुढे उभी केली

आहे. या कवितेचे स्वरूप भव्योदात्त नसेल, पण चोखंदळ रसिकांचे चित्त वेधून घेण्याचे मात्र तिच्यात भरपूर बळ आहे, यात मात्र संशय नाही. काव्याच्या शेवटी शेवटी तर 'नसे पित्याची, नसे पतीची शकुंतला आता । वनी निघाली जिकडे दिसली वाट पुढे जाता' आणि त्यानंतर 'अघटित घटना परमेशाची जाणावी कोणी । वणवण फिरते दुष्यंताची शकुंतला राणी ।' या हृदयभेदक ओळींत अंतःकरणाला स्पर्शून जाण्याचे निःसंशय सामर्थ्य नाही असे कोण म्हणेल? आणि याला कारण काय तर दुर्वासऋषीचा शाप ! आणि तोच तिला हा ताप भोगावयास कारण झाला !

श्री. हुलके यांचे 'आहुती' हे दीर्घकाव्य मात्र वरील दोन्ही काव्यांपेक्षा अगदीच निराळे असून त्यात एक प्रकारचा नितांत जोष रसरसलेला आहे. या काव्याची रचनादेखील नितांत रेखीव असून त्यातील भाषा ही ओजस्वी आणि ठाशीव आहे. त्यांतील काही ओळी तर सुभाषितवजा आहेत. केवळ कर्तव्यासाठी चुडादान करणाऱ्या आणि स्त्रीजातीचा अभिमान बाळगणाऱ्या एका कटिरमणीच्या बलिदानाची ही अत्यंत हृदयस्पर्शी कहाणी आहे. नवपरिणिता कांतेच्या मोहाने थिजलेल्या वीरपतीचा बाणा पूर्ववत ताजातवाना करण्यासाठी स्वतःच्या रक्ताने तिने तलवारीची धार प्रखर केली आणि ती तेजाची तलवार त्या वीरांगनेने रणांगणावर आपल्या पतीला यशस्वी होण्याकरिता पाठविली. हेतू हाच की त्याने तिचा स्वीकार करून तिच्या बळावर विजय संपादावा आणि राष्ट्राचा अभिमान रक्षावा. पतीला शेवटचा संदेश देणाऱ्या या वीरांगनेच्या प्रत्येक शब्दात आवेश आणि त्वेष आहे. या 'आहुती' काव्याच्या वाचनाने ज्याच्या डोळ्यांच्या कडा ओल्या होणार नाहीत असा मनुष्य विरळा ! निर्जीव दगडालाही पाझर फोडण्याचे प्रस्तुत काव्यात हुकमी सामर्थ्य आहे. अशा सामर्थ्याच्या कविता केवळ दुर्मिळ असतात आणि म्हणून अशाच साहित्याचा समाजावर झालेला परिणाम हा अटळ असतो. या दृष्टीने या काव्यसंग्रहातील 'आहुती' हे काव्य कौस्तुभमणी ठरेल.

खऱ्या मानवी जीवनाच्या अंतःकरणाचा ठाव हाच प्रस्तुत कवीच्या कवितेचा मूळ स्थायीभाव होय. प्रस्तुत कवी हे हाडाचे सच्चे शिक्षक आहेत. त्यांच्यातील जातिवंत शिक्षक जेव्हा याप्रमाणे खराखुरा जागृत होतो तेव्हा त्यांच्या त्या प्रभावी कवितेस विलक्षण तेज चढून त्याच्या त्या प्रकाशात, अंधारांत चाचपडणाऱ्या समाजाला आपला मार्ग दिसतो आणि म्हणूनच कवी हा समाजाचा मार्गदर्शक ठरतो. ही ओजस्वी कविता वाचताक्षणीच कुणालाही त्याचा प्रत्यय येईल.

प्रस्तुत काव्यसंग्रहात असलेल्या बालगीतात 'डुबडुब डुबडुब' या कवितेचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल. तिचा शेवट हा वात्सल्यपूर्ण असल्यामुळे तिला एकप्रकारची गोडी आली आहे. किसानगीतांत किसान-दादा, तांबडं फुटलं ही गीते रचनेच्या दृष्टीने ठाकठीक असून कल्प-नेच्या दृष्टीने देखील सरस साधली आहेत. पण त्यामध्ये वापरलेल्या भाषेमुळे कवीने एकप्रकारचा मात्र विरस निर्माण केला आहे. श्री हुलके हे वास्तविक विदर्भाचे नागरिक आणि मूळचेच त्यातील रहिवासी. महाराष्ट्रातील त्या कुणवाऊ भाषेशी त्यांचा तसा काहीही अर्थाअर्थी संबंध नाही. असे असताना त्यांनी त्या भाषेचा आणि तोही अकारण प्रस्तुत काव्यसंग्रहांत आणि किसानगीतात जाणूनबुजून वापर करावा याचे मला मात्र सखेदाश्चर्य वाटते. वऱ्हाडी वा नागपुरी भाषेत किसान-गीते निर्माण करण्याचे सामर्थ्य नाही असे का त्यांना म्हणावयाचे आहे? वास्तविक वऱ्हाडी भाषेतील सामर्थ्य हे मराठी साहित्याचे वैभव आहे. आणि ते वाचताना श्री. हुलके यांनादेखील वऱ्हाडी भाषेच्या सौंदर्याचा अनुभव आला असेल. असे असताना विदर्भाच्या खास शेतकऱ्यांच्या तोंडी महाराष्ट्रातील ती अवास्तव कुणबाऊ भाषा घालण्याचा त्यांचा काय हेतू असावा हे कळत नाही. किसानगीतांतील हा भाषादोष मी खास वऱ्हाडी असल्यामुळे मला मात्र एकदम खटकला.

श्री. हुलके यांच्या भक्तिगीतांत लीनताच नव्हे तर तल्लीनता आहे. राष्ट्रगीतांत आवेशच नाही तर ज्वलंत त्वेष आहे. श्रेष्ठांच्या पदार-

िंदी त्यांनी भक्तिपूर्ण वाहिलेल्या श्रद्धांजली—आदरांजलीत त्यांची विनम्र वृत्ती फुलली आहे. हृदयाला हलवून सोडणाऱ्या त्यांच्या हृदयस्पर्शी भावगीतांत त्यांनी भावनेचे कढ फोडल्यामुळे ती जनमनांची सहज पकड घेतात. तसेच चिंतनशीलता असलेल्या त्यांच्या काही वैचारिक कविता-देखील प्रभावी आहेत. दीर्घकाव्ये जरी या संग्रहात थोडी असली तरी त्यांनी या संग्रहाची गोडी वाढविली आहे आणि 'आहुती' दीर्घकाव्य तर या काव्यसंग्रहाचा केवळ प्राणच आहे. या काव्यसंग्रहाला आहुती हे अभिधान कवीने दिल्यामुळे त्याची शान वाढली आहे. प्रस्तुत संग्रहात त्यांनी आपल्या काही कवितांच्या आविष्कारात सामर्थ्याचा साक्षात्कार घडविला आहे आणि यातच कवींचे सारे आणि खरे यश आहे.

प्रस्तुत काव्याचे गुणवर्णन करताना त्यातील काही दोषांचेही दिग्द-र्शन करावे लागेल. क्वचित यतिभंग, ऱ्हस्वदीर्घांची ओढाताण, कुठेकुठे रसभंगामुळे खटकणारे शब्द आणि काही ठिकाणी कृत्रिम रचना असे काही दोष आहेत. पण हे दोष अगदीच किरकोळ आणि मामुली स्वरूपाचे असल्यामुळे ते सारे अपवादानेच स्वीकारावे लागतील. तसेच अनवधानाने काही मुद्रणदोषही घडले आहेत. पण त्याबद्दल कवीला मात्र दोषी ठरविता येणार नाही. कवीचा गुणसन्निपातच एवढा जबरदस्त आहे की हे सारे किरकोळ दोष त्यात सहज लुप्त होतील. ठळकपणे ते कुणाच्याच नजरेत भरत नाहीत. वास्तविकरीत्या कवीच्या काव्यो-द्यानातील फुले गोळा करून त्यांचा सुदर हार बनविणारा मी केवळ मालाकार; तेव्हा फुलांचे दोष दाखविण्याचा माझा मुळीच अधिकार नाही. तो फक्त रसिकांचा राखीव हक्क आहे.

असो. या कवि—पंढरीनाथाला शुभाशीर्वाद देण्याचे सामर्थ्य या नाममात्र पामर पांडुरंगाच्या दुबळ्या वाणीत वा पांगळ्या लेखणीत नाही. आदर्श शिक्षक म्हणून झालेल्या गौरवात त्यांच्या पहिल्या आकां-क्षेच्या पूर्तीचे त्यांना जसे समाधान लाभले, तसेच सत्कवी म्हणून या काव्याच्या क्षेत्रात त्यांना योग्य मानाचे पान लाभल्याशिवाय राहणार

नाही, असा मला विश्वास आहे. कवीने म्हटल्याप्रमाणे त्यांच्या काव्याचे रोपटे हे मुळीच खुरपटले नाही; तर उलट ते योग्य रीतीने अंकुरित होऊन सुंदर पानाफुलांनी डवरले आहे आणि म्हणून त्याला लागलेल्या सुमनांच्या सुगंध यथेच्छ आस्वाद घेताना रसिकांच्या मनाला निःसंशय आनंद देईल अशी माझी अंतःकरणपूर्वक शुभेच्छा आहे. शुभेच्छा प्रगट करावयास अधिकाराचा प्रश्नच उद्भवत नाही.

**पांडुरंग श्रावण गोरे**
यवतमाळ

# कवीचे निवेदन

शाळेत विद्यार्थी होतो तेव्हाच दोन आकांक्षा मनात रुजल्या– चांगला शिक्षक व्हायचं ही एक अन् मोठा कवी व्हायचं ही दुसरी. योगायोगानं का होईना, धडपड करूनही दुसरी नोकरी मिळाली नाही नि शिक्षक बनलो, आणि कर्तव्यरथाचा कितीतरी भाग अनाक्रमित राहिलेला असूनही शिक्षक म्हणून झालेल्या गौरवानं पहिल्या आकांक्षेच्या पूर्तीचं समाधान लाभलं व धन्यता वाटली. पण दुसरं रोपटं मात्र मुळातच मशागतीच्या अभावानं खुरटलं. ते इतकं की स्वभावात जडलेल्या छंदातून प्रासंगिक स्वरूपाचं काहीसं कवितालेखन हातून घडलं असलं तरी त्याच्या खुजेपणाची जाणीव पदोपदी होऊन एक न्यूनगंड प्रादुर्भूत झाला. आधीच स्वभाव बुजरा. प्रसिद्धी हवीशी वाटली तरी ती मिळविण्यासाठी करावयाच्या धडपडीचा सर्वस्वी अभाव. त्यात न्यूनगंडाची भर. सभा-संमेलनांसाठी स्वागतगीतं,शुभमंगल– चिंतनार्थ मंगलाष्टकं,शाळांच्या कार्यक्रमांसाठी अभिनयगीतं, जयंत्या-पुण्यतिथ्यांच्या उत्सवासाठी श्रद्धागीतं नि प्रोज नाटकं संगीत करावयाची म्हणून स्थानिक नाट्यहौशी मंडळींसाठी नाटकाची पदं लिहिण्यापलीकडे या छंदानं फारशी मजल गाठली नाही. त्यातल्या त्यात विशी-पंचविशीत प्रसिद्धीच्या उमेदीनं मासिकाकडे पाठविलेल्या कवितांना मान मिळाला तो ‘ साभार परती’चा अथवा केराच्या टोपलीत जाऊन बसण्याचा. त्यामुळं कविता छापण्याची याचना कुणापुढंही न करण्याचा निग्रह बनला तो पक्काच. शालेय सांस्कृतिक कार्यक्रमाच्या क्षेत्रात कित्येक गीतं चांगली उपयोगी पडली नि गाजलीसुद्धा; तथापि केवळ न्यूनगंडामुळं आपलं ते साहित्य वेळप्रसंगी कुणा अधिकारी व्यक्तीला दाखवायलाही मन धजलं नाही.

गतवर्षी शाळेच्या स्नेहसंमेलनाचे मुख्य पाहुणे म्हणून आलेल्या प्रा. भाऊसाहेब मांडवकरांचं एका रात्रीचं वास्तव्य माझ्याकडे झालं नि तेच मला या ‘ आहुती’च्या माध्यमानं उजेडात आणण्यास कारणीभूत

झालं. प्रा. भाऊंना, मला वाटतं, माझे विद्यार्थी कवी वसंत साखरकर यांच्याकडून माझ्या छंदाची आधीच माहिती झालेली होती आणि त्यांनी संपादिलेल्या एका काव्यसंग्रहात माझ्या दोन कविता घेतल्या होत्या– त्याही आमच्या वसंतरावांच्या प्रयत्नानंच. चर्चेच्या ओघात प्रा. भाऊंनी माझ्या कवितेबद्दल विषय काढला. त्यांची चिकाटी इतकी दांडगी की तिच्यापुढं माझ्या टोलवाटोलवीच्या प्रवृत्तीला नमावं लागलं. आढेवेढे घेतच जुन्या पुस्तकांच्या कपाटातील कोपऱ्यात पडलेल्या माझ्या त्या वह्या मी भाऊंच्या हाती दिल्या. आपली मूठभर पोहचांची पुरचुंडी भगवंताच्या हाती देताना सुदाम्यानंही इतके आढेवेढे घेतले नसतील.

त्यांत त्यांना काय आढळलं असेल ते असो; पण त्यांनी त्यांचं व्यवस्थित हस्तलिखित करून प्रकाशनार्थ देण्याचा आग्रह धरला त्याचंच पर्यवसान हा काव्यग्रंथ होय. प्रा. भाऊंशी भेट झाली नसती तर ह्या कविता जुन्या पोतड्यांच्या कपाटात कुबट हवेच्या आस्वादाचा रस चाखीत तशाच कुजत पडल्या असत्या !

सुवाच्य व व्यवस्थित हस्तलिखितं तयार करण्याचं काम माझा मुलगा श्याम यानं अंगीकारलं व तत्परतेनं पार पाडलं. त्यामुळं शाळेच्या अवाढव्य कामाचा भार वाहूनही फारच थोड्या अवधीत ती प्रा. भाऊंच्या हाती मी पोचवू शकलो. अमरावतीच्या सेवा प्रकाशनाद्वारे 'आहुती'चं प्रकाशन होत आहे, त्याचं सर्व श्रेय प्रा. भाऊ मांडवकरांनाच आहे. सांसारिक व्यथांनी सारखा पाठपुरावा चालविला असताना चाळीशी उलटल्यानंतर कवी म्हणून प्रकाशात येण्याचं समाधान मला लाभत आहे ते केवळ त्यांच्यामुळं. प्रकाशनाची योजना आखून प्रत्यक्ष ग्रंथ प्रकाशित होईपर्यंतची सर्व कामं त्यांनी अत्यंत परिश्रमपूर्वक व जिव्हाळ्यानं केली याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे. सेवा प्रकाशनाच्या संचालिका सौ. सिंधुताई मांडवकर यांनी प्रकाशनकार्य अंगीकारलं आणि सुभाष मुद्रणालयाचे व्यवस्थापक श्री. वि. गो. जोशी यांनी छपाईचं काम

अत्यंत सुबक व दक्षतापूर्वक करून दिलं याबद्दल त्यांचाही मी आभारी आहे.

माझ्या या कवितासंग्रहाला विदर्भाचे आद्य जानपदकवी **श्री. पां. श्रा. गोरे** यांनी आपुलकीनं प्रस्तावना लिहिली. त्यांचं ऋण अपार आहे. श्री. गोरे यांचा कवितेच्या क्षेत्रातील अधिकार थोर आहे. त्यांनी माझं कौतुक केलं यात मी स्वत:स धन्य समजतो.

ज्या गुरुजनांच्या अनुग्रहानं व संस्कारांमुळं आणि ज्या हितचिंतकांच्या सत्प्रेमामुळं मी महाराष्ट्रशारदेची अल्प–स्वल्पशी सेवा करण्यास समर्थ ठरलो त्या सर्वांविषयीच्या कृतज्ञतेच्या अनुल्लेखानं 'आहुती'चं हे प्रास्ताविक निवेदन केवळ भावशून्य ठरेल !

पं. वि. हुलके



# अनुक्रमणिका


अनु. — पृष्ठ

## भक्तिगीते

१. विद्यावंदन — १
२. सद्‌गुरुवंदन — २
३. दे हरि तुझ्या कृपेची छाया — ३
४. मजला छंद तुझा गोविंद — ४
५. श्याम मुकुंद हरी — ६
६. श्रीहरि, तव नाम — ६
७. धाव मुकुंदा — ६
८. जय घनश्याम — ७
९. सरस्वती–नमन — ८
१०. सरस्वतीची आरती — ९

## स्वदेशप्रेम

११. भारता करू स्वतंत्र — १०
१२. रे उठा — ११
१३. स्फूर्ति–संदेश — १२
१४. मायभू बोलावते — १४
१५. येई न का याची लाज ? — १५
१६. खबरदार ! — १६
१७. गुलामीच्या कडा फोडा — १७
१८. थांब शासका — १८
१९. जुलमी शासनास — १९
२०. अंजली — २०
२१. आव्हान — २१
२२. कसोटीची वेळा — २३
२३. जयघोष करा क्रांतीचा — २५
२४. येणार दिवस विजयाचा — २६
२५. मंगल प्रभात — २७
२६. निशा सपली — २८
२७. माझी शपथ — २९

## श्रध्दांजली - आदरांजली

२८. टिळक–वंदन — ३०
२९. सद्‌भाव– सुमांची माळा — ३१
३०. श्रद्धांजली (कविवर रवींद्रनाथ टागोर यांस) — ३३
३१. धन्य महात्मा — ३४
३२. श्रद्धांजली (म. ज्योतीराव फुले यांस) — ३६
३३. सुभाषा, अमर तुझी घोषणा — ३८
३४. धन्य सुभाषा ! — ३९
३५. जवाहर चिरायु हो — ४०
३६. नेहरू काका — ४१
३७. भावपुष्पांजली (केशवसुत जन्मशताब्दीच्या निमित्ताने — ४२

## बालगीते किसानगीते

३८. पुढे चला — ४३
३९. भारतभूचे बालक आम्ही — ४४

४०. ऋतूचे गाणे ४५
४१ घामात सुखाचे धाम ४६
४२. डुरडुब् डुरडुब् ४७
४३ बालवीरांचा कॅंपफायर ४९
४४. जय हिंद ५०
४५. राष्ट्रध्वज हा चढे ५१
४६. फुगे ५२
४७. किरसान दादा ५३
४८. तांबडं फुटलं ५४

## भावगीते

४९. उपस ५६
५०. रुखरूख ५८
५१. तुझ्या वाटेकडे डोळे ५९
५२. उल्कापात ६०
५३. हुरहूर ६१
५४. शबरी–भक्ती ६२
५५. सकाळी ६३
५६. सखे, शिवारी ग ऽ ६४
५७. वसंत फुलला मनी ६५
५८. येशील का ? ६६
५९. प्रीतीचे नाते ६७
६० तोष ६८
६१ हासली विजेची कोर ६९
६२. नुरे जगी विश्वास ६९
६३. काय करू ? ७०
६४. कामिनी ७१
६५. छेडियली तार कुणी ? ७१
६६. ए खट्याळ पोरी ! ७२
६७. जन्मदे ! ७३

## विचारप्रधान कविता

६८. नववर्षाचा शुभ दिवस ७४
६९. खेळ ७५
७०. यशोदीपमाला ७६
७१. भारतीय तपस्वी ७७
७२. आमचे कर्तव्य ७८
७३. नवे कंकण ७९
७४. जय कुमार ! ८०
७५. ढोरकी पोरगा ८१
७६. दुष्टां बरे फावले ८३
७७. फुले नी मुले ८४
७८. शिक्षका, प्रतिज्ञा कर ८५
७९. आश्चर्य वाटे मना ! ८६
८०. ध्वनि–संभ्रम ८८
८१. माझी आस ९०
८२. नवा हिंद ९२
८३. नवी संस्कृती ! ९२
८४. अधोगती ९३
८५. हा दीप घे ९४
८६. धिक्कार ! ९५
८७. युवकहो ! बांधा कंबर ९६
८८. प्रार्थना ९७
८९. नवी दृष्टी ९९
९०. पुत्र–मित्राप्रत हितबोध १०१
९१. एक व्यंगचित्र १०५

९२. माता १०६
९३. जीवनज्योत १०७
९४. हो मानवा मानव भला १०८
९५. एक सूचना १०९
९६. जाणे तुका ११०
९७. शिस्त १११
९८. दुष्काळात दिवाळी ११२
९९. कीड लागली पुरुषार्थाला ११४

## घटनाप्रधान कविता


१००. विजयपताका ११८
१०१. मरगोध्यावर धडक १२१

## आत्माविष्कार

१०२. सुखाचा शोध १२३
१०३. सोडू नको'स आशा १२५
१०४. माझ्या जीवनाचे काव्य १२७
१०५. प्रश्न उत्तराविण उरला! १२९
१०६. कसे प्रियेला आराधू ? १३०
१०७. पिसाटलं वारं १३१
१०८ एका दगडाची कहाणी १३२
१०९. स्वप्नभंग १३४
११०. शरणपत्रिका १३५

## दीर्घकाव्ये

१११. बुध्दकृपा १४०
११२. शकुंतला १४५
११३. आहुती १५४



# भक्तिगीते

## १. विद्या-वंदन

द्रा. क्र.
(जावी-रस्ता)

विद्ये ! सदैव भावे । तुज वंदने असो गे ! ॥ध्रु.॥

जयमंगले यशोदे
सद्‌भावमाळ मोदे
तुज वाहु आदिमाते । तव ध्यान गोड लागे ॥१॥

जगती तुझ्याविणे ते
आधार बालकांते
गे कोण? घे कडेसी । दे ज्ञानपान वेगे ॥२॥

सच्छील सद्‌गुणांची
वसती सुभावनांची
मनि हो, नि दुर्गुणांचे । सारे तुटोत धागे ॥३॥

थारा नसे सुखाला
शांती तशी मनाला
सर्वस्व दूर जाई । तव दृष्टिच्या वियोगे ॥४॥

ध्यानी तुझ्या रमोनी
सन्मार्ग आचरोनी
जगता सुमार्ग दावू । नवस्फूर्तितेजयोगे ॥५॥

मराठा ग्रंथ । स्थळप्रत
अनुक्रम...९९०० दि...
...(१)...
९६५६०

# ७. सद्‌गुरु-वंदन

सद्‌गुरुच्या चरणां वंदू
सद्‌गुरुच्या चरणां वंदू ॥ ध्रु. ॥

धन्य केशवानंद सद्‌गुरू
पापापरकटुकष्टदु:खहरू
मनुजांतरि तो सद्‌गुण-मन-भरु
अमुचा तारक भवसिंधू ॥ १ ॥

गळितां दलितां मार्ग दाखवी
बोधामृत पाजुनिया सुखवी
सकल किल्मिषां दूर घालवी
सद्‌गुरु दीनांचा बंधू ॥ २ ॥

बुद्धीदाता मति-उध्दर्ता
सद्‌गुरु पालक तोचि सुमाता
तोच अमर पाजुनिया कर्ता
ज्ञानाचा अमृत - बिंदू ॥ ३ ॥

प्रार्थित बालक तच्चरणावर
भावसुमन ठेवुनिया तत्पर
गुरो ! मस्तकी ठेवि वरदकर
जगती मग निर्भय नांदू ॥ ४ ॥

२१-१२-१९३७

# ३. दे हरि तुझ्या कृपेची छाया

(भजन)

दे हरि तुझ्या कृपेची छाया ॥ ध्रु.॥

संसाराचा विशाल सागर
वादळ सुटले घोर अनावर
मी तर दुर्बल नाविक पामर
धजलो पार कराया ॥ १ ॥

हीन दीन मी गर्वे फुगलो
नीच वासनेलाच बिलगलो
पशुजीवन निःसंशय जगलो
भ्रमात पडलो वाया ॥ २ ॥

काम दंभ मद शत्रू भीषण
हृदयी बसले करुनी आसन
स्वार्थाचे नित केले पोषण
काया ही सुखवाया ॥ ३ ॥

मानवतेला पार विसरलो
पापांतरि उन्मत्त विहरलो
निर्मम जगती शिरलो फिरलो
शिणलो पंढरिराया ॥ ४ ॥

शरणागत तव चरणी आता
अनन्यगतिकांचा तू त्राता
तार दयाघन मज यदुनाथा
ये मम दुरित हराया ॥ ५ ॥

१७-१०-१९५३

# ४. मजला छंद तुझा गोविंद

(भजन)

छंद तुझा गोविंद, मजला ॥ध्रु.॥

तू अवतरता गोकुळ सारे
हर्षित हो नव सुटले वारे
गोप आणखी त्यांच्या ललना
दीपशिखांनी सजवित सदन।

वृंदातिल अतिमंद समीरण
चराचरांतिल फुलवी कणकण
चैतन्याचा सागर भरला
आकाशातहि भरुनी उरला–
नंदाचा आनंद ॥१॥

कुंजवनी मुरलीरव भरता
उत्साहाची वाहे सरिता
व्रज वेडे तुजसाठि मुकुंदा
सेवाया तव पदारविंदा

सकलजनांचे हो संजीवन
घरि खेळे त्यांच्या जगजीवन
गोरस–अमृत–धारा बाळां
प्राप्त कृपेने तव गोपाळा–
आनंदाचा कंद ॥२॥

दैन्य पळाले ये नवकांती
उदंड भरली भक्ती शक्ती
दुर्बल होती नवबलशाली
छळ जुलुमाची सीमा झाली

मुक्यास फुटली वाचा, उठली
क्रांतिगर्जना ही भवताली
दुष्ट कराया नष्ट मुरारी
तत्पर तू कालीय फणेवरि-
नाचलास स्वच्छंद ॥३॥

मुचकुंदाते जागविशी तू
लाज सतीची वाचविशी तू
गोवर्धनधर गोकुळरक्षण
करिशी हरि वणव्याचे भक्षण

कंसकंदना हर भवबंधा
देवकिनंदन ब्रम्हानंदा
उन्मन हे मन तव गुण गाता
भृंग कवी हा दंग सेवता-
तुझा भक्तिमकरंद ॥४॥

१६-१०-१९५३

## ५. श्याम मुकुंद हरी (भजन)

श्याम मुकुंद हरी । दयाघन ॥ ध्रु. ॥
दीन सख्या दे हृदया शांती
दैन्या दूर करी । दयाघन ॥ १ ॥
अज्ञानी मी भ्रमलो जगती
माया मोह हरी । दयाघन ॥ २ ॥
कल्याणाचा सुपंथ दिसू दे
नवचैतन्य भरी । दयाघन ॥ ३ ॥

## ६. श्रीहरि, तव नाम (भजन)

श्रीहरि, तव नाम मधुर । मधुर कितीतरी ॥ ध्रु. ॥
बालक अम्हि तुजसि शरण
चरणी तव रमले मन
दुःखाते करुनि हरण । सुखि सदा करी ॥१॥
बुध्दी बल देइ ज्ञान
लाभो भूवरति मान
द्यावे प्रभु हेचि दान । सतत श्रीहरी ॥२॥

## ७. धाव मुकुंदा (भजन)

धाव मुकुंदा हरि गोविंदा । छंद तुझा मज जडला रे
नंद-कुमारा हृदयाधारा । भक्त विपदि तव पडला रे ॥ध्रु.॥
तूच विसावा त्रस्त जिवाचा । तुजविण कोण सखा अमुचा
तार हरी या संसारातुन । प्राण गळ्यातच अडला रे ॥१॥
आनंदाचा कंद सखा तू । पतितांच्या मनि वसशी तू
नंदयशोदानंदन देवा । भाव तुझ्या पदि जडला रे ॥२॥

# ८. जय घनश्याम (आरती)

जय जय जय घनश्याम ॥ध्रु.॥
मधुर मुरलिरव । तव नव माधव ।
करि मम पूरित काम
भवभय हर कर । चिन्मय श्रीधर ।
दे चरणी विश्राम
जय जय जय घनश्याम । ॥१॥

गोवर्धनधर । जगतत्रयवर ।
गोड तुझे हरि नाम
देवकिनंदन । तुज अभिवंदन ।
गोप सख्या अभिराम
जय जय जय घनश्याम ॥२॥

चक्र गदा करि । पद्म मुरारी ।
धरिशी दर सुखधाम
ते दे मोहन । जे सुख पावुन ।
सेवक धन्य सुदाम
जय जय जय घनश्याम ॥३॥

# १. सरस्वती - नमन

श्री सरस्वती करू नमन तव चरणी ॥ध्रु०।

तू शास्त्रकलांची जननी
धी-बुद्धि-शांति-सुखखाणी
त्वत्कृपालवहि तरि प्राणी-
वसतील सुखाने भुवनी ॥१॥

मन बुद्धी विकास-स्फूर्ती
प्रेरि, दे वसू त्वन्मूर्ती
हृन्मंदिरि अमुच्या, पूर्ती-
करि कांक्षेची, तमहरिणी ! ॥२॥

जागृती करुनिया चित्ती
सोत्साह तेज-बल-कांती
पेटवी चेतना - ज्योती-
अरि आळस निष्प्रभ करुनी ॥३॥

विद्या यश उज्वल माते !
दे अखंड कीर्ति-सुखाते
प्रार्थना तुला प्रणिपाते
बालक रत तुझिया भजनी ॥४॥

-९-१९३९

# १०. सरस्वतीची आरती

जय जय जय देवी । शारदे । विद्या मज द्यावी ।।ध्रु.।।

बालक मी सान । शारदे । बालक मी सान
दूर करी माते । माझे । सगळे अज्ञान ।।१।।

या जगतावरती । देवी । या जगतावरती
दे बुध्दी मजला । उजळिन । देशाची कीर्ती ।।२।।

सरस्वती माते । अंबे । सरस्वती माते
कृपा करी आता । मन हे । उतावळे होते ।।३।।

तुज करितो देवी । आरती । तुज करितो देवी
सुमनांची माळा । जननी । स्वीकारुन घ्यावी ।।४।।

ग्रा. स्थळप्र.

# ११. भारता करू स्वतंत्र

येउन जन्मास करा सार्थक त्याचे
षंढवृत्ति टाकुनि व्हा वीर बलाचे
मर्द दिलाचे ॥ध्रु.॥

फोडितसे हंबरडा केविलवाणी
हीन दीन हिंद जननि भाग्यशालिनी
'मुक्त करा!' आर्त हाक ऐकुनि कानी
का न शीघ्र पेट घेइ हृदय मुलांचे? ॥१॥

पुत्र असे व्यालि रणी झुंजुनि ज्यांनी
जन्मभूमि भूषविली क्षात्रबळांनी
ज्ञान-धनी, शौर्य-गुणी थोरच मानी
आठवून का न तयां स्फूर्ति ही नाचे? ॥२॥

त्याच पोटि जन्मति निःसत्त्व करंटे
आपसात भांडति जे हाणिति सोटे
संधि परकि-शासकांस आयति भेटे
पारतंत्र्यतिलक धरी भाल तियेचे! ॥३॥

शील-साधना करा वरा पराक्रमा
दूर सारण्यास, उठा, दुर्दशा-तमा
एकसंघ–एकतेत निश्चये रमा
'भारता करू स्वतंत्र' ध्येय आमुचे! ॥४॥

२१–१०–१९३९

# १२. रे उठा (जाती-उद्धव)

रे उठा उठा बहु झाली । झोप ती त्वरेने सोडा
सांडुनिया आळस सुस्ती । स्फूर्तीते हृदयी जोडा ।।
वैभवही तुमचे गेले । वीरत्व गोठले कोठे ?
विद्येचा फुटला साठा । शक्तीची सरिता आटे !
हरपले सर्व धन गेले
परक्याने चोरुन नेले
मूर्खत्व नशीबी आले
निद्रेत घोरता अजुनी । रे विवेक ठेवा थोडा ! ।।१।।

जगण्याची आशा जर का । वीर्या शौर्याते कमवा
ऐक्यभाव बाणुनि चित्ती । स्वाभिमान रोमी रमवा
व्हा पुतळे नव तेजाचे
लाजवा क्रौर्य परक्याचे
वाजवा वाद्य सुयशाचे
शिरी भारतभूच्या चढवा । स्वातंत्र्यकीर्तिचा झेंडा ।।२।।

२२-१०-१९३९

स्थळप्रत

# १२. स्फूर्ति संदेश

( जाती–उद्धव )

भारता ! घुमू दे कानी स्फूर्तीचा नव संदेश
हालु दे हृदय हाकेने चल ऊठ पेटला देश ।।ध्रु.।।
स्वातंत्र्य लयाला जाता सौख्याचा होई लोप
स्वाभिमान, शक्ती, बुध्दी, धन, विवेक घेती झोप

दारिद्र्य - आपदा - व्याधी
अज्ञान मित्रता साधी
चालली सतत बरबादी

राष्ट्राच्या कल्याणाच्या लागला गळचाला फास ।।१।।
या सर्व अध:पाताला तू स्वये कारणीभूत
राष्ट्रैक्य पाहिजे मग का धर्माचे मध्ये भूत ?

धर्माचा करिशी अनर्थ
पाहशी आपला स्वार्थ
स्वातंत्र्य-वल्गना व्यर्थ

सद्धर्म मार्ग बघ नीट सोडून नेत्रिचा पाश ।।२।।

बलहीन बैसशी दुबळा चल ऊठ दिसू दे कांती
चेतना भरू दे अंगी कसदार भरू दे छाती

मजबूत दंड लोखंड
करि शतशत्रूंचा खंड
थरथरे तरी ब्रह्मांड

बलभीम तुल्य बलशाली हो धरी शक्तिचा ध्यास ।।३।।

संधीतहि संकट दिसते भ्याडास, परी तो मर्द
काढतो संकटी संधी दाखवी शौर्य बहु गर्द

संकटी असे भूमाता
दृढनिश्चय करुनी आता
आक्रमी यशाच्या पंथा

षंढत्व सोड रणधीरा ! पाव पाव नवतेजास ॥४॥

जागशी तरी जगशील झोप रे तुला बुडवील
जागशी गाजशिल तेजे तव शक्ति जगास पटेल

दाखवी कसाचा हात
बंधातुन होई मुक्त
हो स्वातंत्र्याचा भक्त

होऊ दे त्वन्नामाचा भूवरती जय जय घोष ॥५॥

२०-१२-४१

# १४. मायभू बोलावते (जाती–वल्लभा)

युग हे कली, कलिपूर हा दाही दिशांनी लोटला
हा! हा! किती ही दुःस्थिती! सद्धर्म वाटे आटला।
सन्मार्ग कोठे ना दिसे, अंधार भारी दाटला
कुणि शांतवाया ना धजे, प्रलयाग्नि एसा पेटला ॥१॥

युद्धे जगी किति माजली, परमोच्च गेली क्रूरता
संहार होई, त्रस्त हो रवते धरा ही नाहता।
उध्वस्त नगरे सुंदरे जगभूषणे ऐशा कृती
होतात, चिंता ना कुणा; किति मानवाची दुर्गती! ॥२॥

शरचाप, भालाढाल, ती तरवारही बेकाम हो
ती धर्मकदने लोपली, नच शक्तिमध्ये राम हो।
अजि आयुधे नव बॉंब, अन् तोफा सुरुंगाच्या नळ्या
वायू विषारी, त्या कला जनघातकारी आगळ्या ॥३॥

रथ, अश्व, हत्ती वाहने ही व्यर्थ युद्धी यापुढे
लढती विमाने राक्षसी नौका नि रणगाडे बडे।
धरणीवरी, पाण्यात वा वायूत शत्रू शोधती
क्रौर्ये क्षणातच नाशती, नच जीवनाची शाश्वती ॥४॥

मग का फुका भिउनी अता मरणा घरी दडता असे?
निधड्या दिलाने मृत्युशी लढण्या पुढारी या कसे।
जरी वज्रही पडले उरी तरि तुच्छ माना घाव ते
स्वातंत्र्य धर्म स्थापण्याते मायभू बोलावते ॥५॥

३-८-१९४२

# १५. येई न का याची लाज ?

(जाती–हरिभगिनी)

ऊठ ऊठ, भारतभूपुत्रा ! उघडुनि डोळे पाहि तरी
आग भडकली जिकडे तिकडे, जगास वाटे भस्म करी ॥१॥

कलह माजती, युद्धे होती, प्रेतांच्या राशी पडती
अहा ! मानवा, तुझी क्रूरता मात करी पशुतेवरती ॥२॥

अन्न मिळेना ज्याचे त्याला, मालक ठरतो चोर घरी
पोरे रडती अर्धउपाशी, परका पाजी मौज करी ॥३॥

शेतकरी सकळांस पोसतो राबुनिया निज घामाने
परी दुर्दशा नशिबी त्याच्या जिणे दीन लाजीरवाणें ॥४॥

अन्न मिळेना, वस्त्र दिसेना जीव घशाशी बघ आला
निराधार जन टाहो देती ! त्याचि न चिंता कोणाला ॥५॥

तुझे राहिले काय ? धाय असहाय रडे जेथे माता ?
कृतीहीन-परवशपतितांचा जगती कोण वसे त्राता ? ॥६॥

श्वानाचे जीवन जगण्यातच तोष मना वाटे आज
हाय हाय रे ! किती अवनती ? येइ न का याची लाज ? ॥७॥

धर्मभिन्नता, जातिभिन्नता, पंथभिन्नता भिन्न मते
करती तुकडे भारतभूचे दृढता देती परवशते ॥८॥

गुलामीत मति पतित जाहली ! कुणी कुणाचे ना मानी
हाय ईश्वरा ! कुठे लपविले स्वातंत्र्याचे अभिमानी ? ॥९

१-८-१९४२

## १६. खबरदार

(जाती–स्नेहसागर)

खबरदार ! जर हात उचलशिल स्वतंत्र सेनेवरी ।
हिमाचलाचा चंड कडा रे कोसळेल तव उरी ।।ध्रु.।।

स्वातंत्र्याच्या संग्रामाचा प्रचंड ज्वालामुखी
पहा भडकला अग्निलाट वर उफाळते सारखी ।
'चलो दिल्लि' 'जय हिन्द' गर्जना–निनाद नभ भेदती
शिरे घेउनी तळहातावर उभे वीर भारती ।
का घमेंड तुजला, शस्त्रास्त्रांचे बळ
विझविण्या शक्त हा प्रचंड दावानल ?
परि याद राख हा अधिकाधिक भडकिल
व्यर्थ तुझा अभिमान, बापड्या ! जा अपुल्या घरी
हिमाचलाचा चंड कडा रे कोसळेल तव उरी ।।१।।

वृथा वल्गना, वृथा बोध तव राज्यशासका पुरे
जा सोडुनिया देश आमचा तरिच तुझे रे बरे ।
क्रांतिवीर रणधीर शिपाई सज्ज ठाकले उभे
अधम पाशवी सत्तेचे तव करावया सर सुभे ।
होईल स्फोट उलथेल तुझे आसन
करणार हरी दुष्टांचे निर्दालन
मग शरणी येशिल नाक मुठित घेउन
नको बुद्धिशी वैर करू जा विवेक बरवा करी
हिमाचलाचा चंड कडा रे कोसळेल तव उरी ।।२।।

---

÷ स्वतंत्र सेना–आझाद हिंद फौज

# १७. गुलामीच्या कडा फोडा

( जाती–जीवकलिका )

बघा, ह्या वर्षती गारा गमे की प्रलय होणार !
तुम्ही का पंजरी बंदी असे तडफडुन मरणार ? ॥१॥

भरे नभ दाट मेघांनी होय रे गर्जना घोर
कडाडे वीज, धरतीला भरे थरकाप चौफेर ॥ २ ॥

तुफानी वाहतो वारा भरारा झोंबतो अंगा
तुम्ही या बंधनी त्याते कसे सोसाल रे सांगा ॥ ३ ॥

मिळेना अन्न पोटाला शरीरे जाहली क्षीण
पुरे नच वस्त्र अंगाला दरिद्री बैसला दीन ॥ ४ ॥

दिले जे तोंड देवाने असे ते आजला बंद
नसे बोलावया शक्ती मती अन् पांगळी मंद ॥ ५ ॥

मनाला टोचती काटे फुलांचे पाहता रक्त
गुलाबाची दशा ऐशी नशीबी पाहणे फक्त ॥ ६ ॥

तुम्हा घरि बांधुनी तुमच्या करी धुडगूस रे चोर
तोडुनी बंधने धैर्ये तयाला घालवा दूर ॥ ७ ॥

उभारा दिव्य शक्तीला तुफानाशी करा युद्ध
गुलामी दूर साराया प्रतापे व्हा तरी सिद्ध ॥ ८ ॥

मरायाचे, तरी शौर्ये लढा अन् बंधने तोडा
गुलामीच्या कडा फोडा ! मरा, चिर मुक्तिते जोडा ! ॥९॥

# १८. थांब शासका (जाती – हरिभगिनी)

थांब शासका तिथेच, वरती एक पायरी चढू नको
चढू पाहशिल पडशिल उलटा, फंदामधि या पडू नको ।।१।।

सत्तेच्या मदि धुंद होउनी, तोल मतीचा सोडु नको
ये यापुढती ताळ्यावरती, धुंदीने बडबडू नको ।।२।।

बळकावुनि घर बळे कुणाचे, सदन आपले म्हणू नको
टाक देउनी ज्याचे त्याला, व्यर्थ बापड्या शिणू नको ।।३।।

केले, गेले, पुरते झाले, आतातरि रे करू नको
पाप भयंकर, दूर जाउनी बैस, फिरूनी येउ नको ।।४।।

हृदयावरती घाव आमच्या, मीठ तयावर चोळु नको
निर्बल मानुन जनता हिंदी, गाफिल येथे लोळु नको ।।५।।

शस्त्र चालवुन रक्त वाहवुन, नाग-फणीवर मारु नको
क्षोभ वाढता फूत्कारातुन, जीवन-आशा धरू नको ।।६।।

स्वातंत्र्याचे हिंद-वीर कर मुक्त, तयांवर चिडू नको
वैर बुद्धिशी करुन, इंग्रजा ! ठेचाळुन रे पडू नको ।।७।।

# १९. ज़ुलमी शासनास (जाती – पादाकुलक)

नको बनू बेफाम । शासना ॥ ध्रु० ॥

फसवुनि आम्हा पुरते लुटले
निर्बल निर्धन जर्जर केले
सन्मानाचे वैभव नेले
साधुन कावा तुवा लाविला भारतभूस लगाम ॥ १ ॥

करुन भारता गुलाम – बंदी
नामशेष करु पाहसि हिंदी
राष्ट्र काय ? त्या फासुनि फंदी
पचेल का परि तुला पाशवी सत्ता नीच हराम ॥२॥

मद सत्तेचा तुजला चढला
माणुसकीचा मुडदा पडला
विचार कर पण आता पुढला
सज्ज भारती वीर अुभे हे करावया संग्राम ॥३॥

क्रांतिचंडिका आज भारती
खडबडली, बघ हाले धरती
क्रांतिगर्जना भीषण हो ती !
तुम्ही आयुधे बंदुक गोळ्या शस्त्रास्त्रे बेकाम ॥४॥

विंध्य हिमाचल सह्य अरवली
वीर आमचे विक्रमशाली
चंडवात सुटताच वादळी
कोसळतिल तव उरी, जगातुन मिटेल मग त्वन्नाम ॥५॥

हिंदभूमिचा कण कण वरती
उडेल पावुन दिव्य स्फूर्ती
काय तुझ्या अस्त्रांची महती ?
सहल सुदर्शन – धारी धावत येतिल हरि बलराम ॥६॥

होइल आता भीषण संगर
रणी झुंजतिल वीर धुरंधर
तांडव नर्तन करतिल शंकर
परवशतेचे बंध तटातट तुटतिल पार तमाम ॥७॥

## २०. अंजली (जाती-समुदितमदना)

स्वातंत्र्याच्या महादेवते ! प्रणाम शतदा तुला
स्वतंत्र जगती सतत वसो ही भारतभू निस्तुला ।
नित्य नवी दे स्फूर्ति, नष्ट हो जो वृत्ती गंजली
आज वाहतो प्राण-फुलांची तुझ्या पदी अंजली ।।

१५-८-४७

# २१. आव्हान

खरोखरच षंढ ! ते भिवविं तुला रणकुंड ! ।।ध्रु.।।

घरि तुझ्याच तुजभोवती विक्राळ भुते नाचती
अधिकारे दरडावती तुज नाचण्यास लावती
तव कळसूत्रापरि गती –
जसा का मेंढ हाकावा कुणिहि अखंड ।।१।।

धन–मान हिरावुन तुला बलहीन चोर बनविला
ते विभव, सनातन कला, अभिमान नष्ट जाहला
निर्बुद्ध उगा बैसला –
उरेना भेंड धिक्कार ! निघे ही धिंड ।।२।।

हालण्यास नच अवसर बांधले बंधनी कर
अंधत्वहि नयनांवर करि कर्ण बधिर पामर
संतुष्ट मिळे भाकर –
असा मृत्पिंड मुसक्यात बंद रे तोंड ।।३।।

बघ जरा सभोती स्थिती किति वस्त्राविण आकृती
नच मिळे अन्न, तडफती, पोटात आग भडकती
जाळिते जिवांना किती –
परी श्रीखंड खाऊन झाकशी तोंड ! ।।४।।

मराठी ग्रंथ ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ८८०९०० दि:

मारशी बढाई घरी भावावर धरशी सुरी
नामर्द परी बाहिरी थू : ! थाट असा लष्करी !
लादती दास्य जे उरी –
तुझ्या खल पुंड त्यासमोर बनशी रांड ॥५॥

ते धन्य धन्य रणधिर रणि गाजविती समशिर
झुंजती सिंहसे नर चमकती चंड भास्कर
कापती शत्रु चर चर –
तोडुनी मुंड रचतात भव्य उतरंड ॥६॥

स्मरुनि ते भारती विर चल ऊठ बांध कंबर
पाव रे त्वेष सत्वर मनि आण शौर्य – पाझर
जे दुष्ट यामिनीचर –
त्यांचि घमेंड जिरविण्यास हो रणचंड ॥७॥

तू हिंदपुत्र सद्‌गुणी हो सज्ज लढाया झणी
स्फूर्तिने नव्या पेटुनी दाखवी तेज चमकुनी
स्वातंत्र्य कीर्तिकोंदणी –
प्रतापे चंड भूमाते बसवि उदंड ॥८॥

२२-६-१९४३

## २२. कसोटीची वेळा (वृत्त-स्वागता)

काळकोप हर ! हा अनिवार
घोर हो जनि विपद् भडिमार
वर्षतो कहर रे घन काळा
ही कसोटिचि खरोखर वेळा ! ॥१॥

व्याप्त अंबर तमे घनघोर
दाटली रजनि किर्र अघोर
राक्षसी टपलि दाढविशाळा
ही कसोटिचि खरोखर वेळा ! ॥२॥

होतसे गडगडाट ढगांचा
तोल ऐकुन ढळे भुजगाचा
कंप भीषण सुटे धरणीला
ही कसोटिचि खरोखर वेळा ॥३॥

युद्ध हे स्थित पुढे बलशाली
नाचते धरुन क्रौर्य मशाली
पेटली अति भयानक ज्वाला
ही कसोटिचि खरोखर वेळा ॥४॥

घोर पाउस पडे रुधिराचा
देखता धिर गळे सुधिराचा
पूर हा बुडवितो अवनीला
ही कसोटिचि खरोखर वेळा ॥५॥

जीव जीव अमुच्या सदनाचा
ताप तो शमविण्या कदनाचा
भस्म हो, आणि उठेच उफाळा
ही कसोटिचि खरोखर वेळा ॥६॥

जी धरा प्रथित वैभवशाली
तेथ मृत्य करि नृत्य खुशाली
धर्म दूर कहरे पळवीला
ही कसोटिचि खरोखर वेळा ॥७॥

अन्नवीण मरती किति हाय !
शुष्ककाय रडती असहाय
बालके मुकति रे जननीला
ही कसोटिचि खरोखर वेळा ॥८॥

फाटले नभ, दिशा अनवाणी
कोसळे नग न तारक कोणी
जाय शुद्ध बघता विलयाला
ही कसोटिचि खरोखर वेळा ॥९॥

बद्ध बंधनि जरी हरि शक्त
बांधली मुसकुटे अति सक्त
दुर्दशा न सहनीय मनाला
ही कसोटिचि खरोखर वेळा ॥१०॥

आज भारत नवा तरुणांचा
साहुनी तळमळा न मनाचा
जागला धडपडे जगण्याला
ही कसोटिचि खरोखर वेळा ॥११॥

भारता ! खर तुझा शर सोडी
दास्यबंधन तटातट तोडी
पेटवी विजय दीपक माला
ही कसोटिचि खरोखर वेळा ॥१२॥

१०-१२-१९४४

# २३. जयघोष करा क्रांतिचा

( जाती – अक्रूर )

'जयहिंद' म्हणा, घोष करा विजयाचा, हा हिंद हिंदपुत्रांचा
आझाद बना, हाच मंत्र विजयाचा, हा हिंद हिंदपुत्रांचा ॥ ध्रु.॥

स्वातंत्र्य नसे आज हिंद देशाला, अपमान कपाळी आला
अन्नान्न दशा करी तया बेजार, रुधिराची सांडे धार
मालक तो बनला चोर
उन्मत्त चोर शिरजोर
करि जुलमी अत्याचार
माजला इथे नाच धुंद पुंडांचा, घ्या समाचार रे त्याचा ॥ १ ॥

या, हाकुनिया आज तयांना छाया, द्या त्यास्तव तुमची काया
सांडेल रणी रक्त वाहु द्या पूर, होईल काळ जरि क्रूर
आपदा घोर येतील
किति जीव बळी जातील
किति नष्ट कुले होतील
होवोत सुखे ! परि रवि उगवायाचा, तो उज्वल–
स्वातंत्र्याचा ॥ २ ॥

ही परवशता नष्ट पार होणार, हे दैन्य दूर पळणार !
ही भारतभू गौरवास चढणार, कीर्तीध्वज फडफडणार
येणार राज्य रामाचे
येणार राज्य सत्याचे
येणार राज्य शांतीचे
परि क्रांतिविना उपज कुठे शांतीचा, ? जयघोष करा
क्रांतीचा ॥ ३ ॥

## २४. येणार दिवस विजयाचा

(जाती – उद्धव)

भारता ! शीघ्र तो आता येणार दिवस विजयाचा ॥ ध्रु. ॥

काळोख भोवती झाला डोळ्यांस दिसेना वाट
चालण्या धीर होईना मांडती घूक बोभाट
काळाने केला घात
चकविलेच हातोहात
लोटले खोल खाईत
हो उभा, निश्चये वरती कर यत्न जरा उडण्याचा ॥१॥

ही मुक्त तुला करण्याला पातली फौज आझाद
दुमदुमे घोष गगनात 'दिल्लीस चला' 'जयहिंद'
गर्जना नभांतरि चढली
हुडहुडी शासकां भरली
बंधनी तिला करकरली
भडकला परी जोमाने हा संगर स्वातंत्र्याचा ॥२॥

एकेक बिंदु रक्ताचा प्रसवेल हजारो वीर
'जयहिंद' घोष भूवरती राहील सदोदित अमर
दुष्टता नष्ट होणार
जगि सत्य तेच जगणार
सध्दर्म एक टिकणार
सोडून भीति मरणाची प्रतिकार करी अनयाचा ॥३॥

## २५. मंगल प्रभात

( जाती-हरिभगिनी )

जागा जागा हिंद वीरहो
स्वतंत्रता जयघोष करा
हिंदी स्वातंत्र्याचा संगर
सर झाला जल्लोष करा ॥१॥

पार गुलामी नष्ट जाहली
ऐका विजयाचा ललकार
स्वातंत्र्याच्या गोड विणेचा
दिव्य मधुर ऐका झंकार ॥२॥

देश आपला आज मुक्त त्या
शांतियुक्त भरपूर करा
धारण करुनी ऐक्य, बंधुता
भेदभाव ते दूर करा ॥३॥

दिल्लीच्या किल्ल्यावर झेंडा
चढे तिरंगी आज पहा
स्वातंत्र्याचा प्रभात मंगल
आला त्याचा साज पहा ॥४॥

१५-८-४७

# २६. निशा संपली (जाती–चंद्रकांत)

निशा संपली, निशाचरांचे काळ राज्य गेले
सूर्यदेव उगवला; भारती रामराज्य आले ।।ध्रु.।।

उर्मट पाजी धटिंगणांचे मदोन्मत्त रंग
पार भंगले, मंगलता उधळते शुभ तरंग ।।
दैन्य निमाले, छळ–बळ गेले, क्रौर्य होय लुप्त
हस्तक त्यांचे खोल सागरी होत दूर गुप्त ।।
घुबडांचा कोलाहल झाला नष्ट, दुष्ट मेले
सूर्यदेव उगवला; भारती रामराज्य आले ।।१।।

स्वातंत्र्याचा संग्रामाचा आज विजय होय
आज आमची बंधमुक्त हो भारतभू माय ।।
स्वातंत्र्याच्या मांगल्याने भांग तिचा भरला
सुभग–हर्षिता देवि–विमोदा पार नसे उरला ।।
हिंदभूमिच्या कणाकणातुन तेज नवे शिरले
सूर्यदेव उगवला; भारती रामराज्य आले ।।२।।

स्वतंत्र आता शूर शिपाई मी भारतभूचा
मीच राव वा रंक मीच, 'जयहिंद' घोष अमुचा ।।
अनीतिचा कळिकाळ असे मी भक्त सुनीतीचा
एकच माझा धर्म सत्य सध्दर्म मानवाचा ।।
मानव आम्ही एक दिलाचे ! भेदभाव गेले
सूर्यदेव उगवला; भारती रामराज्य आले ।।३।।
१५-८-१९४७

# २७. माझी शपथ

(छंद – देवद्वार)

मातेचा मी भक्त माझी माता हिन्द
सेवेचाच छंद तिच्या मज ॥१॥

महान तेजस्वी पुत्र प्रसवली
वीर शक्तिशाली हिंदमाता ॥२॥

उच्चपदी माय जगी विराजली
वैभवे गाजली बळे ज्यांच्या ॥३॥

ते माझे पूर्वज रणात झुंजार
चारित्र्याचे थोर बुद्धिमंत ॥४॥

ते माझे पूर्वज महा कर्मयोगी
देशभक्त त्यागी धैर्यशील ॥५॥

स्मरुनिया चित्ती त्यांचे पुण्य पाय
करूनी निश्चय झालो जागा ॥६॥

गेलेले वैभव माझ्या हिंदभूचे
आणून द्यायाचे व्रत माझे ॥७॥

बाणुनिया अंगी शौर्य त्याग स्फूर्ती
दिव्य शक्ती युक्ती अभ्यासीन ॥८॥

अभ्यासीन शील सत्य आणि नीती
शिस्त-निष्ठा-कृती ध्येय माझे ॥९॥

निर्धार साहस संयम विवेक
यांचा उपासक श्रद्धावान ॥१०॥

मी ही हिंदमाता पुन्हा भूषवीन
वैभवे नवीन जगतात ॥११॥

हा माझा निश्चय ही माझी शपथ
दावी दिव्य पथ ग्रंथ जगदीशा ॥१२॥

स्थळ

३-९-१९४९

अनुक्रम...... बि: ......
...... नों. क्र. ......

# २८. टिळक-वंदन

दिला या भारता पहिला
धडा ज्याने स्वराज्याचा
नमू त्या लोकमान्याला
दरारा इंग्रजा ज्याचा ॥ १ ॥

स्वराज्याच्या स्वहक्काची
करी ती गर्जना भारी
तयाच्या सिंहनादाने
निनादे हिंदभू सारी ॥ २ ॥

उफाळे चेतना जंगी
जनी देशाभिमानाची
फिदा ज्याच्यावरी जनता
फुले उधळी सुवर्णाची ॥ ३ ॥

तया वंदून भक्तीने
करू या निश्चया आता
बनू बाळापरी मोठे
कृतीने भूषवू माता ॥ ४ ॥

लो. टिळकांच्या पुण्यस्मरणाच्या निमित्ताने

## २९. सद्‌भावसुमांची माळा (जाती-उद्धव)

तव पुण्यपदी, तिलका ! ही सद्‌भावसुमांची माळा ॥ध्रु.॥

जन्मसिध्द स्वातंत्र्याच्या हक्काचे फुंकुन शिंग
भरला भारतभू रोमी नवचैतन्याचा रंग
हक्का त्या प्राप्त कराया निर्धार शिकविला तूच
स्वातंत्र्य संगरी जाया शिकविले कराया कूच
परि काळाने तुज नेले
भारता पोरके केले
निस्तेज तेज ते झाले
स्वातंत्र्यस्फूर्तिचे जे तू दिधलेस हिंद मातेला ॥१॥

भारतनव जीवन-दीप विझतो की वाटे त्याला
सध्दर्मधुरंधर गांधी सरसावत सावरण्याला
अनुपम नव उल्हासाने जनमनकण पुलकित झाला
स्वातंत्र्यवृक्ष बापूंच्या नेतृत्वे फुलला फळला
स्वातंत्र्य भारती आले
'जय हिंद' अखिल जग वदले
ते स्वप्न तुझे अवतरले
खदखदा तूहि स्वर्गात हर्षाने असशिल हसला ॥२॥

धरिली परि सुतके कोणी   स्वागतार्थ स्वातंत्र्याच्या
लागली शिजू षड्यंत्रे   पडद्यात मात्र धर्माच्या
दुर्भाग्य हाय ! ये पोटी   नरदैत्य जन्म मातेच्या
जो धजला विझवायाते   दीपाते भारतभूच्या
बापूंचा झाला घात
खवळली आग देशात
मानव्य पडे निश्चेत
स्वर्गासनि बसुनी तूही   असशील ढळढळा रडला ! ।।३।।

स्वर्गस्थ बाळ ! देशाची   बघवे तुज दैना काय ?
थोतांड धर्म पाखंडी   नकळे हे करतिल काय ?
ये रक्षण करण्या बाळा,   जाहली माय असहाय
सोडून स्वर्ग ये खाली   तिज काळ गमे की खाय
येतांना मोहन संगे
घेउनिया येई वेगे
नच धरवे मन आवेगे
अवतीर्ण दावण्या व्हावे   सन्मार्ग हिंददेशाला ।।४।।

नागपूर, १-८-४९

कविवर रवींद्रनाथ टागोर यांस

# ३०. श्रद्धांजली

(जाती–चंद्रकांत)

धन्य धन्य तो मान्य कवीवर रवी निखिल जगती
दीप हरपला, कीर्ति अमर परी सदैव लखलखती ।।१।।
आज्ञानाच्या तमी काव्यकर तेजस्वी ओती
भारतात नच केवळ जगती उज्वल ती ज्योती ।।२।।
अखिल जगातिल मानवतेच्या सेवेचा धर्म
मर्मी धरुनी साहित्याचे साधियले कर्म ।।३।।
महाकवीश्वर वाग्देवीचा मुकुटमणी ठरला
विदवज्जनगुरुपदा पावला, मुक्तीने वरला ।।४।।
मानवतेच्या धर्माचे तुज सार खरे कळले
हीन–दीनता जनि पाहुनी तव अंतर कळवळले ।।५।।
शांतिनिकेतन तुझे सचेतन जननकण करिते
मंगलतेची नवी प्रेरणा मनोमनी भरिते ।।६।।
हिंदसंस्कृती थोर, थोरवी तिची जगा दिसली
त्वत्कार्याने, रूपाने तव उच्च पदी बसली ।।७।।
रवींद्रनाथा ! भारतभूषण दिव्य तुझी मूर्ती
अंकित अमुच्या मनी करी, तव वितर अम्हा स्फूर्ती ।।८।।
काव्यकला साहित्यसाधना दिव्य तुझी देवा !
तिच्या कणाची अंशाने तरि अम्हा घडो सेवा ! ।।९।।
प्रभो ! निकट निज गुरुदेवा दे शांत सदा राहू
सद्गुरुपुण्यस्मरणी भावे श्रध्दांजलि वाहू ।।१०।।

नागपूर, ८–८–१९४१

# ३१. धन्य महात्मा

(जाती-केशवकरणी)

अकस्मात भारतमातेच्या वज्र मनावर पडे
घडाधड कोसळले नगकडे ॥ ध्रु. ॥
डळमळला भूधर पाताळी वीज काड कडकडे
पांगळे हृदय जगाचे रडे
नराधमकृत बापु-घात जव कर्णपटावर पडे
फाडले कान चित्त धडधडे
जाहले सुन्न मन, चेत शुद्ध हरपली
नवलता शांतिची फुललेली करपली
सदधर्म-अहिंसा-प्रवाहिनी लोपली
हाय ! हिंद दुर्भाग्य तुझे, तव शांतिसूर्य मावळे !
कोरती तुज तव सुतकावळे ॥ १ ॥

इहलोकातुन गेले सोडुन बापूजी भारता
स्मृतीची व्याकुळ करते कथा
शिकवि दूत शांतीचा विश्वा मानव्याच्या व्रता
हिन्दस्वातंत्र्य निर्मिता पिता
श्रीकृष्ण, महंमद, इसा, बुद्ध गौतम
की ऋषी दधीची त्यागमूर्ति अनुपम
सकलांचा हा अवतार एक यासम
धन्य महात्मा ! धन्य हिंदभू ! परस्परे भूषती
देवही अश्रु-सुमे वर्षती ॥२॥
तुझ्याविण रे शून्य, महात्म्या ! दलिताची झोपडी
दिसे प्राणाविण पडली कुडी
शोकमग्न नरनारी रडती, रडण्या शब्द न फुटे
जीव जगण्या या जगती विटे

रे रडती पोरे, माय धाय मोकले
अविरत अश्रूजळ नेत्रांमधुनी गळे
ओसाड जाहले तुजविण शेती–मळे
कोण अता दलितांचा वाली? दिव्य दीप काजळे
धीर रे भारतभूचा गळे ॥३॥

महाराष्ट्रभू! तुझ्या कुपुत्रे पिता घेतला बळी
घालुनी गोळी वक्षस्थळी
स्वातंत्र्यास्तव सद्धर्मास्तव लढे मर्द संगरी
मराठा घोर पाप हे करी!
धर करी फास गे, चिर दुरिताचा गळा
तद्रुधिर गळू दे जगापुढे घळघळा
कर आत्मयज्ञ हा नाशाया अघमुळा
शिकव तुझ्या गे सत्पुत्रांना बापूंच्या सद्व्रता
धन्य जे करतिल चिर भारता ॥४॥

पूज्य पित्या रे! पहा आमची केविलवाणी स्थिती
पोरके विकल वीर भारती
आग भडकते हृदयी, जळते चित्त सारखे किती!
शांतवी देउनिया सन्मती
रे दिव्य मार्ग नव तुझ्या कृपेने दिसो
तव सत्य अहिंसा सदा वर्तनी वसो
दुर्बुद्धि–मोह रे कधी अंतरी नसो
युगपुरुषा! ने भारतास तव शाश्वत ध्येयाकडे
देउनी माणुसकीचे धडे ॥५॥

१–२–१९४८

महात्मा ज्योतीराव फुले यांस

# २२. श्रद्धांजली

(जाती-केशवकरणी)

सहस्त्र ज्योतिर्मय ज्योतीबा कार्य अमर रे तुझे
दीप तव दिव्य कधी नच विझे ॥ध्रु.॥

समाजरचना सडत चालली कपट ढोंग माजले
पाहुनी हृदय तुझे भाजले !
मानवचित्ती पशुता शिरली माणुसकी जंगली
भटांची कपटकृती रंगली ॥
अधिकारी जे का धर्माचे म्हणविती
त्यांनीच सोडिला धर्म, अधर्म किती
आचरती छळती जनसामान्या अती
समाजात बाजार भुतांचा भरला तो पाहता
मानवी मन तव पावे व्यथा ॥१॥

बिग आणण्या मान्यवरांचे शिंग घेउनी करी
कार्य तू घेतलेस रे शिरी ।
सुधारणेच्या भेरी झडल्या, नाद घुमे अंबरी
पोचला समाज रोमांतरी ॥
तव सत्यशोधगर्जना ऐकता झणी
पाखंड झाकुनी तोंड पळाले क्षणी
तो घुमे आजही अमुच्या कानी ध्वनी
जातिभेद करु नष्ट आमची हीच प्रतिज्ञा असे
स्मृती तव अमुच्या चित्ती वसे ॥२॥

समाज रोगे जर्जर झाला जातियतेच्या, तुझे
हृदय तव दयामृताने भिजे ।

स्त्रीजातीच्या दलितत्वाने विचलित हो त्वन्मती
पुढे तू धजशि निवारुन भिती ॥

पतितांचा झाला तूच प्राण नरवरा
शिक्षित महिलांचा तूच खरा आसरा
सद्भावधुरिण तू सुधारणेचा झरा

महात्मता तव अमर जोवरी रवितारे चमकती
वसे तव तेज तसे भारती ॥३॥

१७-११-१९५०

# २३. सुभाषा, अमर तुझी घोषणा

सुभाषा, अमर तुझी घोषणा ॥धृ॥
परवशतेच्या दृढ पाशांनी
जर्जर दुर्बल भारत जननी
रक्त खवळले तुझे पाहुनी
करिशि क्रांतिगर्जना ॥१॥
महामंत्र 'जयहिंद' तुझा नव
'चलो दिल्लिचे' तंत्रहि अभिनव
स्वतंत्र शासन मंत्रहि दे नव
कणा – कणा चेतना ॥२॥
नवयुवकांनी निजरक्ताने
स्वातंत्र्याची लिहिली वचने
अर्पाया प्राणांची सुमने
तुझीच ती प्रेरणा ॥३॥
स्वातंत्र्याच्या इतिहासाचा
हिरा दिव्य तू भारतभूचा
नेताजी तू नवतरुणांचा
देई फिरुन दर्शना ॥४॥

२३–११–५९

# ३४. धन्य सुभाषा !

(जाती-हरिभगिनी)

धन्य सुभाषा ! देशगौरवा ! नरवीरा ! तू धन्य खरा
दास्यतमिस्त्राग्रस्त भूमिचा मौल्यवान तू दिव्य हिरा ॥ध्रु.॥

देशाच्या स्वातंत्र्यधनास्तव प्राण पणाला लावुनिया
सर्व संकटां हसत साहुनी तेज आपले दावुनिया ॥
उभारून आझाद फौज 'जय हिंद' गर्जना तू केली
भारतभूच्या स्वातंत्र्याची दीपज्योती पाजळली ॥
दिपवि जागा त्वत् क्षात्रतेज रे ! धन्य पराक्रम तुझा खरा
दास्यतमिस्त्राग्रस्त भूमिचा मौल्यवान तू दिव्य हिरा ॥१॥

ऐस कुठेही, आज असे परि हिंद क्रांतिने तव भरला
भारतीय जनरोमरोमि तव मंत्र क्रांतिचा संचरला ॥
वीर वीर जागला येथला स्फूर्तिघोष गगनी शिरला
घोर घोषणा स्वतंत्रतेची ऐकुन इंग्रज हादरला ॥
तुझ्या पावलावरती पाउल ठेवुन मिळवू विजय खरा
दास्यतमिस्त्राग्रस्त भूमिचा मौल्यवान तू दिव्य हिरा ॥२॥

कंकण बांधुन आज निघालो कर्तव्या निज करण्याला
स्वातंत्र्याच्या संग्रामी या विजयी जगण्या - मरण्याला ॥
अखंड हा निर्धार आमचा, मुक्त करू तव सेनेला
नष्ट गुलामी करू, घालवू पार दूर या दैनेला ॥
रक्तमसीने लिहू क्रांतिचा सोनेरी इतिहास खरा
दास्यतमिस्त्राग्रस्त भूमिचा मौल्यवान तू दिव्य हिरा ॥३॥

# ३५. जवाहर चिरायु हो

चिरायु हो, चिरायु हो, स्वतंत्रहिंद कर्णधार ॥ध्रु.॥

अखंड चंडिका-प्रचंड-हिंदभू द्विखंड हो
वितंड वाद माजले, गमे कि खंड खंड हो
मते कितीक भिन्न भिन्न, स्वार्थपूर ये वरी
उफाळली विपत्ति-आग, देश मुक्त हो जरी
अशा स्थितीत ये तुझ्या शिरी स्वमातृदेशभार ॥१॥

सभोवताल आपदा, न अन्न खावया कुणा
न वस्त्र अंग झाकण्या पुरे, न त्राण रक्षणा
कितीक कूट प्रश्न ते, तयांस हाति घ्यावया
सुयोग्य लाभलास तूच नाव पैल न्यावया
सुशोभतोस तूच दिव्य हिंदमातृकंठहार ॥२॥

जहाल क्रांतियुक्त त्वद्विचार हिंद जाणतो
परंतु गांधिभक्तही अनन्य हे न नेणतो
समन्वया तुझ्या न तोड, धन्य दूरदर्शिता
तुझी खरी प्रदर्शिता निजाम-काम योजिता
जगात राजनीतीचा तुझ्या उदंड हो प्रचार ॥३॥

पुर्नानिवास – संप्रदायवादरोध – साधना
विकासयोजना जनांस दे नवीन चेतना
तुझ्याच या कृती; ' अराम हो हराम ' घोषणा
अमोल, लोकसेवकास देइ स्फूर्तिचेतना
हितार्थ आमच्या सुधीर तूच साहशी प्रहार ॥४॥

प्रदीप्त कोरिया, तसाच हिंदचीन दीन हो
अशांत विश्व पाहता तुझ्या मनास शीण हो

प्रयत्न थोर सार्थ रे तुझे, जगास शांतता
दिली तुवा, जगात ख्यात नीतिच्या तुझ्या कथा
तुलाच श्रेय, हिंद घेइ आज आशिया-पुढार ॥५॥
असाच ऐस अग्रणी अनंत काल भारता
उगाच का विवाद ? 'कोण तू पुढार त्यागता ?'
तुझीच स्फूर्ति जन्मदा असंख्य लोकनायकां
असे, सदैव ऐस रे धुरीण स्फूर्तिदायका
जवाहरा, 'तुझ्याविना कसे ?' नकोच दुर्विचार ! ॥६॥

## ३६. नेहरु काका (जाती-पादाकुलक)

आमुचा नेता वीर जवाहर
भारतभूचा लाल खरोखर ॥ ध्रु. ॥
दीर्घकाळच्या परवशतेतुन
भारतभूचे करण्या मोचन
पणास लावुन सारे जीवन
सेनापति हा करि किल्ला सर ॥१॥
प्रधानमंत्री लाभे असला
भाग्याचा ठेवाच गवसला
हिंद मान्य जगि होउन बसला
कारण याला एक जवाहर ॥२॥
हवे सदोदित नेहरू काका
मग देशाला कसला धोका ?
तोच राखण्या लौकिक बाका
आम्हा देवो बुद्धी ईश्वर ॥३॥

कवि कुलशिरोमणी-केशवसुत-जन्मशताब्दीच्या
निमित्ताने

## ३७. भावपुष्पांजली (सुनीत–शा. वि.)

तेजःपुंज युगी नव्या झळकला जो काव्यदेशी हिरा
रूपाने कविता नवीन नटली अन् अंतरी ठाठली
झाली मानवनिष्ठ शक्ति अतुला अंगी तिच्या साठली
याचे श्रेय जयास, जो युगकवी सत्प्रेरणेचा झरा ;

बंडाचे धरुनी 'निशाण' निघता जोमे 'शिपाई नवा'
त्वेषे कर्कश फुंकिता गगनगा नादे 'तुतारी' बळे
रूढींचे बळ तै चळे, तरुण तद्दास्यातुनी मोकळे
होती, 'स्फूर्ति'–बळेच जागृत करी जो निद्रितां बांधवां;

'आम्ही कोण ?' वदूनिया प्रकटवी शक्ती कवीची भली
नादानावर जो खुशाल अपुली हाणी झणी 'गोफणी'
ज्याच्या त्या प्रतिभेमुळेच कविता ही आजची शोभली,
सर्वां मान्य अनन्य, केशवसुता ! तो तू कवींचा मणी

वाहूनी अमर स्मृतीस तुझिया ही भावपुष्पांजली
होऊ त्वच्चरणावरी नत; तुझे आम्ही सदाचे ऋणी.

७–१०–१९६६

---

प्रकाशित– 'विकासवार्ता' नोव्हेंबर १९६६ वर्धा, जि. प.

## २८. पुढे चला

(वृत्त-प्रमाणिका)

सबंध विश्व चालले
पुढे, पुढे तसे चला
निराश का उदास का
अजून स्वस्थ झोपला ? ॥१॥

स्वतंत्र देश आपला
न चैन पंथ हा बरा
रडावया सडू नका
करा पराक्रमा करा ॥२॥

परस्परात भांडुनी
नका फुका करू रणे
मिळून सर्व एक व्हा
झटा स्वदेश - कारणे ॥३॥
महान हिंद हो जगी
अशीच रे कृती करा
नका धरूच आळसा
उठा चला पुढे सरा ॥४॥

ऑगस्ट १९५१



मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे, स्थळप्रत
अनुक्रम ८०८०० दि: नागरद
क्रमांक ९६०९ नों. दि: २१३१६८

# ३९ भारतभूचे बालक आम्ही

भारतभूचे बालक आम्ही शिकू बनू विद्वान
प्रचंड उद्योगाने भूवर करू स्वर्ग निर्माण ।।ध्रु।।

पराक्रमी मी होइन सैनिक महावीर बलवान
सज्ज कराया मातेसाठी प्राणांचे बलिदान ।।१।।

समाजसेवक होइन मी, जे दीन दलित निस्त्राण
सेवा त्यांची करीन झाडिन देशामधली घाण ।।२।।

मी सीतेसम माता होइन वीरमण्यांची खाण
भारतभूषण होइल माझे एक एक संतान ।।३।।

शेतकरी मी होइन मजला ठाउक नच आराम
जगवायाचा देश करिन हे आनंदाने काम ।।४।।

मी शिक्षक होईन कार्य मम संतत विद्यादान
माझे देशाधार शोभतिल विद्यार्थी गुणवान ।।४।।

लेखक मी होईन, करिन मी ग्रंथरत्न निर्माण
रहायचे नच आज्ञानाचे मुळीच नावनिशाण ।।६।।

होइन मी संशोधक लाविन शोध नवीन महान
सुखी कराया मानव देइन निसर्गास आव्हान ।।७।।

राष्ट्रसंत मी होइन माझा मानवधर्म प्रमाण
शिकविन कुणि नच उच्चनीच मग मानव सर्व समान ।।८।।

हराम हो आराम युगाचे नव्या तुम्हा आव्हान
क्रियाहीन परपुष्ट खचित ते कुसंतान नादान ।।९।।

१९५७

# ४०. ऋतूंचे गाणे

गाऊ आनंदाने ऋतूंचे गीत
ज्यांचे चक्र करी सर्वांचे हीत ॥ ध्रु. ॥

वसंत उन्हाळी देई आनंद
चैत्र वैशाखात लग्नांचा मोद
मोहरल्या वृक्षी कोकीळ गाती
शेतकरी थोडी घेई विश्रांती ॥ १ ॥

ज्येष्ठ आषाढ हा ग्रीष्माचा काळ
उन्हाळ्याचा ताप दे त्रास फार
अंगाची हो लाही, घामाची धार
वर्षाऋतू आता येई भूवर ॥ २ ॥

श्रावण भादवी पाऊस फार
शेतकऱ्यावरी कष्टाचा भार
रानात जनात मनात शांती
वनदेवी गीत आनंदे गाती ॥३॥

हिवाळ्यात येई शरद राजा
आश्विनी कार्तिकी चंद्राची मजा
कोजागरी-मोह मनात दाटे
दिवाळी नेहमी हवीशी वाटे ॥ ४ ॥

येता हेमंत हो थंडीचे बंड
मार्गशिर्ष पौष कापवी खंड
शिशिराचा होता आता प्रवेश
सोसाट्याचे वारे देती ते त्रास ॥ ५ ॥

माघामध्ये थंडी वाजत गाजे
फाल्गुनाच्या अंगी सौम्यता साजे
होळी आली मोदे मन हो शांत
प्रवेशाया पुन्हा उभा वसंत ॥ ६ ॥

नोव्हेंबर १९३९

# ४१. घामात सुखाचे धाम

अंगाचा गाळा घाम । करा रे काम
राबून सतत करि काम
तयाच्या ठायि वसे श्रीराम ॥ ध्रु. ॥
दुसऱ्याचे पिउनी रक्त जो जगला
ढेकूण जसा परपुष्ट फुगलेला
धिक्कार ! गणा हे ठाम
खरोखर हो आराम हराम ॥ १ ॥
रे कष्ट कराया लाज धरता का ?
श्रम देव खरा त्या दूर करता का ?
घामात सुखाचे धाम
जगाला कामकरीच ललाम ॥ २ ॥

नोव्हेंबर १९४७

# ४२. डुरडुब् डुरडुब्  ( जाती - बालानंद )

डुर्डुब् डुर्डुब् गारोडी  आला आला खेळगडी  ॥ ध्रु. ॥

चंपू  गंपू  उठा चला   चंदू  गोंदू चला चला
सिंधू बिंदू  बंधू चला   करी मजा  डुर्डुब्वाला
बाळे  आली
भवती  जमली
रंगुन  गेली
डोलु लागली ती सारी  डुर्डुब् डुर्डुब् भान हरी ॥१॥

छू मंतर्  एक् दोन  तिन् चार्  रुपये बनले छन्छन्दार्
मजा दाखवी हंडीबाग्   पुंगीवरती डोले नाग्
पोरे  हसती
टाळ्या देती
डोलत  वदती
गम्मत जम्मत खूप गड्या  आनंदाने देति उड्या  ॥२॥

शाळेचा  अभ्यास  घरी   पडु दे, पर्वा कोण करी ?
'चंदू' आई  शोध करी   गुलाम गेला पळुन  दुरी
शोधुन  दमली
त्रासुन  गेली
तापुन वदली
ये घरि तर घेइन गुच्चा  चोपहि देइन तुज लुच्चा ! ॥३॥

डुर्डुब् डंका खेळ खलास्   गेली पोरे घराघरास्
चंदू  दिसला  उभा पुढे  'अरे लबाडा !  ये इकडे
गध्ध्या  येई'
बोले  आई
'देत्ये घेई
पाठित धम्मक लाडु कसा  गोड  मजेने खा खासा' ॥४॥

पोर चंदु परि छाट खरा;  'आई, डुर्डुब् पहा जरा'
म्हणे 'डुर्र  डुर्डुब् डंका  मंतर छू गारोडीका !'
करी  हुबेहुब
'डुर्डुब् डुर्डुब्
छट् छू अबबब!'
रागाचे झाले पाणी   धरला पोटी 'बाळ गुणी' ॥ ५ ॥

१६-१२-१९४१

# ४३. बालवीरांचा कॅंप फायर

बालवीर आम्ही शूर  पेटवू प्रखर कॅंप फायरऽ ॥ ध्रु.॥

देव नी देश शासनऽ

या साठि  प्राण वाहुनऽ

आदर्श सर्वही गुणऽ

बाणून सदा राहू कर्तव्यी परऽ ॥ १ ॥

दुर्बल क्षीण पीडितऽ

करु साह्य तयांना नितऽ

असु सत्कार्यातिच रतऽ

बल बुद्धि नीति नी सत्याचे  चाकरऽ ॥२॥

जे अनीति दुर्जन खलऽ

उन्मत्त दावती बलऽ

अबलांवर करती छळऽ

सामर्थ्ये करु या त्यांचा चक्काचुरऽ ॥३॥

आपदा व्याधि यांवरऽ

करु विजय देउ टक्करऽ

राखू या अपुले  घरऽ

दुर्दशा करू या आहुत अग्नीवरऽ ॥४॥

झणि उठू बांधु कंबरऽ

जागवू सर्व रणधिरऽ

गाजवू शौर्य–संगरऽ

करु स्वतंत्र भारत तेजस्वी भास्करऽ ॥५॥

२०–१२–४१

प्रकाशित, 'आनंद' पुणे, जाने. ४२

## ४४. जय हिंद

( जाती–आनंदकंद )

जय हिंद घोष माझा । जय हिंद घोष माझा ॥ध्रु.॥

मी भारती शिपाई
मरणास भीत नाही
मी सज्ज युद्धकाजा । जय हिंद घोष माझा ॥१॥

मी अर्पिले जिवाला
हिंदी स्वतंत्रतेला
स्वातंत्र्य हक्क माझा । जय हिंद घोष माझा ॥२॥

मद्देश हिंद देवी
बहु वैभवे नटावी
आदर्श हाच माझा । जय हिंद घोष माझा ॥३॥

माझीच झोपडी ही
नच तीसमान काही
हा स्वर्ग देव माझा । जय हिंद घोष माझा ॥४॥

गिरिराज तो विशाल
तद्दिव्य भव्य भाल
देई जगा सुतेजा । जय हिंद घोष माझा ॥५॥

मी येथ बाळ राणा
माझी प्रताप–सेना
उतरील शत्रुमाजा । जय हिंद घोष माझा ॥६॥

वरती ध्वजा तिरंगी
चढवू लढून जंगी
निर्धार घोर माझा । जय हिंद घोष माझा ॥७॥

# ४५. राष्ट्रध्वज हा चढे (जाती–पादाकुलक)

राष्ट्रध्वज हा चढे तिरंगी ॥ध्रु.॥

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

हिंदभूमिचा मान तिरंगी
स्वातंत्र्याचा प्राण तिरंगी
ज्यास्तव लढलो संगर जंगी
राष्ट्रध्वज हा चढे तिरंगी ॥१॥

जगास दावी नवल तिरंगी
सत्याचे यश धवल तिरंगी
साम्राज्याची फुलली पुंगी
राष्ट्रध्वज हा चढे तिरंगी ॥२॥

मानवतेचा विजय तिरंगी
शांतीचा हा उदय तिरंगी
बघुन गळे अनयाची नांगी
राष्ट्रध्वज हा चढे तिरंगी ॥३॥

फडके नभि डौलात तिरंगी
स्फुरण विलक्षण अमुच्या अंगी
याच्यासाठी मरू प्रसंगी
राष्ट्रध्वज हा चढे तिरंगी ॥४॥

१५-८-५३

## ४६. फुगे !

किति सुंदर सुंदर फुगे
फुगे किति सुंदर सुंदर फुगे ॥ध्रु.॥

काळे हिरवे निळे तांबडे
नाजुक काही काही जाडे
लांब काकड्या, लहान-मोठे
पुंगीवाले – उगे ॥१॥

एक भोपळ्याइतुका फुगला
हा दुसरा फट् पटकन् फुटला
असेच फुगतिल लगेच फुटतिल
देतिल सारे दगे ॥२॥

फुग्यापरी संसार चिमुकडा
क्षणात उठुनी फुटे बुडबुडा
सागर भरला पडे कोरडा
होती वैरी सगे ॥३॥

अधम हवेने नकोच फुगणे
सन्मानाचे जीवन जगणे
फुगल्यावाचुन, बालसख्यांनो!
शिकेल तो जगि जगे ॥४॥

# ४७. किरसान दादा

अहो किरसान दादा । खांद्याला खांदा
भिडवुन रुमनं धरा रऽ । पेरनी करा ।। ध्रु.।।

पहिलाच आला मिरगाचा पानी
आता नाही बसायचं घरात कोनी
राजा असो किंवा लाडाची रानी
कुनबी रऽ सारं । कारभारनी पोरं
वावरात मोती पेरा रऽ । पेरनी करा ।।१।।

सरत्यात धरु आम्ही मोत्याचि धार
अन् धरतीला वाहू हिऱ्याचा हार
धरतीचं रूप आता हिरवं हिरवं गार
शेतात कणसं । माळ्यावर माणसं
बसून राखण करा रऽ । पेरनी करा ।।२।।

पोरांनी राखायची समद्याची ढोरं
कारभारनी आनताती गवताचं भारं
शिवारातलं गार वारंच न्यारं
उसाची वाडी । रसाची गोडी
हुड्ड्याचा बेत काही न्यारा रऽ । पेरनी करा ।।३।।

चाला सारं इळे हातात घ्या रऽ
आता लुटुन सोनं घरात न्या रऽ
अन्नाचा घास अन् जगास द्या रऽ
हिऱ्यांच्या खाणी । मोत्यांच्या गोणी
ढोलीत अपुल्या भरा रऽ । पेरनी करा ।।४।।

# ४८. तांबडं फुटलं

तांबडं फुटलं शिवार उठलं
गार गार सुटलं वारं नवं
चाला रऽ सारं सवं सवं
बुढीचं खाटलं, आभाळी मिटलं
तेजाचं फुटलं पेवं पेवं
चाला रऽ सारं सवं सवं ॥१॥

उठा हो दादा उठा गो बाई
वेळ झोपेची नाही, वेळ झोपेची नाही
उठा सारं करा निघायची घाई
तिमीर तुटलं, तुफान हटलं, रातीचं फिटलं
सारं भेव ॥२॥

दादा हुश्शार रऽ आली टोळांची धाड
हाणा पल्याड रऽ होईल सारं चिपाड
नाही आता जरा याचा करायचा लाड
टोळानं लाटलं, खाईत लोटलं, आभाळ फाटलं
धरा चेव ॥३॥

राजा, गाफिल बसला आतावरी
राजा, अनाडी राहूचलास आतावरी
दिल्या सावकार चोरानं हाती तुरी
शिवयाचं लुटलं, बोक्याचं पटलं न् सावानं लुटलं
केला डाव ॥४॥

साऱ्यांनी करायचं समद्याचं काम
आराम मानायचा आता हराम
टपटप गाळायचा कष्टाचा घाम
घामानं किटलं, मातीनं नटलं, पण जोसानं पेटलं
सारं हवं ॥५॥

दुपारी पडता अंगार पोटी
ठेवायची समद्यांनी कांबळी काठी
पाटाच्या काठावर सोडायची रोटी
भाकर पिठलं, पोटात लोटलं, अंगात दाटलं
तेज नवं ॥६॥

सम्दं चाला धरून हातात हात
आता नाही कधीबी बेकीची बात
पाणी काढू जिथं मारू या लाथ
एकानं म्हटलं, साऱ्यांना पटलं, भेदाचं कुठलं
इथं नांव ॥७॥

वावर भरलं वाऱ्यात डोले
माणिक मोत्यांनी भरले ढोले
राजाची राणी नखऱ्यात बोले
भंडार साठलं, म्हणावं वाटलं, गोठाचं पाटलं
मला घ्यावं ॥८॥

## ४९. उषेस-

का उषे लाजली, भ्याली ? गालावर चढली लाली ।।ध्रु.।।
केशरी शालु जरतारी   नटलीस नेसुनी भारी
लावण्य तेज तव बाई   उजळते दिशा बघ दाही
सौंदर्य – बाग बहरली
कळी उमलली । पसरवी गंध
का गोंधळ ? मन का धुंद? ।।१।।

अनुरक्त सुंदरी बघते   नाथाची वाटे वाट
लाजून, मनी सळसळते   प्रणयाची चंचल लाट
साजणा, कुठे थांबला ?
वेळ चालला । मनी हुरहूर
प्रीतीचा चित्ती पूर ! ।।२।।

चोरून आडुनी बघती   कुणि खटचाळ अवखळ पोरी
जाणताच मंजुमुखीची   तारांबळ उडते भारी
लाजली वाढती लालि
कोवळ्या गालि । चढे, चित्तात
' हे बळे उशिर करतात ! ' ।।३।।

रजनी गे गेली गेली   ही तुझीच आता वेळ
संकोच सांडुनी बाई   मनसोक्त रंगुनी खेळ

का तुला मनी वाटते
कुणी पाहते । होशि भयभीत
विपरीत परी ही रीत' ॥४॥

मोकळ्या प्रीति–मैदानी पक्ष्यांचे कूजित होई
बागेत लता मौजेने हासती डोलती, पाही
मी इथे ठाकलो उभा
बघाया प्रभा । परी ओशाळी
झालीस गडे या वेळी ॥५॥

बघ, झालिस गोरीमोरी समजलो कारणे सारी
परि अजुन अशा प्रीतीचा अनुभव नच मज जातीचा
अन् मी उभा राहु दे
मनी होउ दे । थोडकी जोड
मन रूक्ष होउ दे गोड ॥६॥

या माझ्या स्पष्टोक्तीचा का तुजला आला राग ?
पण चुळबुळ,ललिते, चित्ती चालली कशाची सांग
बघ उभा सखा दिनमणी
पूर्व–अंगणी । रंग गे त्यात
निज अनुरागाचा ओत ॥७॥

३०–८–१९४१

# ५०. रुखरुख

( छंद–देवीवर )

माझ्या नाजुक् चमेलीचं कसं कोमावलं मुख
तिचं कोमावलं मुख माझ्या मनी रुखरूख ॥१॥
आला वसंताचा भर बहारीची फुले बाग
नव्या नाजुक रूपाचा खुले डौलदार रंग ॥२॥
लावण्याची होय सीमा ओसंडतो रस मस्त
भारी केली विधात्यानं मूस ओताया शिकस्त ॥३॥
बाई ! कोवळ्या कळीच्या नेत्रकटाक्षाचा खेळ
ऐसा कोण शुकयोगी ज्यास करीना घायाळ? ॥४॥
ऐन रंगातली बाग आज दिसते भयाण
चमेलीचं मुख म्लान फिकं सारं सुनं सुनं ! ॥५॥
शुभ्र मोहक ग कांती तेजे मारावी भरारी
आज काहीही दिसेना सोनुलीच्या मुखावरी ॥६॥
नेलं तेज वरपून कोणाची का लागे दृष्ट ?
किती बोचती मनाला माझ्या छबेलीचे कष्ट ! ॥७॥
काय झालं ? भ्याली का ग ? मनी ओशाळशी खूप
कोणी उनाड पाखरू जाय मारुनी झडप ? ॥८॥
आवडे का मुक्त रान ? मन मारतं उड्डाण
जीव बंधनात येथ म्हणुनी का ग बेचैन ? ॥९॥
ऋतूचा ग वारा गार वाहे फार सोसाट्यानं
नाही सोसवला काय त्याचा थंडावा नादान ? ॥१०॥
किंवा पडू न दे चैन कोणी उद्दाम भोंगूळ
खूप सतावतो खूप त्याची लागे चुळबूळ ? ॥११॥

किंवा बहराचा काळ
कोणी हुंगाया न येई
की जो हृदयी रसिक
स्वाद घ्याया भलताच
काही कळेना, सुचेना
माझ्यासाठी तरी पोरी
१९४४

मन फार आतुरलं
काय रसिक रंगेल ? ॥१२॥
ढुंकुनीही तो पाहीना
येई; त्याची खंत मना ॥१३॥
मन माझं झालं वेडं
हास एकदाच गोड ॥१४॥

# ५१. तुझ्या वाटेकडे डोळे

( जाती-जीवकलिका )

कुणाला रे सख्या सांगू
भरारी सज्ज माराया
मनाचे दु:ख हे सगळे
हृदय, त्या विद्ध तू केले ॥धृ.॥

न जाणे मी, कशाला तू
कुठे जाशी बरे आता
सुमन शर फेकिला राजा
मनाते बोचती भाले ॥१॥

सहज दृष्टीवरी दृष्टी
बळे चोरूनिया चित्ता
भिडे, हा दोष कोणाचा ?
सख्या चोरा, तुवा नेले ॥२॥

स्वये ये तीव्र हृदयाची
मना देई परत, किंवा
कराया वेदना शांत
तुझ्या वाटेकडे डोळे ! ॥३॥

# ५२. उल्कापात ( जाती-पादाकुलक )

अचानक सुटला झंझावात
भग्नचित्त ही पुत्रवियोगे
करि माता आक्रांत ॥ ध्रु. ॥

वेडी आशा वेडी माया
हृदयी फुलली गेली वाया
ज्योत सुखे उजळली अंतरी
विझली एक क्षणात ॥ १ ॥

वार्धक्याचा एक आसरा
अंधलोचना एकच तारा
तेजहीन, तुटुनिया नभातुन
झाला उल्कापात ॥ २ ॥

प्राण हरपला जड हे उरले
स्वप्न जेथले तेथे विरले
अता कासया, वेडे ! फिरशी
शुष्क भैरवी गात ? ॥ ३ ॥

ये काळा ये प्रलया रुद्रा
व्याप धरित्री क्रुद्ध समुद्रा
अबला सबला सज्ज निरंतर
सोसाया आघात ॥ ४ ॥

१९४९

# ५३. हुरहूर

आज ना कळे अवचित का हे
                हृदय धडधडू लागे
सांग पाखरा सांग येउनी
                कुशल सख्याचे वेगे                ॥ ध्रु. ॥

क्षणात तडतड लवू लागली
                डोळ्याची पापणी
अडखळली का नभी चमकता
                शुक्राची चांदणी ?
दीपशिखेचे उदासवाणे
                तेज सले मन्मनी
रुचिर चंद्रिका मळकट केली
                व्यापुन निर्दय ढगे                ॥ १ ॥

आर्त अवेळी ओरड चिमणी
                घरट्यामध्ये करी
श्वान भयानक सूर धरी, तो
                बोचे हृदयांतरी
धस्स मनी हो, काहुर माजे
                चिंतिचे अंतरी
हृदया ही हुरहूर लागली !
                चित्त न क्षण हो उगे                ॥ २ ॥

१९५०

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रमांक ... दि: ...
(६१)

## ५४. शबरी-भक्ती ( जाती-पादाकुलक )

उसळले भाव तरल हृदयात
आला काननि सीतानाथ ॥ ध्रु. ॥

भक्त हरीची शबरी भोळी
आळवि प्रभु निज हृदयांदोळी
दर्शन द्याया तो वनमाळी
आला भक्ताच्या सदनात ॥ १ ॥

हर्षा नुरली सीमा आता
कसले भवभय ? कसली चिंता ?
श्रीरामाचे दर्शन घडता
चमकले तेज नवे नयनात ॥ २ ॥

सत्प्रेमाची फळे आणिली
स्वमुखे ही चाखुनिया सगळी
रुचिल प्रभु तुज पाहुन असली
घेई गोड करुन रघुनाथ ॥ ३ ॥

जन्मजन्मिची दासी राया
प्रभु वणवण फिरली भेटाया
तुझेच मन हे तुझीच काया
रामा ! स्वीकारी पदरात ॥ ४ ॥

२५-११-१९५२

# ५५. सकाळी

उमलल्या पुष्पांच्या पाकळ्या ॥ध्रु.॥
शशिरायासह खेळ खेळता
हिंदोळ्यावर निळ्या
स्वर्गबालिका सकल विसावा
घ्यायाते परतल्या ॥१॥

मौन निशेच्या छटा सर्वही
अंधुकशा जाहल्या
रुचिर उषेच्या पायातिल मृदु
रुणझुणती साखळ्या ॥२॥
पक्षी गायन करित निघाले
घरट्यांतुन आपल्या
पाजाया निजवत्सां प्रेमे
धेनू पान्हावल्या ॥३॥
पूर्वेच्या आरक्त भावमय
वदनावर लाजल्या
भास्करकरस्पर्शने नाजुक
लहरी हेलावल्या ॥४॥
गोपसुंदरी नीरमिषाने
यमुनातटि थांबल्या
चल हरि मुरली ऐकव फुलवी
त्या सुमनांच्या कळ्या ॥५॥

१०-११-५३

## ५६. सखे, शिवारी ग ऽ (जाती-पादाकुलक)

सखे, शिवारी ! सखे, शिवारी !
सखे, शिवारी गऽ ॥ध्रु.॥

भरी बहरली पोपट काळी
चवळी कवळी लज्जित झाली
लवल्या नवनवतीच्या भारी
तुरी जवारी गऽ ॥१॥

मोटेवर मी रसिक भुकेला
श्रमलो सोडुन क्षणभर बैलां
त्या आंब्याच्या खाली छाया
बसे शिदोरी गऽ ॥२॥

तुझीच अवचित पडली छाया
नयनी भरली कोमल काया
पुसता भिजल्या घाम तनूचा
ऐन दुपारी गऽ ॥३॥

खेळ स्वप्नसा गे तो वारा
भरवी हृदयी अद्भुत सारा
रमेचना हे मन कोठेही
खुळे विकारी गऽ ॥४॥

१९५४

# ५७. वसंत फुलला मनी

सखि,

तुझ्याच मनिचे गुपित
तुला ना कळे, तुला ना कळे
पण पुरते ठावे मला
बोलती तुझेच डोळे खुळे ॥
दाटली नव्हाळी उरी,
नवल अंतरी चित्त चुळबुळे
थरथरती नाजुक ओठ
वदाया परी मुके पांगळे ॥
की श्रावणमासी दाट
घटा अंबरी भाव खळबळे
अंगात रोमरोमात
विलक्षण लोल लहर सळसळे ॥
कुणि निराकार येऊन
मृदुल वाजवी प्रणय खुळखुळे
गुदगुल्या, मनी लाजता
गुलाबी गाल, उमटले खळे ॥
भलभलत्या नव कल्पना
उठविती तुझ्या मनी वादळे
गे! वसंत फुलला मनी,
तोल सावरी टाक पावले ! ॥

७-५-५४

## ५८. येशील का ? (जाती–पादाकुलक)

येशिल का रे ! येशिल का ?
फिरुनी, येशिल का ? ॥ ध्रु. ॥

तुझ्या शराचा घाव उरावर
विरहवेदना होय अनावर
चोळुनिया मृदु स्नेह तयावर
हरुनी नेशिल का ? ॥ १ ॥

निळच्या नभातिल हसती तारा
करी मस्करी अवखळ वारा
कण करुणेचा एक चकोरा
सेवू देशिल का ? ॥ २ ॥

तुझ्या स्मृतीची ताजी जळती
हृदयी अजुनी सखया ज्योती
स्नेहाने निज शाश्वत पणती
होऊ देशिल का ? ॥ ३ ॥

तुझ्या स्वागतासाठी नेत्री
खळले जिथले तेथे मोती
पावन त्यां निज चरणावरती
करुनी घेशिल का ? ॥ ४ ॥

१९५४

## ५९. प्रीतीचे नाते (जाती–कालगंगा)

तीच मी अन् प्रीत माझी
तीच, नाते तेच रे ॥ ध्रु.॥

चांदराती त्या नदीच्या
शीत त्या वाळूवरी
गाठ झाली आपली तो
चंद्र साक्षी अंबरी
मन्मनाचे फूल मी रे
वाहिले तव अंतरी
जाहलो अन् एक दोघे
भेद कोठेही नुरे ॥ १ ॥

दृश्य सारे स्वप्नसे हो
ती स्मृती पण राहिली
सारखे रोखून डोळे
वाट तूझी पाहिली
श्रावणी अतृप्त वेडी
चातकी ही राहिली
आस वेडी ! ही बिचारी
शोधिते ग्रामे–पुरे ॥ २ ॥

या समाजाच्या सख्या ग्या
बंधनाते तोडिले
तूझियासाठी जगाचे
मोह सारे सोडिले

माजती या जीवनाच्या
सागरी जरि वादळे
प्रीतिचे नाते तुझे हो
नाव वल्हाया पुरे ॥ ३ ॥

५-६-१९५४

## ६०. तोष

( वृत्त–सुकामिनी )

क्षीण हाय जाहली
दिव्य दीपकावली ॥ ध्रु. ॥

स्वप्न गोड देखिले
ओढ लागली मनी
स्वागतार्थ रे तुझ्या
दीपमाळ लाविली ॥ १ ॥

लोपली निशा वृथा
स्वप्न रम्य भंगले
पुष्प मालिका करी
म्लान हाय जाहली ॥ २ ॥

वाट पाहता तुझी
चित्त तोषणार हे
लोटती युगे जरी
आस–धार आटली ॥ ३ ॥

१९५०

# ६१. हासली बिजेची कोर

हासली बिजेची कोर
अवखळ बिजली रुचिर चमकली
अंबरि काळचाभोर ॥ ध्रु. ॥

उनाड वारा करी मस्करी
संध्यागाली लाली भारी
लज्जित हो परि नाचु लागला
थय थय थय मनमोर ॥ १ ॥

कृष्णपटल मेघांचे विरले
सरोवरी नवकमल विकसले
प्रीतिगीत गुणगुणत उडे हा
गगनी स्वैर चकोर ॥ २ ॥

१५-११-१९५५

# ६२. नुरे जगी विश्वास

गमते कोसळते आकाश । अंधाराच्या पडे अंगणी
तेजाते गळफास ॥ ध्रु. ॥

हृदयकपाटे ज्याच्यासाठी । धन लुटवाया केली उघडी
लपंडाव तो करी जयाची । धरिली चित्ती आस ॥ १ ॥
फाटे मन हे आशा आटे । घोर निराशा अंतरि दाटे
सुटे धीर ये भोवळ नयनी । नुरे जगी विश्वास ॥ २ ॥

१९४९

## ६३. काय करू ? ( जाती–पादाकुलक )

तुझ्या का आसु गडे नयनात ? ॥ ध्रु. ॥
तोडुनिया रूढीचे बंधन
ममता मातेची ही तोडुन
वैर जगाचे घेउन दारुण
धरिशी माझा हात ॥ १ ॥
माहेरी दस मजली माडी
मिळति जरीची ल्याया साडी
इथे परी पडकीच झोपडी
घामाची बरसात ॥ २ ॥
विपुल विनोदे विभवे भरले
जिणे मोकळे तुज ते स्मरले
म्हणुनी हृदयी वादळ उठले
करित घोर आघात ॥ ३ ॥
या मम जीवन प्रणयोद्यानी
नाजुक मोहक तू फुलराणी
तुला प्रीतिची गावी गाणी
बसवुनि झोपाळ्यात ॥ ४ ॥
परंतु अरसिक निर्मम मी तर
नव्हे हृदय हे नुसता फत्तर !
प्रीतिरसाचा यावा पाझर
कोठुन या दगडात ? ॥ ५ ॥
काय करू अन् कसे करू मी ?
फूल सुकोमल कसे धरू मी ?
तृषे तुझ्या गे कसे हरू मी
रखरखत्या ग्रीष्मात ? ॥ ६ ॥

मे १९५४

## ६४. कामिनी

(जाती–स्नेहसागर)

चित्तसागरावरी प्रीतिचे तरंग हेलावती
लोल लोल मृदुमधुर विणेची गुप्त घुमे झंकृती ।।
वसंत आला बाग फुलांची पूर्ण भरे बहरली
गुलाब फुलले, कमळ विकसले, हसली चाफेकळी
नयनातिल निर्व्याज मुग्धता चंचल बनली सुरी
सहज विध्द ही करिल कुणाही येता वाटेवरी ।।
सळसळे रोमरोमात प्रणयदामिनी
धुंदीत गजापरि मंद मंद कामिनी
चालली ती पहा बावरलेली मनी
वरचेवर पदरास सावरित उगाच जपुनी अती
रसिका ! बघ ती नीट रती की मूर्त, चंचलाकृती ।।

१९५४

## ६५. छेडियली तार कुणी ?

गुणगुणले गऽ कोण मनी
छेडियली तार कुणी ? ।।
क्षितिजावरती चांद उभा
उजळित हा येइ नभा ।
सळसळले जीवन गगनी
छेडियली तार कुणी ? ।।
हसले सर सरसिज हसती
पवनहि नव मंदगति ।
तीच चमक खुलली नयनी
छेडियली तार कुणी ? ।।

थरथरती का ओठ गडे
गालावर रंग चढे ।
आकळले तव काय मनी
छेडियली तार कुणी ? ॥
१९५४

## ६६. ए खट्याळ पोरी (जाती–राजेश्वरी)

खट्याळ पोरी! तोल सावरी तोल सावरी गऽऽ
गोफण धरुनी करी लाविली काय गडे मस्करी ॥ध्रु.॥
मस्त जोंधळा नव नवतीचा भरला हिरवा मळा
राखण करशी झणझण गोफण फिरवित तू कोकिळा
गोड गळ्याची तात लावुनी कापिशि माझा गळा
चव चाखाया हुरड्याची गे आतुरलो सुंदरी ॥१॥
टपोर भरलेली ही कणसं रसिका बोलावती
तुलाच न कळे भाषा त्यांची अरसिक तू गे किती ?
उगाच शिणसी, चाळे तव परि गोड मला लागती
काय करिल तव गोफण ? मी तर जखमी गे अंतरी ! ॥२॥
हात कुशल वर गरगर फिरता रम्य तुझी आकृती
नयनी भरली रेखिव ठसली मनि मदनाची रती
नेत्र धनू तव हृदयावर मम सुमनशरां फेकिती
तुझ्याच हाती गडे जिणे हे, जे वाटे ते करी ॥३॥
१–१२–१९५३

## ६७. जन्मदे*

( जाती–मदनरंग )

जन्मदे ! तुझ्या स्मृतीस लक्ष लक्ष वंदने
आई गे ! मज असार जन्म हा तुझ्याविणे ॥ ध्रु.॥

तूच देह हा दिलास प्राण त्यात ओतिले
आणिक गे ममतेची तूच शिंपिली जले
जीवन मम हे तुझेच सर्व ही तुझी धने
आई गे ! मज असार जन्म हा तुझ्याविणे ॥ १ ॥

जाहला तुझा वियोग अंतरी उठे व्यथा
मातृछत्र नष्ट होय जाळि ती मना कथा
बाळाचे तव अजाण जाहले जिणे सुने
आई गे ! मज असार जन्म हा तुझ्याविणे ॥ २ ॥

लाभली तुझ्या कुशीत दिव्य चेतना मला
लाभली तुझ्या कुशीत स्निग्धता सुकोमला
आणि वाटले तिथेच स्वर्गसौख्य ठेंगणे
आई गे ! मज असार जन्म हा तुझ्याविणे ॥ ३ ॥

पोर पोरके जगात मी जया न माउली
शोध शोधितो परंतु ती दिसे न साउली
आई ! तू असशि कुठे शिणति व्यर्थ लोचने !
आई गे ! मज असार जन्म हा तुझ्याविणे ॥ ४ ॥

नोव्हेंबर १९६४

★ धाकटा पुत्र मेघनाद याच्यासाठी भावगीत स्पर्धेनिमित्त तयार केलेले गीत.

# विचारप्रधान कविता

## ६८. नववर्षाचा शुभ दिवस

(जाती-उद्धव)

स्फूर्ती नव देई आम्हा   नव शुभदिन आनंदाचा ।।ध्रु.।।

मधुवसंत भूवर येता   जनमन खगगण आनंदी
चैतन्य इथें संचरले   वनशोभा भुलवी नादी
    कोकिळा गावया स्फूर्ती
    अनलास सुगंधित शक्ती
देउनी फुलवि सकलांला   शुभ दिन हा नववर्षाचा ।।१।।

सुप्रभात जगती येता   जागृति ये सुप्त मनात
हो कष्ट निवारण सारे   चेतना शिरे रोमात
    पाखरे सुस्वरे गाती
    तरुलता प्रफुल्लित होती
करि कांतीमय जगताला   शुभ दिन हा नववर्षाचा ।।२।।

हा दिवस नव्या वर्षाचा   आनंद सुखाचा दाता
रे प्राप्त करा उत्साहा   जागृत होउनिया आता
    दुर्दम्य चेतना पावा
    शौर्याते जगती दावा
प्रेरणा तुम्हाते देई   शुभ दिन हा नववर्षाचा ।।३।।

१-१-१९३९

# ६९. खेळ

(वृत्त शा. वि.)

पक्ष्याते उडणे, फुला उमलणे, तैसे मुला खेळणे
त्याते डांबुन ठेवणे, उडुचिया पंखा जणू छेदणे
पक्ष्या पंखविणे अशक्य उडणे मुक्तीसुखे वागणे
स्वातंत्र्या मुकणे, मनात झुरणे, वाटे मृदेसे जिणे ॥१॥

पुष्पाते म्हणणे ‘नको मुळि फुलू’ आमोद लाथाडणे
नाही का मधुचित्तरंजक गुणां ह्याणोनिया पाडणे ?
पुष्पाचे फुलणे असे तरि कुणासाठी ? परार्थाय ते
त्याची मोदसुगंधिता न इतरां, का त्या स्वता रंजते? ॥२॥

बाळाने मनसोक्त खेळि रमणे हा सृष्टिचा कायदा
त्याते मोडुन कूपमंडुक करा, हा एकची फायदा !
बाळा मानवजीवनी जगविणे शौर्ये जगी हे जरी
तुम्हाला रुचते, तया बसवुनी ठेवू नका हो घरी ॥३॥

चिंता सर्व मनातल्या विसरुनी क्रीडांगणी खेळणे
झाले प्राप्त जरी उदंड यश ना गर्वा मनी घोळणे
होता प्राप्त पराभवे न लवही यावी निराशा मनी
यत्ने संघबळे यशा मिळविणे, हा बोध खेळातुनी ॥४॥

खेळाचा महिमा अपार, जगता हा खेळ संचालवी
खेळाने घडले पराक्रम, भले झाले सुधी सत्कवी
नेते थोर ऋषीमुनी सकळही खेळातुनी वाढती
खेळानेच प्रसन्नता बहुविधा ही लाभली संसृती ॥५॥

१५-९-१९३८

# ७०. यशोदीपमाला (वृत्त–सुमंदारमाला)

असे दाटले दाट ते युध्दक्षेत्री, महावीर झुंजार त्वेषे बले
कला दाविती युध्दनैपुण्य होती भितीग्रस्त ती त्रस्त शत्रूदले ।
अशा दैन्यि होई पुढे एक तो धीर, बोले 'लढा' देइ स्फूर्ती नवी
मुळी खिन्न नाही जरी छिन्न होई, यशोदीपमाला खरी चेतवी ॥१॥
बघा स्नेहसंमेलनी बालकांच्या किती चालती सामने–शर्यती
करी यत्न प्रत्येक बाजू वराया जया, रक्षण्या–मारण्या झुंज ती ।
मनी धैर्य गांभीर्य, देऊन स्फूर्ती गडचांच्या मनी तेज जो वाढवी
मुळी खिन्न नाही जरी छिन्न होई, यशोदीपमाला खरी चेतवी ॥२॥
अरे! त्रास देती तया भास्कराला मुळी झाकुनी मेघ सारे किती!
तरी धैर्य तो स्थैर्य सोडी कधी का? निराशा कशाची तयाला क्षती?
पहा धाकवी त्यां पराभूत अंती पळायास लावी स्वतेजे रवी
मुळी खिन्न नाही जरी छिन्न होई, यशोदीपमाला खरी चेतवी ॥३॥
तमी झाकली हिंदमाता रडे होउनी व्याकुला पुत्र ते झोपती
जरी नष्ट हो थोर सर्वस्व, नाही मुळी घोर रे निर्भये घोरती ।
अशा आपदी जो स्वयंस्फूर्त धैर्ये निघाया रणी बांधवा जागवी
मुळी खिन्न नाही जरी छिन्न होई, यशोदीपमाला खरी चेतवी ॥४॥

३–७–१९४०

प्रकाशित–" वऱ्हाडशालापत्रक " अमरावती, सप्टेंबर १९४०

# ७१. भारतीय तपस्वी (वृत्त-सुमंदारमाला)

तुझ्या होमशाळेत होमाहुती त्वद्वपूची अहोरात्र रे चालली
तुझ्या दिव्य जातीय पूर्णाहुतीने जगी जीवजाती सुखा पावली ।
खरा ब्रम्ह तू, कर्षका, अन्नदाता ! तुझे रक्त या सृष्टिला पोसते
परी दैन्य व्हावे तुझे भारती, ही सदा कल्पना मन्मना बोचते ॥१॥

तुझी अर्धनग्नाकृती कृष्णमूर्ती गुरां हाकता वा हला वाहता
सुखे राबता, कष्टता आतपी, घर्मधारेत रे नाहता पाहता ।
कृतघ्नांवरीही दया वर्षता, त्यागता स्वार्थ नी झुंजता आपदी
खरा कर्मयोगी, खरा शौर्यभागी! झणी वाकते शीर्ष हे त्वत्पदी ॥२॥

नसे चाड काहीच मानाधनाची, जगाचे तुला तुच्छ ते चोचले
परी राहुनी मग्न कर्मात निःस्वार्थ आम्हास ते सर्व देशी भले ।
फुले रानराई , हसे सृष्टिमाई, मुदे पाखरे कूजती गायने
महावत्सला हुंबरे गाय, सारी तुझ्या जीवनाचीच ही चित्रणे ॥३॥

तुझ्या दर्शने किल्मिषे नष्ट होती, शिवेना मना पातकी वासना
तपस्वी ! परी आज रे पाहवेना तुझी चालली घोर निर्भर्त्सना
असोनी विवस्त्रांस तू वस्त्रदाता नशीबी तुझ्या नग्नता भारती
घरी अन्नदाता उपाशी रहावा, अशी भारताची महा संस्कृती! ॥४॥

२०-९-१९४५

## ७२. आमचे कर्तव्य (वृत्त–सुमंदारमाला)

अम्ही मुक्त झालो ! भ्रमे हर्ष–उन्माद
झाला किती हिंदपुत्रां दिसे !
अहा, खंडिता मातृभू जाहली !
का कुणाला मुळी भान याचे नसे ?
कुठे लोपले मानवी शील ?
सारी पिशाच्चे इथे का घुमू लागली !
कसे मुक्तता–मूल्य आम्हा कळावे,
सदा स्वार्थतृष्णा जयां लागली ? ॥ १ ॥
क्षणी आज स्वातंत्र्य येता घराला
पुढारी पुढे होउनी धावलो
सुसंधी बरी पाहुनी त्या प्रवाही
फुका कीर्तिते घ्यावया वाहलो ।
जधी वाहिले पूर रे शोणिताचे,
जधी आहुती संगरी हो तदा
घरी बैसलो तृप्त मौजेत,
आल्या जरी मायभूमीवरी आपदा ॥ २ ॥
असे आज स्वातंत्र्यदेवी घरी रे
तियेचा परी श्वास कोंदाटला
कशी ती प्रसन्ना असावी,
जिथे ओघ कर्तव्यतेचा मुळी आटला ?
नुरे शत्रु कोणीच भांडावयाला,
घरी भांडणे आमची चालली
सुटे कंप या हिंदभूला तियेच्या मना
घोर चिंता अहा लागली ॥ ३ ॥

जरी आत्मविश्वास ठेवू,
जरी साधुनी एकता भेद–भेदा करू
महाशक्ति संपादुनी 'देशसेवा'
जरी याच ध्येयास चित्ती धरू
तरी सार्थकी रक्त जे सांडले,
ते हुतात्मे तरी तोषती अंतरी
तरी तोषुनी हिंद–स्वातंत्र्य देवी
जगी दिव्य ऐश्वर्य भारी वरी ॥ ४ ॥
करू आज सारे प्रतिज्ञा स्वदेशाप्रती
थोर कर्तव्य ना विस्मरू
धरू उंच राष्ट्रध्वजा भारताच्या
जगी घोष त्याच्या जयाचा करू !

१३–८–१९४८

[ 'किर्लोस्कर' मासिकाच्या रौप्योत्सवानिमित्त ]

## ७२. नवे कंकण

( वृत्त–सुमंदारमाला)

महाराष्ट्रवाग्भूषणा, ज्ञानदीपा, सचेता स्वकर्तव्यसेवारता
पुरोगामि किर्लोस्करा मासिका! त्वत्कृती सत्कृती भूषवी भारता।
किती झोपलेली कुमार्गाकडे लागलेली तुवा जागवीली मने
पुरस्कार केला नव्या जी वनाचा, झुगारून जे जीर्ण झाले जुने ।
तमिस्रेतुनी काढला मार्ग तू पातली संकटे घोर त्यां साहुनी
तुझा नाम हे सत्य साहित्यक्षेत्रात केले प्रभावी तपस्वी मुनी ।
तुझ्या शोभवू आज रौप्योत्सवाला टिळा चंदनी केशरी लावुन
तुझे संपले बाल्य, हो सज्ज आता, तुला बांधतो हे नवे कंकण ॥

(७९) ८०९०० 9695

पहा! हिंदभूच्या सभोती गराडा किती घालती गृध्र! ही टोचणी
मना टोचते, जाचते, हाकण्या त्यां उफाळू वरी दे तुझी लेखणी ।
अरे ज्योत या भारताच्या दिव्याची विझे ! एक रे घोर आक्रंदन
यशोदीप तो पेटवाया प्रभावी सुवेगे तुझा दौडवी स्पंदन ।
तुझ्या चालकांना, कवी लेखकांना, तुझ्या चित्रकां, मुद्रकां, वाचकां
तुझ्या सर्वरंगांत रंगा नमस्ते! नमो धैर्यशाली यशोदीपका! ॥

टीप– तारखेची नोंद नाही. किर्लोस्कर मासिकाच्या रौप्योत्सवप्रसंगी ही कविता त्या मासिकाच्या संपादकांकडे पाठविली होती. पण ती प्रसिद्ध झाली नाही. परतही आली नाही.

# ७४. जय कुमार*

घोष हो नभात आज 'जय कुमार ! जय कुमार !'
हिंदमातृप्राणप्यार जागला असे दुलार !
सुप्रभात दिव्य बाल– भानु शोभवी नवीन
तेज फाकले नभात हो धरा प्रकाशमान ॥
ये वरी वरी करीत नष्ट सर्वही तिमीर
गान सुस्वरे यदर्थ गातसे मुदे समीर ॥
आमचा किशोर वीर बुद्धि भावनाश्वस्वार
लेखणी करात शस्त्र घेउनी निघे सुधीर ॥
सत्य शिवं सुंदरं सु–मंत्र हेच ध्येय एक
चालला व्रती पहा सु–मार्ग दाखवी विवेक ॥
साधलेस थोर पर्व संक्रमण कुमार आज
हो सदायशोधनी पराक्रमे अमूप साज ॥
स्फूर्तिशक्ति ध्येय ध्यास वर्धमान हो अपार
घोष हो नभात आज 'जयकुमार ! जय कुमार !'॥
शारदे ! तुझा नवीन भक्त ये पुढे तयास
क्षेम दे विशेष त्वत् – कृपेच हो मनोविकास ! ॥

* विद्यार्थ्यांनी 'जयकुमार' मासिक काढले त्यास आशीर्वाद.

# ७५. ढोरकी पोरगा ( वृत्त—शा. वि. )

प्रातीः शीघ्र उठे, उठूनि हुरुपे आटोपुनीया दिशा
पाही अमृतवृक्ष, तोडुनि तयाचो डाळिका कोवशा
घासी दात, धुवी मुखास विमुदे तो ढोरको पोरगा
'सत्कर्मे गरिबीतही सुख मिळे' बोधी जणू या जगा ॥ १ ॥

व्यायामा करि, काढुनी झडकरी कूपातल्या वारिला
शीता—शांतसुनिर्मला प्रदिपवी जे मानसी स्फूर्तिला
स्नाई गात मुखी अनंत प्रभुची लीला लघू पोरगा
'सत्कर्मे गरिबीतही सुख मिळे' बोधी जणू या जगा ॥ २ ॥

नेसोनी विमला गरीब वसना भाळास लावी टिळा
लाभो कुंकुम वा सुशुभ्र मृद ती नाही जियेची तुळा
भारी चंदनि ; मारुतीस पुजितो भावे तदा पोरगा
'सत्कर्मे गरिबीतही सुख मिळे' बोधी जणू या जगा ॥ ३ ॥

मातेने शिजवीयली कधि शिळीही कोरडी भाकरी
कांदा मीठ कधी, कधी चटणि, भाजी वा धरी तीवरी
घेई घास मजेत जेवुन उठे संतुष्ट तो पोरगा
'सत्कर्मे गरिबीतही सुख मिळे' बोधी जणू या जगा ॥ ४ ॥

बांधोनी मग घे शिदोरि इवली तो न्यावयाते करी
खांदी घोंगडि, फाटकेच फडके बांधून डोक्यावरी
काठी घेउन हाति, गातच निघे गोपाळ तो पोरगा
'सत्कर्मे गरिबीतही सुख मिळे' बोधी जणू या जगा ॥ ५ ॥

जाई बाहत गाइला झडकरी बंधातुनी सोडित
प्रेमे हाकत हस्तदृष्टिवचने वत्सांसही लाडित
आनंदे वनि चालतो गुरुपती ऐसा घनी पोरगा
'सत्कर्मे गरिबीतही सुख मिळे' बोधी जणू या जगा ॥ ६ ॥

रानी गातच लाडयुक्तवचने गाईगुरे चारित
येती बाळगडी प्रसन्नमनसा त्यांशी उड्या मारित
गोटी, दांडुविटी, शिवाशिव, शिटी खेळे वनी पोरगा
'सत्कर्मे गरिबीतही सुख मिळे' बोधी जणू या जगा ॥ ७ ॥

१७-१२-१९३८

# ७६. दुष्टां बरे फावले ( वृत्त–शा. वि. )

कर्तव्यास करूनिया दिनमणी अस्ताचली चालला
उद्योगा निज आटपून नरही जाई कुटीरा भला ।
संध्या होय, न वाजवीत पद ये रात्री तमाची खनी
हो काळोख घरेवरी, बहु वसे आनंद तो दुर्जनी ॥ १ ॥

भीतीने दडले गिरीकुहरि जें चंडांशुच्या वासरी
शार्दूलादिक पातले सकलही रात्री पशू बाहिरी ।
गर्वे गर्जत निर्बलां कचदिलां मुर्गाळती ते बळे
कोणीही पतितां पती न उरला, दुष्टां बरे फावले ! ॥२॥

घूके नर्तन मांडती, बरळती, सर्वत्र कोलाहल !
होती धुंद मदांध, बंध नुरले, स्वच्छंद पापी खल ।
घाले घालुनि नि:सहाय चिमण्या जीवां किती नाशले !
कोणीही पतितां पती न उरला, दुष्टां बरे फावले ! ॥३॥

लोकी कैक असे निशाचर दुराचारी अती नांदती
भोळ्या भाविक बापड्यां ठकवुनी संधी बरी साधती ।
दुष्कृत्या करती, अधर्म वरती, मानव्य झाले लुले
कोणीही पतितां पती न उरला, दुष्टां बरे फावले ! ॥४॥

दीनांचा छळ माजला, गरिब ते दु:खे किती भोगती ?
नाही अन्न, न आसरा वसनही ! झाली कशी दुर्गती !
ज्याचे त्या न मिळे, परंतु परके मारू मजा लागले !
कोणीहि पतितां पती न उरला, दुष्टां बरे फावले ! ॥५॥

दीना ! थांब जरा, नकोस भिउ रे ! धैर्या न सोडी कदा
आशेचा कर तो पहा दिसलसे, जाणार हो आपदा ।
नाशाया तम–दुर्गती–खल उद्या तेजोरवी येइल
न्यायाचा जय, शांतिचा प्रसर तत्तेजोबले होइल ॥६॥

१८–९–१९४०

## ७७. फुले नी मुले (छंद–देवीवर)

फुले हासरी पाहता येई हर्षाची भरती,
द्वेष, रोष क्लेश सारे कुठे कुठल्या विरती ॥

बागेतल्या मुलांहून रम्य फुले संसारात
आनंदाला थारा नाही बाळाशिवाय घरात ॥

शिशू शोभा संसाराची शिशू जीवना भूषण
शिशू आनंद साक्षात शिशू दिव्य राष्ट्रधन ॥

जगा बाळके आधार तेच तयाचे जीवन
सुना अचेत पडेल सारा संसार त्यांवीण ॥

बाळपुष्पांनो ! तुमचा लुब्ध करी मला गंध
अरे, तुमचे चैतन्य माझा होय ब्रह्मानंद ॥

१९५६

# ७८. शिक्षका प्रतिज्ञा कर !

( वृत्त–शार्दूल विक्रीडित )

देशाची घडि मोडली बिकट काळे दुर्दशा आणली
शक्तीधीयशसंपदेस मुकला, सर्वत्र होती कली ।
दारिद्र्ये जन गांजले, पसरला रे थोर आपद्‌गिरी
दैन्या या बघुनीहि झोप तुज का ये शिक्षका साजरी ? ॥१॥

आगी लागलि या भयंकर, बघा, संहार हो भूवर
आपद् घोर विनाश ये झडकरी एकेक राष्ट्रावर ।
दुश्चिन्हे अति शीघ्र काळ तसला बोलावती रे दिसे
काही त्राण न ताडण्यार्थ उरले या हिंददेशी कसे ? ॥२॥

कर्तव्या बलसत्त्व नी निजगुणां हे पारखे जाहले
सारे भारतपुत्र आळसतमोजाले अहा वेष्टिले ।
आता ऊठ जरा, तुझी प्रकटवी शक्ती सुदिव्या खरी
प्यारा भारत नामशेष बघ की होतो तया उद्धरी ॥३॥

'तेजस्वी बलशालि सर्वगुणसंपन्नाग्रणी भास्करां
देशार्थी मरण्यास तत्पर सदा राष्ट्रोन्नतीची धुरा
स्कंधी जे धरती, जगी चढविती कीर्तीस रत्ने खरी
ऐशी निर्मिन' रे आता झडकरी भीष्मप्रतिज्ञा करी ॥४॥

नागपूर १२–११-१९४१
प्रकाशित–'शिक्षक,' पुणे डिसेंबर १९४१

## ७९. आश्चर्य वाटे मना ! (वृत्त–शा. वि.)

वेगे फेकित पातला दिनमणी चंडांशु डोक्यावरी
अत्युच्ची शिखरी चढे, परि जगी आश्चर्य क्रांती करी ।
भोताली जमवून मेघ भुरके आरूढ हो त्यावरी
दावी चित्र जगास मोहक ! अगाधा ही कळा ईश्वरी ! ॥१॥

शोभे धूसर गालिचावरि रवीराया अती कोमल
भोती श्यामलमेघमंडल दिसे रम्याकृती वर्तुल ।
इंद्राचे जणु चाप वेष्टण तया सौंदर्यशाली दिसे
तेणे रूपविशेषता बहुविधा त्या प्राप्त झाली असे ॥२॥

नारिंगी, हिरवा नि पीत, बहु शोभे तांबडा जांभळा
तैसा नील सुवर्णमंडित अहा गोठे दिसे वेष्टिला ।
की वाटे अतिदिव्य कंकण महालक्ष्मी स्वहस्तातिल
दावाया जगतास काढुन करी सूर्या असे मंडल ॥३॥

आजोबा म्हणती 'कदा नच अशा दृश्या असे देखिले'
ऐसे दृश्य अपूर्व नेत्रपटली आम्ही भले रेखिले ।
सौंदर्ये नटले विशेषच खळे नेत्री बरे बिंबले
वाटे भीषण ते मनास परि का रूपाहुनी वेगळे ॥४॥

नाना कल्पविकल्प येउनि मनी हो भीतिने काळवी
वाटे की प्रलयास जाइल धरा, दुश्चिन्ह दावी रवी !
भारी वादळपूर काळधरणीकंपागमाची खुण
आहे का ? भ्रम वाटतो सभय हो अन् हे दुभंगे मन ! ॥५॥

माजे क्रंदन घोर दूर जगती अग्नीच वर्षावती
गोळे झाडति मानवावरि जनां निर्दोष संहारती !
दीनांते छळती, बळे रगडती, क्रौर्ये नरां मारिती
ऐशी दुर्गति दावण्यास, हर ! ते येणार का भारती ? ॥६॥

देशाची बिघडे कळा दिनदिनी, दंगे किती माजले ?
भाऊ भाऊ घरी परंतु दुबळे भांडावया लागले !
नेती ओढुन मायदेश अपुला ते पारतंत्र्यातळी
व्हाया की शकले अनेक अमुची वेळा असे पातली ? ॥७॥

सौंदर्ये भरले खळे परि मनी का भीतिची भावना ?
ऐसा एक मनी विरोध वसतो; आश्चर्य वाटे मना !
१०-१२-१९४१
प्रकाशित, 'शिक्षक' पुणे, जाने. ४२.

# ८०. ध्वनि-संभ्रम (वृत्त-शा. वि.)

'नांदावी जगि शांतता सुख सदा, ते वैर कोठे नको
बंधूभाव असो अखंड समता, तंटे बखेडे चुको ।
कोठे युद्ध नको, नको कलह ते धर्मांधतेचे जनी
'सारी मानवता समान' निघतो शांति-प्रियांचा ध्वनी ॥१॥

बाजूला दुसऱ्या जरा वळुनिया हे चित्र पाहू अता
झाला मानवधर्म नष्ट पुरता ऐसे गमे पाहता ।
स्वार्थार्थी लढती मदांध करती संहार भारी कुणी
तोफा, बाँब, सुरुंग, बंदुक अशा हो आयुधांचा ध्वनी ॥२॥

माजे युद्ध अहा अहर्निश किती हो प्राणनिर्दालन
पाहूनी हतबुद्ध नाश असला दुःखी विवेकी जन ।
होती नष्ट घरे, निराश्रित किती झाली कुटुंबे जनी
किंकाळ्या उठती, प्रभो ! न लव ही तो ऐकवे रे ध्वनी ॥३॥

धान्यागार घरी, परंतु नच ते ज्याचे तयाला मिळे
दंगे, मार, लुटी अनेक घडती डाके तयाच्या मुळे ।
झाली दीन दशा, नसे मुळि जिवाची शाश्वतीही मनी
भेदी तो हृदयास दीन अबलांचा दीर्घ आर्त ध्वनी ॥४॥

आहे तोंड परंतु शब्द नुमटे कोणी दुजा बोलवी
आहे शक्त शरीर फक्त परि तत्सूत्रे दुजा हालवी ।
नेत्रांनी बघतो स्ववंचन परी ना लाज ये देखुनी
नाही त्वेष तरी जरी श्रवणि ये 'रे ऊठ' ऐसा ध्वनी ॥५॥

जातीचे झगडे किती भडकती, ती भिन्न होती मते
कोणी एक वदे, दुजाच दुसरे, काही न कोणा पटे ।
'हिंदूंचे करु राज्य' एक वदतो त्या आड येई कुणी
'पाकिस्तान हवे' असा उमटतो तो आग्रहाचा ध्वनी ॥६॥

सारे हे ध्वनि कर्णरंध्रि घुमता हो मानसी संभ्रम
कैसा होइन मी सुखी ? कधि मना लाभेल शांती मम ?
सारा खेळ तुझा प्रभो ! प्रकटवी सद्‌बुद्धि साऱ्या जनी
जेणे मानव होय मानव, घुमो स्वातंत्र्य-शांति- ध्वनी ! ॥७॥

२१-७-१९४२

# ८१. माझी आस (जाती–केशवकरणी)

नको बदामी हलवा बर्फी बासुंदी अन् पुरी
सलामत असो मीठभाकरी ॥ ध्रु. ॥

नको उंच मज महालमाडी हवेलि ती थोरली
असो मज झोपडीच ही भली
नको चैनिला मोटरगाडी ऐषपूर्ण चोचले
सौख्य हे औरच कष्टातले
ते नको जिणे जे परकष्टे पोखले
ते नको विभव जे पररक्ते माखले
ते नको सौख्य जे परदुःखी लाभले
परंतु ज्याने जळता हासत गाढ तमा नाशले
असो मन्दीपक जीवन भले । ॥ १ ॥

नको गालिचे मऊ रेशमी जरतारी धोतरे
फाटकी वाकळ मजला पुरे
गाद्या दुलया नको लोळण्या वा मंचक–मच्छरी
माझि मज धरतीमाता बरी
मज वैभव दोलो नभि आंदोलन नको
उन्मत्त विलासी स्वर्गारोहण नको
मज ध्यान बकाचे स्वार्थपरायण नको
असो संकटी हास्य मुखावर चित्त नित्य खंबिर
आणि तळहातावरती शिर ॥ २ ॥

नको नको ते परवशतेतिल मजला इंद्रासन
वमन ते अपमानाचे धन
नको असा अधिकार, बंधुच्या गळ्यावरी फिरविन
सुरी रे धुंद ज्यात होउन
पुरुषार्थ हवा मज पात्र करी जो नरा
मज नको दिखाऊ बहुमानाचा तुरा
मम अविरत कष्टे हर्षित व्हावी धरा
हीच आस; मज भिववू न शके मरण आणखी जरा
पुत्र मी भारतभूचा खरा ॥३॥

१६-९-१९४५

## ८२. नवा हिंद ( वृत्त–सुमंदारमाला )

युगाचे नव्या शिंग फुंकावयाच्या व्रता घेउनी कूच आता करू
नवा हिंद निर्मावियाते निघालो नव्या चेतनेने, न मागे फिरू
रुढींची जुन्या नी खुळ्या कल्पनांची पुरे जाहली आजला दासता
करू गर्जना मानवाच्या युगाची नव्या भूषवू वैभवे भारता ॥१॥
अतिक्षुद्र ती धर्मजातीयतेची विषारी नको मानसी भावना
खरा मानवी धर्म सेवू, पुरे हो वृथा देवतांची अता अर्चना
दरिद्री कुणी रंजले गांजले जे तयांचे करू सत्य उद्धारण
समाजात जे आज वैषम्य त्याते निवारावया वाहिले जीवन ॥२॥
दिसे जाहले आज निष्प्राण खेडे नसे भारती त्यामुळे चेतना
चला त्यात संजीवनी दिव्य ओतू करू स्फूर्त तेजे तयाचा कणा
नसे काळ हा बोलण्याचा, कृतीने करू भारताचे नवे जीवन
नवा हिंद या निश्चयाने उभारू बहूमोल हा जीवनाचा क्षण ॥३॥

जानेवारी १९४९

## ८३. नवी संस्कृती ! ( वृत्त– शा. वि ).

(गणेशोत्सवातील मनोरंजनाचे कार्यक्रम पाहून)

आनंदे प्रभु नाच पाहुन किती केली आम्ही उन्नती
सेवाया निजधर्मदेश दिधली तू हीच रे सन्मती
स्वर्गी दृष्य असे सुरम्य बघणे नाही नशीबी तुझ्या
वेश्या नाचविती तुझ्या पुढति घे घे लूट येथे मजा ! ॥१॥
राष्ट्रा उद्धरण्या कुणी करितसे काव्ये तयां खंडणे
कव्वाली रचणे, खुशाल जलसा तूझ्यापुढे मांडणे
होळीचे शुभ मंत्र बोलुन नवी रे निर्मितो संस्कृती
डोळे ते उघडूनिया रसिक हे पाही किती भारती ? ॥२॥

१९५१

## ८४. अधोगती (वृत्त-शा. वि.)

काळाची पडता अचानक उडी दुर्भाग्य फोफावले
सैतानास नृशंस नर्तन करायाते भले फावले ।
झाला घात ! अहो अकल्पित घडे, देशास धोका जडे
'हा बापू !' अतिशोकमग्न अवघे हे राष्ट्र वेडे रडे ॥१॥

आला त्वेष मना, असार गमला संसार बापूविना
वाटे दुर्धर सावरून धरणे त्या फाटलेल्या मना ।
आता ओसरले असे सकलही ते दुःख कालांतरे
झाला भावहि पूज्य नष्ट अमुची हो आंगळी अंतरे ॥२॥

'गांधी धन्य ! विभूति दिव्य !' असल्या जोरात बाता बड्या
'सेवा ध्येय धरा' 'अहिंसक बना' झोकू बरे एवढ्या ।
साधू काय कृती ? खरोखर वदाया शून्य ही ना पुरे
व्याख्याने वदणे उदार, इतुकी ही फक्त भक्ती उरे ॥३॥

कोठे सत्य ? कुठे विधायक कृती, ती बंधुता, एकता ?
लोपे मानवधर्म जो शिकविला त्यांनी स्वये भारता ।
बापूंचा बघुनी अधोगति अशी स्वर्गस्थ आत्मा रडे
आम्ही भ्रष्ट परंतु भाषणपटू स्वार्थांधच जाडे घडे ॥४॥

३०-१-१९४९

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ...८८०.२०० ... क्रमांक...
(८३) २८८/८८...

# ८५. हा दीप घे (जाती–वल्लभा)

अति घोर फेकुन जोखडा सुटला खरा पाशातुनी
परि नेत्र उघडुन बघ कसा, असशी कुण्या निर्जन वनी
घन दाटले काळे नभी रजनी तुला नाशू बघे
तुज दिव्य मंदिरि जायचे; हा दीप घे, हा दीप घे ॥१॥

विक्राळ टपल्या राक्षसी नाना विघातक कल्पना
धेंडे सभोती नाचती करण्या तुझ्या रे शोषणा
तुज भ्रांत बघता हर्षती बोकाळली मार्गी अघे
तुज दिव्य मंदिरि जायचे; हा दीप घे, हा दीप घे ॥२॥

अज्ञान तव अंधार हा पसरे भयानक भोवती
ग्रासावया तुज, राहुटचा मार्गी पिशाचे रोवती
बघ हा धुमाकुळ मांडिला दारिद्रय –दुर्धर–पन्नगे
तुज दिव्य मंदिरि जायचे; हा दीप घे, हा दिप घे ॥३॥

दचकून का रे थांबशी ? भीती कशाची अंतरी ?
थांबून नच चालायचे ! ओझे तुझ्या भारी शिरी
तव हिंद अन् तू हिंदचा धैर्यावरी तव तो जगे
तुज दिव्य मंदिरि जायचे; हा दीप घे, हा दीप घे ॥४॥

बघ ते सुराज्याचे पुढे दिसते सुमंगल मंदिर
होणार निश्चित नष्ट ह्या विपदा तुझ्या रे दुर्धर
हा दिव्य शिक्षणदीप करि घेऊनिया वेगे निघे
तुज दिव्य मंदिरि जायचे; हा दीप घे, हा दीप घे ॥५॥

१९४९ : प्रकाशित–'प्रकाश,' समाज शिक्षण विभाग, म. प्र. शासन

# ८६. धिक्कार !

रे मानव ! तव सुयश हाय काय लोपले ?
मानव दिव्य या जगि निश्चेत झोपले ।।ध्रु.।।

हृदयातिल तव प्रेमभाव तो नरा कुठे ?
सैराट इथे निर्ममता जीवनी सुटे
सद्बुद्धिनेहि झाकुन निज तोंड घेतले ।।१।।

थैमान कसा स्वार्थ घालतो निलाजरा
तो न्याय धाय धाय रडे 'धाव श्रीहरा !
की दुष्टभये दूर तुझे धैर्यही पळे ?' ।।२।।

तो एक नभी धुंद स्वर्गसौख्य भोगतो
हा सरपटला परि दुसरा प्राण त्यागतो
त्या पुष्पशेज, मुष्टिधूळ नच दुज्या मिळे ।।३।।

प्रासाद दीप्त सजवि एक तेज लखलखे
रे हाय ! परि न काजवाहि येथ लुकलुके
अंधार घोर, दीप तिथे अत्तरी जळे ।।४।।

ही येथ फुटे आर्त करुण हाक दुःखदा
धनधुंद बंधु ऐकुनिया हसत खदखदा
वणव्यात क्रूर दैवहीन जळत तळमळे ।।५।।

धिक्कार असो ! व्यर्थ तुझे मानवा जिणे
होणार खचित तव विनाश स्पष्ट लक्षणे
सांभाळ तोल ग्रासण्यास काळ पातले ।।६।।

२४-१-५३

# ८७. युवकहो ! बांधा कंबर

(जाती–पादाकुलक)

उठा युवकहो बांधा कंबर ॥ध्रु.॥

बसाल ऐसे कुठवर दडुनी
लपुन छपुन का सुटला कोणी
कळिकाळाच्या या पाशातुनि
असा महात्मा वा पैगंबर ॥१॥

थोर महात्मे झाले गेले
त्यांनाही काळाने नेले
आपण तर मग कोण नि कुठले
चुकेल कैसा आपुला नंबर ॥२॥

का घाबरता ऐसे मरणा
न्यायाच्या साहुन अपहरणा
शोभे नच हे मर्दा तरुणां
कोसळले जरि वरतुन अंबर ॥३॥

कार्य आजच्या हे युवकांचे
ढोंग जगी जे बिंग तयाचे
मानवतेस्तव फोडायाचे
दांभिक जगताचे अवडंबर ॥४॥

७–८–१९५३

# ८८. प्रार्थना

( जाती–पादाकुलक )

प्रभू घे अता त्वरित माघार ।
नको वाहु क्षण एकहि देवा,
या जगताचा भार ॥ ध्रु. ॥

कपटकटाने कळकटलेल्या
कुट्ट काजळी कोंदटलेल्या
जगी नुरे रे तुझिया असल्या
देवपणा आधार ॥ १ ॥

सैतानाचे हे क्रीडांगण
खुशाल धरु दे दैत्यां रिंगण
किंचाळत मनसोक्त धटिंगण
करु दे स्वैर विहार ॥ २ ॥

तुझे सुदर्शन, तसे शारंग् धनु
निष्प्रभ येथे, विचित्र ये मनु
असे मातली भूवरती अणु-
शक्ती अपरंपार ॥ ३ ॥

नीती रडते ? तिला रडू दे
न्याय विकल पालथा पडू दे
माणुसकीचे धूड सडू दे
मचु दे हाहाकार ॥ ४ ॥

दलित जनांचे प्राण निघू दे
दुबळ्यांचे संसार शिलगु दे
गलेलठ्ठ खाऊन फुगू दे
लुच्च्यांचे सरदार ॥ ५ ॥

वरवर राजमहाल चढू दे
आभाळासच थेट भिडू दे
आणि झोपडी अमुचि गडू दे
जमिनीमध्ये पार ॥ ६ ॥

मत्त शठां उन्मत्त अधिकतर
धुंद होउ दे अधिकारावर
आणि करू दे दीन जनांवर
जुलमाचा भडिमार ॥ ७ ॥

दांभिकतेला मोल मढू दे
स्वार्थतरंगा रंग चढू दे
बडे बडे हरि, खडे वाढु दे
पापांचे संभार ॥ ८ ॥

वाढू दे पाखंड भयंकर
आम्हिच देऊ त्याशी टक्कर
तू पण देवा येथुन लवकर
आवर निज व्यापार ॥ ९ ॥

३१–८–१९५७

# ८९. नवी दृष्टी ( जाती–वल्लभा )

बाबा☆! धरी हृदयांतरी रे हिंद–जनतेची स्थिती
होई निरखिता कंपिता अन् कुंठिताही मन्मती
जनता खरी ही देवता सेवा तिची देवा ऋजू
म्हणुनी सुनिश्चय हा करी जनता–जनार्दन सद् भजू ॥१॥

प्रभु या जगाचा निर्मिता, माता, पिता, बंधू, धनी
मग मानवांचे भेद हो कशि कल्पना ये तन्मनी
जन्मे कुणी हो हीन वा वरते कुणाला थोरवी
हा भेद वाटे दानवी, यावी तुला दृष्टी नवी ॥२॥

कोणी असे धनवान नी आहे दरिद्री दूसरा
नांदे महाली एक तो धरणी दुज्याचा आसरा
उपभोगिती काही जरी ते संपदेचे चोचले,
खाया अनेकां अन्न वा नच वस्त्रही अंगा मिळे ॥३॥

ऐदी दुराचारी जरी श्रीमंत लक्ष्मीपुत्र तो
चैनीत लोळे, दीप ही घरि अत्तराचे जाळतो
लाचार दलिता पाहतो अन् तुच्छतेने हासतो
धिक्कार त्याच्या जीवना! पशुमात्र मज तो भासतो ॥४॥

जो राबतो शेतावरी नाही तयाला भाकरी
मरती उपाशी ती पहा पोरे तयाची रे घरी
त्यांच्याच रक्ता प्राशुनी परिपुष्ट ते झाले बडे
बघ लोचनांनी आपल्या कैसे घडे? जनता रडे! ॥५॥

☆ बाबा – ज्येष्ठ पुत्र घनश्याम

निर्माण केले मानवे
    जगि भिन्नतेचे हे कडे
सद्धर्म लपला, आणि हो
    माणूसकीचे चिंधडे
दुर्बुद्धि आणिक दुष्टता
    यांचेच बळ भलते चढे
हा स्वार्थरासभ पांघरी
    साधूहरीचे कातडे ॥ ६ ॥

वैषम्य साराया दुरी
    स्थापावया समता जनी
कटिबद्ध होई; उच्च वा
    नच नीच जातीने कुणी!
कृतिहीन मानी नीच तो
    कर्मे गणावी थोरता
'स्वातंत्र्य–समता–बंधुता–
    प्रस्थापनेच्या घे व्रता' ॥ ७ ॥

मे १९५८

# ९०. पुत्र-मित्राप्रत हितबोध

(जाती-वल्लभा)

(१)

खाणे, पिणे, चैनी फुका कष्टाविना भोगू नको
माणूसकी सोडूनिया पशुसारखा वागू नको।
आराम गादीवर सदा करिता फुका खाऊ नको
खायास नुसता काळ रे जगती जिता राहू नको ॥१॥

शक्ती मिळाली रे भली गरिबां वृथा मारू नको
ज्याच्याच घरुनी त्याजला रे दूर तू सारू नको।
अधिकारपद लाभे तुला गर्वांध परि होऊ नको
अभिमान हा शत्रू खरा त्याच्या मुखी जाऊ नको ॥२॥

अज्ञान, दुबळ्या, निर्धना बंधूंस निज ठकवू नको
जे ज्ञान-बल तुज लाभले पापात ते फसवू नको।
धुंदीत हृद्याच्या भल्या त्यांची मने दुखवू नको
सेवा कराया लाभली संधी बरी चुकवू नको ॥३॥

अपुल्या सुखास्तव रे कुणा दुःखार्णवी लोटू नको
भरडून जगताच्या तुरी पोळी स्वये लाटू नको।
पिउनी कुणाचे रक्त रे परपुष्ट तू होऊ नको
झोळी भिकेची देउनी जगता, धनी होऊ नको ॥४॥

दारू करी होळी तिच्या नादी मुळी लागू नको
करिता न काही रे कधी गोष्टी बड्या सांगू नको।
जे सत्य ते करण्या बरे मागेपुढे पाहू नको
सोडूनिया नीतीपथा बाबा,* कधी जाऊ नको ॥५॥

स्वातंत्र्य देशा लाभले, मोकाट तू वाहू नको
ती लाच धन पापांतले मिळते म्हणुन खाऊ नको ।
दिसतो रुचिर जरि मार्ग तो परि त्यावरी धावू नको
भ्रष्टाचरण हा डाग रे निज कीर्तिला लावू नको ॥६॥

जरि दु:खडोंगर कोसळे मुळि धीर तू सोडू नको
कुलशीलमर्यादा कधी प्राणांतिही मोडू नको ।
ज्याची धरावी लाज रे ऐसी कृती जोडू नको
हे श्याम☆! राष्ट्राधार हो, सेवापथा सोडू नको ॥७॥

(२)

माझे असे, अन् मी असा, प्रौढी जनी मिरवू नको
चुकुनी अहंकारा मुळी चित्तात रे शिरवू नको ।
गर्वांध होउन, माणसा, मातीत तू मिसळू नको
कुजके घमेंडीचे दही निज मानसी घुसळू नको ॥८॥

कामातुरा ना लाज, ना भय, हे कदा विसरू नको
झाला कलंकित चंद्र त्या मार्गावरी घसरू नको ।
मन हे चळे; चाळे अरे त्याचे कधी पुरवू नको
मोकाट मन सोडूनिया निज नाश तू करवू नको ॥९॥

संताप देई ताप त्या थारा मनी देऊ नको
क्रोधास अविचारे अरे हृदयी कधी ठेवू नको ।
फाजील धरुनी कल्पना वश रे तिला होऊ नको
विष-रोपटे हे मानसी अपुल्या कदा रोवू नको ॥१०॥

☆बाबा, श्याम-ज्येष्ठ पुत्र नामे घनश्याम

मस्तीत तू लोळू नको, मद अंतरी घोळू नको
जे दीन त्यांच्या मीठ रे जखमेवरी चोळू नको ।
हो नम्र; ताठ्याने फुका अपुल्या हिता गमवू नको
चैनी विलासी जीवनी निज सन्मना रमवू नको ॥११॥

ठेवूनिया मनि एक रे दुसरे जनी दावू नको
निर्दंभ हो निज मानसा कपटी वळण लावू नको ।
निंदा नको, हेवा नको, मनि मत्सरा भरवू नको
द्वेषास हृदयी पेरुनी विष ते मुळी मुरवू नको ॥१२॥

गुण पूर्वजांचे गाउनी बाता बड्या झोडू नको
तिस्मारखानीच्या कधी फुसक्या विड्या ओढू नको ।
स्वप्नात भलत्या रंगुनी तारे मनी तोडू नको
सार्‍या ठरावांच्या फोल रे असल्या पुड्या सोडू नको । १३॥

बोलावणे नाही जिथे तेथे उगा जाऊ नको
अपमान होईतो कुठे रे पाहुणा राहू नको ।
पचण्या कठिण जे अन्न ते लाभे तरी खाऊ नको
जगण्यास केवळ खा, परी खाया जिता राहू नको ॥१४॥

(३)

विश्वास जो धरतो तुझा विष त्याजला वाढू नको
आधार तव सारा जया मातीत त्या गाडू नको ।
वरती चढे तव संगती जो त्या तळी पाडू नको
अज्ञान जन पाहूनिया मित्रा, तया नाडू नको ॥१५॥

शक्ती तुझी मोठी भली परि बोलुनी दावू नको
अपुल्या मुखाने स्वस्तुती मित्रा, कधी गाऊ नको ।

सत्कार्य करुनी दाखवी केल्याविना बोलू नको
रे व्यर्थ नाकाने गड्या कांदे कधी सोलू नको ॥१६॥

दुबळ्यास करुनी गट्ट मित्रा, लठ्ठ तू होऊ नको
पेटून हट्टा पांगळ्या तट्टापुढे नेऊ नको।
विद्या करुनिया घट्ट इतुका मठ्ठ तू राहू नको
बट्टा पहा तुज लागला थट्टेवरी नेऊ नको ॥१७॥

जे चांगले ते चांगले वाईट त्या बोलू नको
सोने-पितळ एकाच रे मापामधे तोलू नको।
भलत्या इरेला पेटुनी अविचार पाचारू नको
भोंदूपणा ते ढोंग अन् तो दंभ तू धारू नको ॥१८॥

न घडे मनाला जे रुचे म्हणुनी चिडुन जाऊ नको
रे तोल तू सोडू नको बेताल तू धावू नको।
जे सत्य, निर्मळ त्या वृथा अपबोल तू लावू नको
जाणूनिया कृतिने अशा निजनाश बोलावू नको ॥१९॥

साऱ्या जगी निष्णात मी ऐसे कधी मानू नको।
विद्वान मी वाचस्पती रे आव हा आणू नको।
चिडतोस का मित्रा उगा, हो शांत, रागावू नको
सारे तुझे हित बोललो पथ तो त्यजुन जाऊ नको ॥२०॥

आक्टोबर १९५८

# ९१. एक व्यंगचित्र

( छंद—देवीवर )

जीवनाच्या रणी ज्ययाची
आटलीसे भावलुनी
संसाराच्या भाराखाली
वाकलेला एक कोणी ॥१॥

चरकाच्या तोंडावाटे
पडे उसाचे चिपाड
कणसात उरे फोल
गेल्यावरी टोळधाड ॥२॥

लक्तरात झाकलेला
एक हाडांचा पंजर
कळसूत्री जणू करी
हात पाय खाली वर ॥३॥

दिवे लख्ख चहूकडे
जरी लागले रस्त्यात
मन मात्र अंधारात
होतं त्याचं ठेचा खात ॥४॥

असं एक व्यंगचित्र
माणसाचं पुढं जाय
महादेवाच्या देवळी
जाऊनिया उभं होय ॥५॥

भावे आळविती ज्याते
संत महंत श्रीमंत
मूक–दुर्बळा पाहाया
त्यास कोठली उसंत ?  ॥६॥

आला कोणी भक्तराज
त्यानं लोटता तोऱ्यात
मिणमिणती पणती
आणि विरली वाऱ्यात  ॥७॥

१९–८–१९५८

## ९२. माता

( छंद–देवद्वार )

'माते,' म्हणे आसू  किती तू निर्घृण ?
जन्मताच आम्हां  देशी ग फेकून ॥

घालू न शकशी  मायेची पाखर
वृथा का बाळकां  प्रसवशी तर ? ॥

बोले तै सद्‌गद  लोचन वचन
'कैसे कळो तुज  जननीचे मन ? ॥

बाळांते त्यागून  सत्य मी निर्धन
परी शिंपलीसी  नाही रे कृपण ॥

ठेवी ती कोंडून  भीतरीच बाळा
आणि मी धरेला  वाहे मुक्तामाळा' ॥

मालखेड १७–८–१९५८

# ९३. जीवनज्योत ( जाती–पादाकुलक )

जीवनज्योत जळे ही जोवर–संसारातिल आधी–व्याधी
संकट–कंटक कटुतर खरशर निष्प्रभ होतिल सर्व उपाधी ॥१॥

जीवनज्योत जळे ही जोवर–क्षणात जाइल सर्व लयाला
काळ करी जे अकांड तांडव; गमेल शीतल भीषण ज्वाला ॥२॥

जीवनज्योत जळे ही जोवर– स्वातंत्र्याच्या दिव्य प्रकाशी
राष्ट्र साजरी करिल दिवाळी खुलेल तारागण आकाशी ॥३॥

जीवनज्योत जळे ही जोवर–निराश आशा नच हो किंचित
दारिद्र्याची रजनी दारुण–अमृत किरणी होइल सिंचित ॥४॥

जीवनज्योत जळे ही जोवर–भूवर मानवतेचे रक्षण
होइल, विझता परंतु करतिल सबळ बळे दुबळ्यांचे भक्षण ॥५॥

विझता जीवन ज्योत, तटातट सूत्रे स्वातंत्र्याची तुटतिल
हृदयलतेच्या उडतिल ठिकऱ्या निर्बल मानवगात्रे गळतिल ॥६॥

विझता जीवन ज्योत, बुभुक्षित मुंग्या रविकिरणांचे भक्षण
करतिल, काळी कुट्ट यामिनी ग्रासिल मानवतेज विलक्षण ॥७॥

नवयुवका रे, नवयुवती गे तूच आमची जीवन ज्योती
भारतभूचे सचेत जीवन तुझ्याच प्रतिभेची ती कांती ॥८॥

शक्ति–शील–संयम–सत्त्वाचे
तेल तेवती ठेविल ज्योती
कर्तव्याची निष्ठा व्रत हे
करील उत्तजित तद्दीप्ती ॥ ९ ॥

१९५८

# १४. हो मानवा मानव भला

( जाती–वल्लभा )

नरजन्म तुजला या जगी
सद्भाग्य म्हणुनी लाभला
देवांस हो हेवा, असा
हो मानवा मानव भला ।
विश्वात मानवधर्म रे
हो श्रेष्ठ जो माझा तुझा
त्या पाळुनी हो धन्य; ना
जगि धर्म त्यापरता दुजा ॥ १ ॥

माझेच घर, माझी मुले,
धनधान्य माझे, मी भला
या भावनेने जो जगे
पशु मूर्त तो गमतो भला ।
जो स्वार्थ केवळ साधण्या
माणूसकी विसरे तया
माणूस म्हणुनी हक्क ना
जगण्यास रे जगतात या ॥ २ ॥

कुणि शिक्षणाने वाढला,
लक्ष्मी कुणाला लाभली
अधिकारपद लाभे कुणा,
वा नौकरी लाभे भली
धुंदी परी डोळ्यावरी
याची चढे ये मीपणा
इतरांस गणितो तुच्छ जो
धिक्कार त्याच्या जीवना ! ॥ ३ ॥

हे लोक माझे, देश हा
माझा, तयांचा मी असे
ऐसी जयाची भावना
तो थोर संसारी वसे ।
'हे विश्व घर माझे' अशी
हो ठाम ज्याची भावना
तो देव हो देवाहुनी
बहु थोर नर गमतो मना ॥ ४ ॥

जून १९५९

## ९५. एक सूचना ( जाती–हरिभगिनी )

ज्या खविसांना चटक लागली नुसते पैसे खाण्याची
त्यांच्या अवतीभवति खरोखर रास उभारा नाण्यांची

सोने, चांदी, हिरे, माणके खुशाल यांचे ढीग करा
आणि तिजोऱ्या सगळ्या त्यांच्या हिरव्या नोटांनीच भरा

करा एक पण कण अन्नाचा एकहि देउ नका खाया
रुपये, नाणी, सोने, चांदी यांनिच जगवू द्या काया

नोटांना त्या घशात यांच्या ढोसुन ढोसुन खूप भरा
खुशाल भक्षण करु द्या पैसे म्हणा 'चरा, मनसोक्त चरा !'

बघाच करुनी प्रयोग असला द्या तर एखाद्यास धडा
पदचिन्हांनी निज दाविल मग मार्ग तोच इतरांस बडा

जानेवारी. १९५९

## ९६. जाणे तुका (छंद–देवीवर)

नाही पात्रता अंगात गुण नाही वाण नाही
लोककल्याण वृत्तीचा इवलासा कण नाही
पण हाती नेतेपद झाला अधिकारी बोका
यात अचंबा कशाचा ? खरे वर्म जाणे तुका ॥१॥

एक गावठी गाढव पांघरून व्याघ्रचर्म
म्हणे 'वनाचा मी राजा माझा पराक्रम धर्म'
आणि आम्हीच त्यावरी मारू 'सिंह' ऐसा शिक्का
यात अचंबा कशाचा ? खरे वर्म जाणे तुका ॥२॥

'सेवा जनतेची' ध्येय राख फासलेली अंगा
करी गढूळ कुकर्मे पावित्र्याची लोकगंगा
अधिकाऱ्यांच्या ठरती श्रेयस्कर घोडचुका
यात अचंबा कशाचा ? खरे वर्म जाणे तुका ॥३॥

कुठे चाले बांधकाम गावनेत्यावरी भार
बांधलेले दिसे काय ? खर्च किती तयावर ?
कुठे गेले ? कुठे पैसा ? होता कोणाचा रे ठेका ?
यात अचंबा कशाचा ? खरे वर्म जाणे तुका ॥४॥

एक आयते खाऊन झाला पहा गलेलठ्ठ
सांगे परमार्थ जनां परां करुनिया गट्ट
करूनिया रात्रंदिन कष्ट किरसान भुका
यात अचंबा कशाचा ? खरे वर्म जाणे तुका ॥५॥

मूर्ख होय विद्वज्जन दाखवितो मार्ग अंध
ज्ञानी सन्मान्य महान ज्याचे अज्ञान अगाध

होई प्रशंसेला पात्र अशा सन्मान्यांचा बका
यात अचंबा कशाचा ? खरे वर्म जाणे तुका ॥६॥

गाढवाचा झाला घोडा चढे काक हंसपदी
मशालीचा मानकरी त्याला मिळे राजगादी
लोकराज्यात आजच्या असा आला वक्त बाका
यात अचंबा कशाचा ? खरे वर्म जाणे तुका ॥७॥

१९६०

## १७. शिस्त

( छंद–देवद्वार )

चंदनाची चिता भाग्य भूपाळाचे
तोलुनी का वाचे त्याचे आंग ? ॥१॥

जगातल्या जीवा तोय हे जीवन
प्रलया कारण होय तेच ॥२॥

जडला मोहक सुवर्णाचा लोभ
तरी करी क्षोभ सुरी त्याची ॥३॥

अन्नावीण नोहे प्राण्यांचे पोषण
तयाचे अजीर्ण नाशकारी ॥४॥

सदाचार होता स्वैर स्वार्थकारी
जीवनविषारी सारे होय ॥५॥

राष्ट्र जगवाया हवी आम्हा शिस्त
तिच्यावीण घात जीवनाचा ॥६॥

शिस्त हे कुशाल शल्य सर्जनाचे
चुकता प्राणाचे देणे मोल ॥७॥

जुलै १९६१

# ९८. दुष्काळात दिवाळी (छंद–देवीवर)

दुष्काळात माझ्या घरी
आला दिवाळीचा सण
दारी पणतीच्या परी
मन जळे स्नेहावीण ॥ १ ॥

साखरेचा कण नाही
नाही भांड्यात बेसन
लोकशाहीची स्वतंत्र
पार तुटली वेसण ॥ २ ॥

बाई, मिळेना तांदूळ
नैवद्याची यातायात
करी श्रद्धेचा अभाव
शुद्ध विवेकाचा घात ॥ ३ ॥

गाढ गळाला व्यासंग
संग शीलाचा लोपला
पुरुषार्थ मेघापरी
स्वस्थ खुशाल झोपला ॥ ४ ॥

पावसानं केला संप
भुई करी 'पाणी! पाणी!'
तोंडावरचं पळालं
पाणी अंगातल्या वाणी ॥ ५ ॥

स्वार्थसूर्य ओकी आग
    ऐन शारद काळात
उभं करपतं पीक
    हाय! जीवनमाळात ॥ ६ ॥

दिव्यतेच्या भव्यतेच्या
    नष्ट सुवर्णाचा निधी
देई दु:खाच्या डागण्या
    लक्ष्मीपूजनाचा विधी ॥ ७ ॥

नाही भावनेची खोली
    नाही हृदयाला पीळ
आत बाहेर सर्वत्र
    असा उसळे दुष्काळ ॥ ८ ॥

भाऊबीजेस यायचा
    घरी माझा भाऊराय
त्यास ओवाळू ग कशी ?
    देऊ काय ? घेऊ काय ? ॥ ९ ॥

२७-१०-१९६६

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम.......................... दि: ....................
क्रमांक .......................... नों. दि: ....................

# ९९. कीड लागली पुरुषार्थाला

( जाती–पादाकुलक )

कीड लागली पुरुषार्थाला
धाय धाय ही रडते आशा
धांगडधिंगा धटिंगणांचा
पहा माजला खुला तमाशा ॥ध्रु.॥

पराक्रमाचा पुतळा पोकळ
टेके लावुन उभारलेला
पीळ मिशांवर भरीव भक्कम
हाय ! आत परि पोखरलेला
करी सोहळा रग राष्ट्राची
मिरवित असल्या आदर्शाला
तेज खरे अंगातिल त्याच्या
अन् गुंडाळुन बसले गाशा
कीड लागली पुरुषार्थाला
धाय धाय ही रडते आशा ॥१॥

कर्तव्याचे गोंडस लेबल
लावुन विजयी बडवित डंका
स्वार्थ नाचतो थयथय, त्याच्या
धवल यशाची कुणा न शंका
तोच देव आराध्य कृपेने
रावपदावर चढवी रंका
त्यागाची जनसेवेची पण

गोड मुखी रटलेली भाषा
कीड लागली पुरुषार्थाला
धाय धाय ही रडते आशा ॥२॥

हरामातला राम भजाया
भगत जनांची धडपड भारी
स्वतंत्रेच्या छत्राखाली
जत्रेतिल या रंगत न्यारी
स्वैराचारी हक्क वाजवी
कर्कश अपुली तीच तुतारी
'मानकरी मी, माझ्यासाठी
बंड पुकारा' करि आक्रोशा
कीड लागली पुरुषार्थाला
धाय धाय ही रडते आशा ॥३॥

आणि आजच्या रंगभूमिचा
दंभ लाडका नायक बाका
फिदा जयावर वैभवलक्ष्मी
गाजे ज्याचा धूमधडाका
सौजन्याच्या सदनी साध्या
अन्नकणाचा पडला फाका
नादानावर विपुल धनाची
अन् मानाची अविरत वर्षा
कीड लागली पुरुषार्थाला
धाय धाय ही रडते आशा ॥४॥

कुठे शोधता निष्ठा ? भ्रष्टा
तीतर, लपणे तिच्या कपाळी
नीतिसती हो पतिता आता
सतत चालते तिची कुचाळी
अशांततेने पिटता टाळी
संस्कारांची सुरु लाथाळी
जनकल्याणा जखम पडे वर
उडती घों घों गांधिल माशा
कीड लागली पुरुषार्थाला
धाय धाय ही रडते आशा ॥५॥

अभंगता भांगेच्या रंगी
झिंगत भंग करी निज भिंगा
निधर्मितेच्या पुंगीवरती
जातियतेचा नंगा पिंगा
बघा बघा बिनदिक्कत लावी
या भाषेचा दैत्य सुरंगा
दंगा फुंकी शिंग, बांधुनी
चंग, साधण्या सरळ विनाशा
कीड लागली पुरुषार्थाला
धाय धाय ही रडते आशा ॥६॥

काळाचा हा महिमा भारी
घरीच मालक करितो चोरी
बेशिस्तीच्या भिस्तीवरती
गस्तीची करि शिस्त उधारी

राष्ट्रशील उध्वस्त कराया
अराजकाची टपली स्वारी
आणि तयाच्या हेरगिरीचा
राजनीतिने धरला पेशा
कीड लागली पुरुषार्थाला
धाय धाय ही रडते आशा ॥७॥

मिणमिणती त्या पणत्या पण त्यां
पाहुन गणती लोक दिवाळी
केविलवाण्या मूल्यां अमुच्या
दारुण हसते रजनी काळी
भारतभूचे भाग्य मुळुमुळू
अश्रू होउन अगतिक ढाळी
सावधान ! कुणि हवा कशाला
अता कथाया प्रकट भविष्या ?
कीड लागली पुरुषार्थाला
धाय धाय ही रडते आशा ॥८॥

ऑक्टोबर १९६६

# घटनाप्रधान कविता

## १००. विजयपताका (जाती–पादाकुलक)

( भारत शासनाने निजामी सत्तेविरुध्द आरक्षण कारवाई करून हैद्राबादेचा ताबा घेतला तो प्रसंग)

विजयपताका भारतभूची
क्षणात चढली निजामशीर्षी
मानवता जगताची अवघ्या
विजयानंदे सुमने वर्षी ॥१॥

मत्त निजामीमधल्या विरल्या
प्रचंड अन्यायाच्या राशी
दिव्य हिंदभूच्या सत्त्वाचे
विदित जाहले देशोदेशी ॥२॥

सुकाळ सैतानांचा झाला
अधे बनले हजरत आला
प्रजाहितावर आला घाला
घडल्या घटना हृदयस्पर्शी ॥३॥

घरदारांच्या झाल्या होळ्या
उठल्या दीनांच्या आरोळ्या
ललना छळल्या गेल्या, झाल्या
बंद सर्व न्यायाच्या वेशी ॥४॥

झाली माणुसकी बरबाद
घुमे चहुकडे आर्त निनाद
उभे पेटले हैद्राबाद
भिडल्या ज्वाळा की आकाशी ॥५॥

लुटालूट अन् अत्याचारा
नुरली सीमा जनसंहारा
कासिम रिझवी मत्त पुढारा
सुटे स्वैर जैसा की केशी ॥६॥

प्राण हिंदचा तिळतिळ तुटला
जीव जुलुम बघता पिळवटला
परि धीराचा बांध न फुटला
अवघे जग आश्चर्ये लक्षी ॥७॥

न्यायासाठी नेहरू विनवी
मिर्झा धावुनिया समजावी
परि डोक्यावर बसला रिझवी
निकट पातली सत्यानाशी ॥८॥

सकळ संपल्या वाटाघाटी
बुध्दी बुडत्याची उफराटी
'खबरदार !' उलटा दमदाटी
निजाम भरतो; घटना कैशी ? ॥९॥

सुटली आज्ञा उठली सेना
मानवतेच्या करण्या त्राणा
कापित सैतानांच्या माना
पुढे चालली चुटकीसरशी ॥१०॥

तोफांची सरबत्ती झाली
प्रजेस आशा हिंमत आली
दुष्टांते रणगाड्याखाली
रगडति सैनिक भारतवासी ॥११॥

सैनिक कसले ? मशक निजामी
क्षणात कितितरि आले कामी
भारतभूचे फौजी नामी
भिडले हैद्राबादेपाशी ॥१२॥

दशबाजूंनी झाला मारा
रिझवीयांचा जिरला तोरा
पळू लागले सैरावरा
पळता आला फेस मुखासी ॥१३॥

हजरत झाले जागे, बघती
रक्षक नुरला कोणी भवती
तक्त चालले हातोहाती
या अल्ला ! ही दुर्गति कैसी ॥१४॥

कैफ उतरला खुलले डोळे
जिरले थिजले तिथेच चाळे
शरण भारता येउनि बोले
'तारा मज, मी मूर्ख अपेशी !' ॥१५॥

शांतीनौबत क्षणांत झडली
ती जनशक्ती विजयी झाली
निजामनांगी गळली खाली
लोळे नत जनचरणांपाशी ॥१६॥

मिळे धडा हा इतिहासातुन
सावध, शासक ! तुमचे शासन
जनहिततत्पर तरिच टिके, पण
मदधुंदीने जाइल नाशी ॥१७॥

५--१०--१९४८

# १०१. सरगोध्यावर धडक

(जाती–हरिभगिनी)

(भारत–पाक युद्धातील अत्यंत रोमांचकारी व स्फूर्तिदायक घटना)

सरगोध्यावर धडक मारुनी तडक रडार बळी रगडी
सताड स्वर्गद्वार–कवाडे त्यासाठी पडली उघडी ॥ध्रु.॥

महाभारती गुरु सेनानी चक्रव्यूह रचिता होय
गूढस्थलि त्या महारथींच्या पराक्रमा नच लव सोय
ग्रस्त धर्म चिंतेने 'निष्फळ यत्न आमचे घडोघडी'
सताड स्वर्गद्वार–कवाडे त्यासाठी पडली उघडी ॥१॥

पाक पुकारी संगर जरि रण वीर सरस अनुचे भारी
वायुफौज सरसावत, दावत मौज अरीस खडे चारी
सरगोध्याचे यंत्र भूमिगत विफल करी शक्ती निधडी
सताड स्वर्गद्वार–कवाडे त्यासाठी पडली उघडी ॥२॥

चक्रव्यूह भेदाया बालक अभिमन्यू रणि गमन करी
तसा आमचा गडी द्यावया तडी रिपुस निर्धार धरी
आदेशाविण सेनानींच्या स्वयेच घे ज्वालेत उडी
सताड स्वर्गद्वार–कवाडे त्यासाठी पडली उघडी ॥३॥

धाड! धडाका जोराचा हो दाहि दिशात निनाद उठे
काय होय? हे कळावयाला भल्या भटांचे हृदय थिटे
शुद्धी धरुनी निरखी जग तो कूट कटांची जळत मढी
सताड स्वर्गद्वार–कवाडे त्यासाठी पडली उघडी ॥४॥
अति बलशाली शोधयंत्र अणि पाकाचे नापक ठरे
क्षणात झाले चूर, धुराचा पूर ऊर्ध्व गगनात भरे

त्यातुन ज्योती ती शाश्वत वर सरकत पुढती चढे खडी
सताड स्वर्गद्वार–कवाडे त्यासाठी पडली उघडी ॥५॥

अमेरिका हतबुद्ध, चीन हो दीन, इंग्रजां रडे फुटे
चांडाळाची फुटे फळी अन् कुटिल खळां थरकाप सुटे
आक्रमकांचे तोंड उघडले बळे दाबता नाकपुडी
सताड स्वर्गद्वार–कवाडे त्यासाठी पडली उघडी ॥६॥

रडार ते दमदार तुटे 'जय हिंद' गर्जना दुमदुमली
नांगी पडली शक्तीची जी कुरापतीला खुमखुमली
पराक्रमाचा कळस गडद्याच्या उभवि हिंदभूविजयगुढी
सताड स्वर्गद्वार–कवाडे त्यासाठी पडली उघडी ॥७॥

समीर–वीरा ! तुझ्या कृतीने अयूब झाला खूब लुला
विस्मित झाले जग, विजयाचे श्रेय आमच्या खरे तुला
तुझी आहुती स्फुरवि जवानां मरणाशी करण्या फुगडी
सताड स्वर्गद्वार–कवाडे तुझ्यासाठि पडली उघडी ॥८॥

लाल बहादुर ! तुझा बहादुर लाल वीर हा विजयाचा
पराक्रमाचा दुर्ग विलक्षण दुर्गम हो घोर जयाचा
देशहिताची तळमळ ज्याची शिस्तिवरहि भरली तगडी
सताड स्वर्गद्वार–कवाडे त्यासाठी पडली उघडी ॥९॥

धन्य हिंद ! ते देशधुरंधर लाल ! धन्य नरवीर हिरे
प्रखर अखिल जगतात जयांचे तेज अलौकिक चिर पसरे
यावच्चंद्रदिवाकर कीर्ती–रूप अमर ते वीर गडी
सताड स्वर्गद्वार–कवाडे त्यांसाठी पडली उघडी ॥१०॥

# १०२. सुखाचा शोध

( जाती–भूपती )

मज काय वेदना कोण मनी घेणार ?
अन् खिन्न मना मम शांति किमपि देणार ?
हिंडतो वनी–उद्यानी होतो श्रांत
मुळि कळ हृदयातिल लव नच होई शांत
वनशोभा सुंदर नेत्री पाहतो
सरिताजलि रम्य तडागी नाहतो
जाउनी निवांतस्थानी राहतो
मधुगंध हास्यमुख पुष्पांचा स्वच्छंद
दरवळे शमाया परि मम दुःखा मंद ॥१॥

हे विहंग उडती नभी कूजिते गाती
या लतामंडपी कलिका हसती हलती
बालके सानुली लाघव दावती
वर चढति पडति तरि मोदे धावती
जन दंग अशा रुचिरंगी राहती
नाचते चराचर रुचिर रसी संलग्न
मच्चित्त हाय ! परि रूक्ष, सुखा उद्विग्न ॥२॥

धन भाग्य–सुखाची वसती कोणी म्हणती
परि अनुभव मम तापाची निव्वळ भरती
कुणि मज बहुमाने बाहती
सुखवाया विविध उपाये पाहती

उपचार परि नच माते साहती
वाचनी लेखनी रमे न मन हे देवा !
का मला क्लेश ? वाटतो जगाचा हेवा ! ॥३॥

ही शांत निशा, हे नेत्र तिचे बहु लोल
मज रिझवायाते परंतु सारे फोल
मज चंद्र सुधाकर वाटे तापतो
रमणीची वेणी भासे साप तो
पिक विकल मात्र करण्या आलापतो
हरपला कुठे हरि ! हृदयाचा आमोद
करु कुठे, कळेना, इष्ट सुखाचा शोध ? ॥४॥

१८-४-१९४०

# १०३. सोडू नकोस आशा (जाती–रसना)

सोडू नकोस आशा सोडू नकोस आशा ।।ध्रु०।।

येताच मी घराला माझ्या समोर येशी
हसुनी हळूच वचने बोलावया पहाशी ।
परि मद्‌विषण्ण मुद्रा करिते तुझी निराशा
मच्चित्त दग्ध हो अन् बघता तुला हताशा ।। १ ।।

बघतो अनेक युगुले हातात हात घेती
उद्यानि जाउनीया क्रीडेत दंग होती
मनसोक्त हासती नी भरती जगात रंग
परि मात्र मी निराळा होई विदग्ध अंग ।। २ ।।

मनि वाटते अहर्निश तुज संगती रहावे
स्वच्छंद आचरावे मधु गीत आयकावे
जेव्हा परी तुझे ते कानात शब्द येती
गे हाय ! वाटते हो वाग्बाण भेद चित्ती ।। ३ ।।

कधि बोलण्या हसाया इच्छा मनात होई
वदनात शब्द येई विरुनी तिथेच जाई
सौत्सुक्य–हर्ष जेव्हा बघतो वदावया गे
क्षणि ये विषण्णता अन् मन होइ भग्न वेगे ।। ४ ।।

शिजवूनिया रसान्ने तू वाढशी त्वरेने
सोल्हास गे कराया मज तुष्ट या प्रयत्ने
तोंडात घास जातो फिरतो तसाच तेथे
हर ! या कधी दिसावा संतोष जोडण्याते ? ।। ५ ।।

तू कर्कशा विरूपा मी आळ घेत नाही
तुज दुर्मुखी म्हणाया मज धीर होत नाही

निष्प्रेम रूक्ष की मी माझे मलाच वाटे
कर गे क्षमा स्मृतीने हृत्पाट पार फाटे ॥ ६ ॥

संकेत हा विधीचा मी त्वत्करा धरावे
अन् प्रेमरंगि मोदे भवसागरी नहावे
मग का कळे न त्याने तो निर्मिला जिव्हाळा
करि शीत सौख्यदायी जो संसृती–उन्हाळा ॥७॥

ऋतु ये वसंत आता बहरात आंबराई
मन मारण्या भरारी उत्स्फूर्त मस्त होई
परि दुष्ट मीच वाटे तापात राग आटे
वाटेत मोठमोठे उठती जहाल काटे ॥ ८ ॥

ही पुष्पहीन वेली सुकला जणू फवारा
प्रेमाविना जिणे वा निस्तेज दिव्य तारा
कवि बोलती असे अन् जरि सत्य ते असेल
परि, देवि ! चित्त माझे प्रीतीविना हसेल ॥ ९ ॥

भलत्याच कल्पनेने आशा नको त्यजू तू
ऐसेच राहुनीया जडतेत जीव ओतू
ओसाड रान त्याते सौंदर्य नंदनाचे
आणू सुगंध सेवू स्वसौख्य चंदनाचे ॥ १०॥

या सागरात पोहू मोहा त्यजून फोल
येतील गाहनी गे रत्ने करी अमोल
मी हा तुझाच ! नाही ही अर्थहीन भाषा
सोडू नकोस आशा ! सोडू नकोस आशा ॥११॥

२६–८–१९४३

# १०४. माझ्या जीवनाचे काव्य

( छंद–देवीवर )

जीवनाचं काव्य माझ्या ऐका दयावंत देवा
देवलोकात करू द्या भावकथन मानवा ॥१॥

तुम्हा थोरले विचार– भावनांचं गीत हवं
ते म्या निश्चेतमनानं कोठुनिया आळवावं ? ॥२॥

येथ पुरत्या शब्दाची पडतसे वाणतूट
अलंकाराची काव्यात व्हावी कैसी लयलूट ? ॥३॥

हासता हो ? हसा; काव्य माझं तुम्हा रसहीन
परी माझी सुधा त्यात माझं तेच संजीवन ॥४॥

याच ओसाड जीवनी माझा स्वर्गीय प्रमोद
नका पुसू कैसा काय नको तुम्हा त्याची दाद ॥५॥

ओसाडीत वाळवंटी माझं नंदन–उद्यान
मज खेळता पाहून जाल पळून भिऊन ॥६॥

शरदात होई दाहा वसंतात पेटे आग
उफाळून आटतात माझे भावना–तरंग ॥७॥

सुधा गिळून बैसणं माझं मिष्टान भोजन
पिऊनिया अश्रूजळ माझी भागते तहान ॥८॥

अर्भकांचे आर्तस्वर ऐका झाकतां का कान ?
पोट पाठ होती एक बघा सुखवा नयन ॥९॥

पाषाणाच्या शेजेवरी माझा विलसे शृंगार
शुष्क देहातून दावी वीररस आविष्कार ॥१०॥

मूर्तिमंत ते कारुण्य येथे खेळतं सचेत
भयानक-रौद्री यांशी माझी अखंड सोबत ॥११॥

माझ्या जीवनकथेत हास्यरसाचे फवारे
भाग्यवंता, तुम्हासाठी हासा पोटभर सारे ॥१२॥

हेच माझं गोड गीत माझ्या जीवनाची खूण
नका अवहेलू देवा, माझं अमोल भूषण ॥१३॥

व्यर्थ तुमचं संगीत साथ देण्या माझ्या गीता
म्हणो कुणी रडगाणं माझ्या जीवनाची कथा ॥१४॥

डिसेंबर १९४६

# १०५. प्रश्न उत्तराविण उरला !

( जाती–हरिभगिनी )

अंगाराविण आग पेटली होरपळे संसार खुळा
हाय ! वसंती ऐन बहारी सुकला सुंदर हरित मळा
वाऱ्यावाचुन विझली ज्योती, कारण नसता कार्य घडे
शस्त्रावाचुन सहज मनाचे किती उडले तुकडे तुकडे ! ।।१।।
धारेमध्ये विषम नाविके नाव सांडुनी यःपळता
वादळ सुटले, तारू फुटले खांब ढळुन झाला कलता
धरणीला हो कंप, शांतही सागर अगदी खळबळला
वज्र कडाडे, धीर मनाचा मेरू अचल पण डळमळला।।२।।
ऐन दुपारी ग्रीष्मरवी करि कर शीतल का तुजसाठी ?
अदय विधीने जाणुनिया का थांबविल्या भेटीगाठी ?
स्वजनां सोडुनि निजसदनातुनि निघता पाय कसा वळला?
झालिस का पाषाण! कसा गे जीव तुझा नच घुटमळला?।।३।।
प्रिये पक्षिणी ! उडुन जावया पंख तुझे का फडफडले ?
टाकुन जाता पिलां, न एकहि नयनांतुन आसू पडले !
उत्कर्षाने, हर्षसुखाने, स्नेहाने जे घर भरले
गूढच गे ! ते सोडुन जाता हृदय तुझे नच गरगरले ! ।।४।।
तुझ्याच साठी या संसारी कठोर तप मी आचरिले
तुझ्याच साठी मी मन मानवि सदा आवरुनिया धरिले
तुझ्या संगती विश्वासाने जीवन जगलो तुझ्यापरी
परंतु करिशी घात! भावना कोमल झाल्या दग्ध उरी ।।५।।
तुझी अर्भके व्याकुळ पडली मायेच्या विरहे उघडी
भिरभिर बघती केविलवाणी द्याया बघती ठाव दडी

..ादसे कोठे माय ! अज्ञ ती घडले नच समजू शकती
व्यथा त्र्यांची कुणा कळावी ? जरी आसवे मम सुकती ॥६॥
राजपुतांच्या जोहाराचा धडा गिरविशी आपसुखे
की सीतेचे दिव्य साधण्या तुझी अचानक वाट चुके ?
परंतु हा आयास कशाला ? ध्यास कशाचा भुलवि तुला ?
की निर्दय काळाने चकवुन मार्ग चुकीचा दाखविला! ॥७॥
स्मृती नाचती थयथय, रडते हृदय मुके, जरि वावरतो
जगती अगती भ्रांतमती मी पुढती लोकरिती वरतो
सलतो कंटक एक निरंतर परी अंतरी जो शिरला
का गेलिस ? अन् कशी ? कशाला ?
प्रश्न उत्तराविण उरला ! ॥८॥

२५-४-१९६२

# १०६. कसे प्रियेला आराधू ?

( जाती—लवंगलता )

कविता रुसली, सखी भावना
थिजली होउन दीन
भकास जीवन जगत तळमळे
मन जीवनविण मीन
घट सुरसाचे फुटले, तुटले
स्वर—मृदुलांचे तार
चेतविहिन हे चित्त वाजवी
वेडे भग्न सतार
कल्पकताखग विगतपक्ष हत
आहत उच्च विचार

प्रतिभा विगलित, बल शब्दांचे
उरे पुरे लाचार
कसे प्रियेला आराधू ? ही
दरिद्रतेची धार

ठार हृदय करि, कसा मृतातुन
हो भावाविष्कार ?
क्षमा करावी रसिकवरांनी
विरति शब्द वदनात

स्थानहीन मी दीन अधोमुख
वाग्देवी—सदनात !

डिसेंबर १९६४

## १०७. पिसाटलं वारं (छंद-देवीवर)

पिसाटलं वारं गार दाट शिरलं रानात
सळसळती चेतना भरे पानात पानात ॥१॥
पान पिकलं सुकलं तेही रंगेल भरार
उडे वर आभाळात उंच घारीच्याही पार ॥२॥
रान हादरल सारं वारं सुटता पिसाट
ताठरले महावृक्ष भुई झोपले सपाट ॥३॥
पिसाटलं वारं झालं काळ्या ढगावर स्वार
आभाळाच्या दुर्दशेला नुरे काही पारावार ॥४॥
हाणी घणापरी सोटे कोठे चंदेरी प्रतोद
धाड कडाड सडाड कर्ण फाडती निनाद ॥५॥
पडे पिसाट वाऱ्याची भल्या मळ्यावरी धाड

रस आटला उसाचा आता राहिलं चिपाड ॥६॥
पिसाटलं वारं द्वाड गावा मारतं धडक
सारं धुवुनिया गेलं नग्न राहिली सडक ॥७॥
पिसाटलं वारं दुष्ट भरे हरणांच्या कानी
वेडी तृषार्त सारखी पळतात रानोरानी ॥८॥
जिथं तिथं या वाऱ्यानं दिली जोराची मुसंडी
कुणी नागवली वेली कुणी भ्रांत कुणी वेडी ! ॥९॥
मस्त पिसाट वाऱ्याचं घोडं सुटता मोकाट
दैवहीन सौभाग्याचा उधळील सारीपाट ॥१०॥
पिसाटलं वारं मस्त शिरे विश्वामित्र मनी
सारा तपस्येचा गिरी क्षणी पडे कोसळूनी ॥११॥
पिसाटलं वारं आता माझं ठोठावतं दार
पाहे कहरात ओढू शिवशंभो ! मला तार ॥१२॥

मे १९६५

# १०८. एका दगडाची कहाणी

( जाती–स्मर )

उगाच देती देवपणा मज
मी जन्माचा धोंडा ॥ध्रु.॥
काळे खाने गहिरा अपुला
अवनीवरती सडा शिंपिला
होता, धावत भलता आला
अवचित कोणी लोंढा ॥१॥
ओसरले जल पडला गोटा
ओबडधोबड कातळ मोठा
कुणी घणाचा हाणी रट्टा
पाडी खंडा – खंडा ॥२॥

कळसावरती कोणी चढला
कुणी फिरुन भूमीतच दडला
सुंदर शिल्पी कुणी पहुडला
मी पण एकलकोंडा ॥३॥
असाच पडलो वाटेवरती
ठेचाळत जन जाती येती
शिव्याशाप अन् कोणी देती
येती जैशा तोंडा ॥४॥
संस्कारित त्या वचने झालो
थोडासा शेंदुरही ल्यालो
हवा जगाची अवखळ प्यालो
आणि बांधला गंडा ॥५॥
ती लाचारी सारी सरली
यक्षिणीची जणु कांडी फिरली
अवचित जमले भात उकळणे
फसफसणारा थंडा ॥६॥
वांझेची कधि कूस सुफळते
घोडवराला नवरी मिळते
सारे हे जरि सहजच घडते
परि मम फडके झेंडा ॥७॥
अशी जगावर पडली झापड
माझ्यापुढती ऐकविती रड
दगड जरी मी ज्या चढ ना पड
निव्वळ गडबड–गुंडा ॥८॥

१०–१९६६

# १०९. स्वप्नभंग

( जाती–हरिभगिनी )

गरगर अश्रू नयनी फिरती हर ! खर शल्य मनी सलते
उरि बाळगले स्वप्न एक पण अनपेक्षित घडले भलते ॥ध्रु.॥
माझेपण अवघ्यात विरावे सुख सगळ्यांचे तेच मला
दु:खी जरि मी मद्दु:खाचा जावा ताप सहज शमला ॥
सद्भावांनी सद्भावांनी एक बंधनी चालावे
एक मुखे बोलावे, संकट एक दिलाने झेलावे ॥
संघबळाने हर्षाच्या त्या स्वर्गा भूवर ओढावे
सिद्धार्थाचा त्याग फिका हो श्रेया असल्या जोडावे ॥
आकांक्षेचा मनी विसावा जडला पण हो मृगजळ ते
उरि बाळगले स्वप्न एक पण अनपेक्षित घडले भलते ॥१॥
शपथ ! सांगतो मद्बंधूंनी मज दुर्दैवी सावरिले
हताशेत आशाकर बघुनी भग्न मना मी आवरिले ॥
व्यसनी माझ्या बंधु तयांच्या वनिताही मज सहभागी
सुखार्थ माझ्या स्वार्थी त्याजुनी सानवडिल झाले त्यागी ॥
उपकारांचा भार फार हो अपार पडलो ऋणी जरी
एकजुटीची तीव्र भग्नता मग्न विषादी घोर करी ॥
जागृत सगळे दु:ख टोचिते मनास दे अति व्याकुळते
उरि बाळगले स्वप्न एक पण अनपेक्षित घडले भलते ॥२॥
मनात होते एकोप्याने इंद्रासन खेचुन आणू
भीमबळाने दुरितांवरती भिरकावुन गोफण हाणू ॥
आकाशासहि घालू झाकण मात करू काळावरती
एक मनाची मूठ विलक्षण तिनेच ही हलवू धरती ॥

परंतु उठला कलह कालवी कालविषा अमुच्या ग्रासी
हाय ! रवी राहूच्या पडला ग्रहणी अवचित खग्रासी ॥
सत्कारांचा तोरा जिरला अंतर चिर चिरते-उलते
उरि बाळगले स्वप्न एक पण अनपेक्षित घडले भलते ॥३॥

स्वार्था ! अधमा ! देवघरीही तुझे हाय रे मोल चढे
संचरुनी सदनात तयाचे तूच करिसि तुकडे तुकडे ॥
देवाचे देवत्व हरे अन् दानवतेचा वायु भरे
अशीच नीचा ! तुवा नाशिली अगणित संसारात घरे ॥
दावा साधुन करशी कावा रावा नेशी कावपदी
तुवाच मज हतदैवा केले गलितहृदय अगतिक अगदी ॥
हताश मी तर ! काय करू ? मन चिंती ते भलतेसलते
उरि बाळगले स्वप्न एक पण अनपेक्षित घडले भलते ! ॥४॥
३-२-१९६७

# ११०. शरणपत्रिका

(वृत्त-पृथ्वी)

प्रतिक्षण प्रतीक्षिता क्षण सुसह्य राहू किती ?
अगे नियति ! या मनावरिल ताण साहू किती ?
अहर्निश हताश चित्रपट तोच पाहू किती ?
निमूट नयनांतली तुज फुले नि वाहू किती ? ॥१॥

उदंड सरलो पुढे चढत जीवना जिंकता
घमेंड जिरली पुरी परि ! पराभवाची व्यथा
मनास छळि, निष्ठुरे ! मजसि तुच गे जिंकिली
तुझ्याविण कथू कुणास कळ काळजी झाकिली ? ॥२॥

तुझी शपथ ! मी सुकार्यरत सर्वदा राहलो
कुकर्म घडता सखेद अनुतप्तही जाहलो
कधी कपटकज्जला लव दिला न थारा मनी
सदा सरल या जनी विचरलो मनापासुनी ॥३॥

अभद्र न कदा कुणा किमपि चिंतिले मन्मने
अपथ्य वचने न वा दुखविली कुणाची मने
कदा न गुरुसेवनी विनय सोडिला जाणुनी
सदानुसरलो नव्या जगति रीत साधी जुनी ॥४॥

गृहस्थ बनलो कदापि नच लंघीला तद्विधी
विधीनियत तो सहर्ष वरिला सुखाचा निधी
प्रसंगवश कोपलो, कधि भल्यासही हासलो
असेन, परि पाळण्या नियम नीतिचे ध्यासलो ॥५॥

प्रकोप तिसरा करी जव मनी सुखाच्या मिषे
तदा कितीक पातली भुलविण्या पुढे आमिषे
खरे शपथ सांगतो ! वश तयां न झालो रती
जगात जगलो अबोध सुमती सतीसंगती ॥६॥

अकिंचन असूनही नवल नांदलो मी धनी
धनास्तव हपाप-पाप न कदा शिवे या मनी
कधी न पडले उणे वसनि भोजनी साधनी
चुकून नच जाहलो कधि कुणा धनाने ऋणी ॥७॥

श्रमात रत राहण्यात न कधी मनी लाजलो
सदा झटत उन्नतीगत पदावरी साजलो
परिश्रमसुलब्ध अल्प धन होय जे जे भले
तयात परितोषलो सुख भले मला लाभले ॥८॥

अमून अगदी युवाच 'गुरुजी' पदा पावलो
कुठे कठिण वाटता क्षण निराश भांबावलो
कृपानवल तू परंतु पुढती भले ओपिले
अपेशभय त्यामुळे सकळ साहसी लोपिले ॥९॥
विशेष वरिच्या वरी वरजनी बरे वानिले
समस्त सुजनी सुयोग्य पदवीवरी मानिले
तशात घडले अहो नवल ! भाग्य उंचावले
ललाट लघु 'राष्ट्रसेवक *गुरू' गुरू नाव ले ॥१०॥
असंख्य अभिनंदने मजवरी जनी वर्षली
असंख्य हितचिंतकी सुवचता मती हर्षली
असंख्य पडता गळा कुसुमहार धालो मनी
परी विरमली व्यथा तिळभरी नसे त्यातुनी ॥११॥
त्यजून मजला पिलांसह मुक्या सखी पक्षिणी
अजून मज गूढ ! होय रत आत्मघाता क्षणी
कशास्तव ? भरी व्यथा अमित ती स्मृती अंतरी
सले सतत जीवनी खर कलंक–काटा उरी ॥१२॥
सहस्त्र रजनींहुनी अधिक गे जरी लोटल्या
उपाधि उपलब्ध होत जरि कोठल्या कोठल्या
उदंड जरि लाभली जगति दुर्लभ स्निग्धता
परंतु वसते अहा स्मरणि ती व्यथेची कथा ॥१३॥
कृतार्थ करि सोहळा सुखद रम्य दिल्लीतला
मनी फुलवि भव्यता अमल जान्हवी शीतला
धरूनि मनि भाव शुद्ध यमुनाजली नाहलो
परी परतता घरी व्यथित पूर्विचा जाहलो ॥१४॥

---

* राष्ट्रीय पुरस्कार ( National Award ) ५ सप्टेंबर १९६५

विषण्ण कुढते निरंतर सचित हे अंतर
स्मृति प्रसवि तप्त ती नयनि आसवाते चिर
अबोल चिमणी हसे शकुन[1] मन्मना दे पिसे !
जगात मतिमूढ हा विजय[2] होय त्याचे कसे ? ॥१५॥

ठरे सहज कौतुकास्पद विमूढता शैशवी
मन:पटि भविष्यचित्र ठसुनी परी क्लेश वी
उदंड वच-दंड-ताडित उपेक्षितांची स्थिती
अनाथ जगतील ही ! विकळ विव्हळे मन्मती ॥१६॥

सदैव स्मृति ठेवते हृदयि जागती आग ती
सवे कुरतडू तया किततरी कळा लागती
गळे बळ, चळे विवेक, बहु इंद्रिये भागती
पहा, विवश मी ! तुला बघवते कशी मद्गती ॥१७॥

अगे ! अगत मी अशांत अगदी गदी ग्रासलो
व्यथाहत, जनी बरा वरिवरी जरी भासलो
अधीर बघ हा, अतीव कळ सोसवेना मुळी
स्वयेच मज घासुनी त्वरित दे कृपेची मुळी ॥१८॥

नकोत मज यापुढे विभव मान सत्कार ते
विशाल घट तुष्टिवीण मम जीवनाचे रिते
पुरे प्रचुर गौरवोन्नति, नको विपत्ती नवी
भवी विकलताविषातुन विमुक्ति माते हवी ॥१९॥

---

१. शकून—चतुर्थापत्य, मुलगी- वय ७ वर्षे, अवाक् व बुद्धीने मागासलेली.

२. विजय—द्वितीयापत्य, मुलगा-वय १६ वर्षे, मूढ व बुद्धीने अत्यंत मागासलेला.

अता न बळ साहण्यास पळ राहिले ताप तो
प्रचंड अनुताप–चंडकर मानसी तापतो
फुटे न रड कोरडचा सकळ जीव कंठी अडे
तृषार्त खग बापडा फडफडे पडे झापडे ॥२०॥
कृपाकुशलदे ! क्षमस्व ! पदरी अगत्ये धरी
तुला शरण मी, दयासलिल सिंचुनी उद्धरी
असा क्षण गणीत, आइ ! तव वाटुली पाहतो
तुला हृदयभक्तिन शरणपत्रिका वाहतो ॥२१॥

१३–१२–१९६५.

# दीर्घ काव्ये

## १११. बुद्धकृपा

( जाती–चंद्रकांत )

१

गौतमनगरी सुखशांतीचे पीठ जिथे लोक
प्रसन्नतेने रत निजधर्मी वसती बिनधोक ॥१॥
राहे त्या नगरीत सुखाने आर्यस्त्री एक
अवंतिका तिज रोहित लालित एकुलता लेक ॥२॥
गुंफित असता हार फुलांचे सूर्योदय काली
'अवंतिके सखि, काय चालले ?' हाक अशी आली ॥३॥
'कोण ?' पाहता माधविका मैत्रीण दिसे आली
'कशास सखये हार ?' प्रेमला ती पुसती झाली ॥४॥
अवंतिका बोलली 'गडे का हे न तुला ठावे
बुद्धदेव येणार ? तयांचे सुस्वागत व्हावे !' ॥५॥
उभय मैत्रिणी गुंफित बसल्या रम्य सुमन-गुच्छ
त्या उत्साहा तुळता अगदी स्वर्ग गमे तुच्छ ॥६॥
इकडे तिकडे पाहुन मध्ये माधविका पुसते
'बाळ कुठे गे रोहित मन तव मूर्तिमंत हसते ?' ॥७॥
माता वदली, 'फुले वेचण्या पाठविले त्याला
आणिल परडी भरुनी माझा प्राणांचा झेला' ॥८॥

विधीयोजना अगाध हर्षित मनुजाने व्हावे
तो नियतीने क्लेशजलाचे घट त्या पाजावे ॥९॥

'देवी! देवी!' शब्द कुणाचे? अवंतिका पाहे
शब्द फुटेना वदनी कंपित मनुज उभा राहे ॥१०॥

'र र रोहित, स स साप' ऐकता 'अय् या ई ह्‌।य!'
किंकाळुनिया पडे भूवरी धाडदिशी माय ॥११॥

२

बुद्ध विहारी स्वागत घेती हर्षित जनतेचे
कानी येती त्यात शब्द ते दुःखित वनितेचे ॥१२॥

'बुद्धं शरणं गच्छामि ।
बुद्धं शरणं गच्छामि ।'

'बुद्धं शरणं गच्छामि' असा करूनिया घोष
दुःखाहत जननिने ठेविले श्रीचरणी शीर्ष ॥१३॥

प्रभुपदनलिने नयनजलांनी प्रक्षालित झाली
'काय हवे तुज, माते?' करुणा कळवळुनी आली ॥१४॥

स्फुंदस्फुंदुन रडे माय भडभडून ये ऊर
आवरुन बोलली तदा ती अश्रूंचा पूर ॥१५॥

'प्रभो! काय ही दया? न्याय हा? सर्वांनी गावे
शरण येउनी प्रभूंस भावे आनंदित व्हावे! ॥१६॥

परंतु एकच होरपळावी दुर्दैवी माता
प्रियपुत्राच्या विरहाग्नीने दोष मुळी नसता! ॥१७॥

हिरावून का नेला माझा तुकडा प्राणांचा
द्या मज माझा परत आसरा प्रभो जीवनाचा ॥१८॥

मजला आणुन माझा द्या हो नेत्रांचा तारा
शोकावर्ती पडली जननी तोल सुटे सारा ॥१९॥

जडही व्हावे विचलित ऐसा विलाप करि माता
क्षणैक झाले तटस्थ वदले बुद्धदेव आता ॥२०॥

'आर्ये ! होई शांत, विचारी मनी खरे काय
क्षणभंगुर हा काय तयाचा लोभ बरा काय ?' ॥२१॥

पणनच धरवे मन जननीचे, एक तिचा घोष
'हवा मला मम रोहित !' चाले उदंड आक्रोश ॥२२॥

'थांब, ऐक मग' देव बोलले 'उपाय हा एक
माते, करशिल मिळेल तर गे परत तुझा लेक ॥२३॥

नसे कधीही मरण पावले ज्या सदनी कोणी
तेथुन निश्चय करुन मोहरी मूठभरी आणी' ॥२४॥

कृतनिश्चय तत्काळ उठे ती अबला सावेग
प्रभूस नमुनी निघे जणू सर करावया स्वर्ग ॥२५॥

३

ब्रम्ह–शिरोमणि मृत्युंजय त्या पुरी अग्रगण्य
दर्शन भाविकजनां जयाचे करी अहो धन्य ॥२६॥

सविनय तत्पावनचरणांवर लोटांगण घाली
अवंतिका त्या काकुळतीने मग पुसती झाली ॥२७॥

'घरी आपल्या कधी कुणी का विप्रवरा मेले ?'
या प्रश्नाने ब्रम्हज्ञाचे मन विचलित केले ॥२८॥

पुसता लोचन म्हणे ' खरोखर निर्दय गे काळ !
गतमासी मम नेला त्याने एकुलता बाळ ! ' ॥२९॥
डळमळले मन, पण आशेचे सुत्र तिला फिरवी
काष्ठबाहुली सम वेडीला घरोघरी शिरवी ॥३०॥
जिथेतिथे जाऊन विचारी ' मृत्यूविण काय ?'
गाव पालथे घाली अवघे आशेने माय ! ॥३१॥
एक भेटली पाणवठ्यावर सुवासिनी रमणी
पुसे ' सांग, का मरण पावले तुझ्या कुणी सदनी ? ' ॥३२॥
' होय, न झाले वर्षहि पुरते सासूते मरण्या '
ऐकुन वेडी पुढे धावली काळाते धरण्या ॥३३॥
शिवास पुजुनी परते साध्वी एक पुसे तिजला
उत्तरली ती ' परवा झाली आई वश काला ' ॥३४॥
' अवंतिके गे वेडे, कुठवर करशिल हा शोध ?'
वाटु लागले मना ; पुढे तो एक दिसे वृद्ध ॥३५॥
' का हो बाबा, गेही तुमच्या कधी कुणी मेले ?'
प्रश्न विचारी, परि तो बहिरा, ऐकु न त्या गेले ॥३६॥
' काय बोलसी तरि मोठ्याने बोल मुली ' म्हणता
पुसती झाली प्रश्न तोच ती अवंतिका वनिता ॥३७॥
' प्रश्न कसा हा वेडे ? आशा काय मनी धरली ?
झाली वर्षे तीन बायको तिसरी मम सरली ' ॥३८॥
असे बोलता वृद्ध हासुनी, अवंतिका थिजली
पुढे न धजली, आशा विझली, लज्जेने भिजली ॥३९॥

(४)

' बुद्धं शरणं गच्छामि ' असा घोष करित आता
अनुतप्ता ती माता ठेवी प्रभुचरणी माथा ॥४०॥

'प्रभो ! हरावा संभ्रम, एक न मरणाविण गेह
द्या मजही प्रभु मरण, वृथा हा बाळाविण देह !' ॥४१॥
घळघळ ओघळ नेत्रांमधुनी अश्रूंचे गळती
श्वासानलि संभ्रम तृणराशी सहज सकळ जळती ॥४२॥
बोधिसत्व गंभीर बोलती 'माते, धर शांती
स्थिर हो, चित्ती तुझ्या उजळली ज्ञानाची ज्योती' ॥४३॥
अवंतिका हो शांत, मन स्थिर ईशपदी झाले
कृपाकटाक्षे श्रीबुद्धांच्या अतर्क्य हे घडले ॥४४॥
'बाळ कोण ते रडते ?' गौतम विस्मित वर बघती
तोच पातला पौर कुणी प्रभुपदी करित विनती ॥४५॥
'प्रभो ! पोर जाहले पोरके, आपण या द्यावे
जननी मेली, जनकहि गेला, कुणाकडे न्यावे ? ॥४६॥
माता, जनिता, धनी, रक्षिता देवांविण कोण ?
निराश्रिता या निजचरणांवर द्यावे हो स्थान' ॥४७॥
दयानिधीने बाळ उचलिले धरिले निज हाती
आणि पाहिले पुढेच तेथे अवंतिका होती ॥४८॥
'घे रोहित हा तुझा' बोलुनी दिला तिला बाळ
रडे थांबले त्याचे, हसला रोहित तत्काळ ॥४९॥
गुलाब गाली, कमल मुखावर, पारिजात हाती
गोंडस राजस तोच चिमुकली लालित हृन्मूर्ती ॥५०॥
तिला लाभला स्वर्ग खरोखर, हर्षाचे भरते
हृदयी भरले, ते वर्णाया शब्द कुठे पुरते ? ॥५१॥
बाळ मिळाला मातेला, अन् बाळाला आई
बोधिसत्वपदि शरण यावया जन करती घाई ॥५२॥

१०-८-१९५७

# ११२. शकुंतला

( जाती–चंद्रकांत )

(१)

रवि अस्ताचलपथगामी तव तपोवनी मात
प्रसन्न गगनी खगगण घरट्यांप्रत असता जात ॥१॥
आश्रमबाला शकुंतला नव मदनलता होती
पुष्करणीतटि बैसुनी पाहत मनी प्रणयमूर्ती ॥२॥
हृदयातिल मृदुभाव बिंब निज नयनी जलि पाहे
स्वप्नरंजनी दंग अंग निज भावजळी गाहे ॥३॥
अनामिकेवर प्रणयमुद्रिका प्रतिबिंबित होय
ज्यात तेच हो मूर्त प्रियाचे रूप शुची तोय ॥४॥
'सखे मुद्रिके, क्षेम तिकडचे सांग' असे बोले
क्षणात लाजुन लगेच हासुन त्या स्वप्नी डोले ॥५॥
तपोनिधी दुर्वास ऋषीवर तपोवनी येती
कुणीच न दिसे आश्रमदारी न्याहाळुन बघती ॥६॥
'कोण तिथे ती ?' आश्रमबाला दिसे जरा दूर
'अवमानी का मला ? विचारी कुण्या अशी चूर ?' ॥७॥
अतिथी आलो मुली ! हे मुली !' जरी ऋषी बोले
बघे न ती ; संलग्न रंजनी मधुर जिचे डोळे ॥८॥
घोर असा अपमान ! मुनी दुर्वास मनी तापे
होउन पुच्छाहत बैसावे स्वस्थ कसे सापे ॥९॥
म्हणे 'ऐक हे प्रेमचंचले ! मनी जया ध्याशी
अव्हेरिल तुज ; विरहयातना पावशील ऐशी ॥१०॥

प्रमदे तुज विसरेल खचित, विसरेल तुझा कांत
शाप घेइ ! विसरेल सुनिश्चित पडेल त्या भ्रांत !' ॥११॥

पाय आपटित जाय मुनी तो प्रियंवदा येई
शाप घोर ऐकुनी प्रेमला चिंतातुर होई ॥१२॥

अनसूया सखि घेउन परडी सुमनांची आली
हळूच सांगे मात तियेला जी काही झाली ॥१३॥

उभय मैत्रिणी सचिंत कातर हरिणीसम दिसती
होइल कैसे ? सुचे न काही, तशाच त्या बसती ॥१४॥

व्याकुळ नीरव अस्थिर मति केवळ उठती बसती
जाणिव सखिच्या भवितव्याची वितरि मनी धास्ती ॥१५॥

मूक सखींनी धीर राखुनी दृढ निश्चय केला
शकुंतलेला कळु द्यायाचे नच या शापाला ॥१६॥

अस्त रवीचा झाला, विरल्या वृक्षांच्या छाया
सहज जाल हळुवार पसरते रजनीची माया ॥१७॥

नील नभाच्या गोल छतावर लखलखती तारे
अर्ध चांदवा विलसे वर वन शोभित हो सारे ॥१८॥

चंद्रबिंब पाण्यात दिसे ते रुचिर हृदय-रूप
शकुंतलेच्या स्वप्नी राजे प्राणसखा भूप ॥१९॥

हळू वळती उभय सहचरी होत उभ्या मागे
परंतु नाही जाग ? मनाचे मुद्रिकेत धागे ॥२०॥

'शकुंतले !' मग हळूच देई प्रियंवदा हाक
तरि स्वप्नी रत, म्हणुन खुणावी 'गडे, नयन झाक' ॥२१॥

अनसूयेने सखिनेत्रांवर झापड झणि धरली
तोच दचकली, चकली वेडी 'इश्श' म्हणुन सरली ॥२२॥
'अवचित येउन चित्तचकोरा, का करता चाळे ?'
बोलुन ऐसे स्वयेच अपुले झाकियले डोळे ॥२३॥
हसू लागल्या सख्या खदखदा, स्वप्न तदा भंगे
चूर होउनी लाजेने ती मदनलता रंगे ॥२४॥
'स्वप्न कशाचे होतिस पाहत ?' प्रियवंदा पुसते
कसे वदू ? ही प्रणयमुद्रिका गडे हसत दिसते' ॥२५॥
वदे नायिका 'सौख्य सखींनो, मनि चित्रित झाले
तेच, लोपल्या किति घटिका नच चित्ती आकळले' ॥२६॥
'गडे ! शोभशिल वैभवखाणी राजाची राणी
अशीच भुलशिल शकुंतले, हे वनातले प्राणी !' ॥२७॥
प्रियंवदेची खोच जाणुनी शकुतला वदली
'नाहक छळिता दाहकवचनानिले मृदुल कदली ॥२८॥
परंतु सांगा, प्राणपती ना म्हणेल मज माझी ?'
सखी बोलती नकोच चिंता वेडी शुभकाजी ! ॥२९॥
होशिल सुभगे, प्राणेशाच्या प्राणांची माला,
रमणी-जननी-भूषण होइल कण्वाची बाला' ॥३०॥
हास्यविनोदी दंग मैत्रिणी क्षण काही होती
रात्र जाहली, परी न होती आश्रमात ज्योती ॥३२॥

(२)

कण्वमुनी स्थिरचित्त तपस्वी उदारधी तात
तीर्थाटन करुनी परतुनि निज तपोवनी येत ॥३२॥

शिष्यांसह निज आश्रमदारी महामुनी आले
शकुंतलेने स्वागत त्यांचे मुदित मने केले ॥३३॥
'कसे काय गे वृत्त आश्रमी ?' तातांनी पुसता
'कुशल !' वदे मृदुमंजुभाषिणी नतवदना दुहिता ॥३४॥
न्याहाळित मुखचंद्र तियेचा कंप दिसे ओठी
कांति कपोली क्रांति दाखवी भ्रांति पडे मोठी ! ॥३५॥
क्षणैक होउन तटस्थ, झाकुन नेत्र, धरित ध्यान
आकळले घटनांचे अवघ्या त्यास पुरे ज्ञान ॥३६॥
बघती पुढती उभी अबोली शकुंतला वेडी
भयशंकांकित धजली नच वर बघावया थोडी ॥३७॥
ओघळ नेत्री स्वेदद्रवाची दाटी हो झाली
अधोमुखी नत सदय पित्याच्या पूत पदी झाली ॥३८॥
'अभय ! ऊठ ! कल्याण !' दयार्णव महामुनी वदती
कृतार्थ हर्षित शशिसी शोभे शकुंतला सुदती ॥३९॥
'शकुंतले ! तू माझी नच, धन परक्याचे आता
रत्न कोंदणी तशी शोभिता पतिसदनी कांता ॥४०॥
ऋषिकुमरांनो, मुनिदुहितांनो सकलाते सांगा
शकुंतलेच्या पाठवणीच्या तयारीस लागा ॥४१॥
प्रातःकाळी ताई अपुली लेण्यांनी सजवा
गोड गोड गीतांनी मन नव नवरीचे रिझवा ॥४२॥
निज हक्काच्या घरी जावया सूर्योदयसमयी
निघेल बाला सुलक्षणी ही सुभगसुवासमयी ॥४३॥
बाबांचे हे वचन ऐकता तरारले पाणी
भाग्यवतीच्या नयनी, झाली मूक तिची वाणी ॥४४॥

मुद्रिकेत अन् बोटावरच्या होय फिरुन गुंग
मुकुलावर उत्फुल्ल सारखा गुंजतसे भृंग ॥४५॥

(३)

शकुंतलेच्या पाठवणीला सिद्ध मुनी झाले
मनात चाले खळबळ झाले नयन सवे ओले ॥४६॥
शिष्य दोन तो येउनि नमुनी म्हणती 'हे देव !
ताईस्तव उधळी वनदेवी रत्नांचे पेव ॥४७॥
वृक्षवरांनी कनकभूषणे मणिमाला भारी
नवल, लतांनी ललित अंबरे दिधली जरतारी ! ॥४८॥
नवकलिकांनी हीरक-माणिक–मुक्तामणि घोस
दिले, द्यावया शृंगारांने ताईला तोष' ॥४९॥
'भाग्यवती ही पोर ! भूषणें चढवा तिज' वदले
मुनिवर ज्यांचे हृदय विषादी घोर फिरुन गढले ॥५०॥
चिवचिव चिमण्या पक्षीगणही किलबिलती रानी
वातावरणी भरली त्यांची आज करुण गाणी ॥५१॥
पर्ण फुलांवर वनदेवींनी ढाळियले आसू
तरुलतिकांचे मंगलवेळी मावळले हासू ॥५२॥
चंचल हरिणे हिरमुसलेली स्वस्थ कशी आज ?
शोकाकुल शुक मूक, पिकांचा कंपित आवाज ! ॥५३॥
उदयाचलि ये सूर्य तयाचे बिंब दिसे लाल
जणू दाविते विषण्ण त्याच्या चित्तातिल हाल ॥५४॥
बालरवीपरि शकुंतला ये सखीसवे आता
मंदपाउली तातपदांवरि वाकविते माथा ॥५५॥

उषःप्रभा जणु मूर्त शुभांगी चंपक रंगाची
तारांकित कनकांबर अंबररंग तरंगाची ॥५६॥
छटा जयावर असे लेउनी रत्नखचित लेणे
शोभवि जे सौंदर्य अलौकिक देवाचे देणे ॥५७॥
म्हणे ' तात, मी येते, द्यावा शुभ–आशीर्वाद '
मनमुकुरातिल भाव उमटवी सादी पडसाद ॥५८॥
' जा आनंदे पतिदेवाच्या घरी सुखे बाई !
हासत जाई, तोच तुझा गे मोक्ष, मुली जाई ' ॥५९॥
वदता ऐसे त्या सिद्धाचा कंठ भरुन आला
गमे घातला स्वधननिधीवर परक्याने घाला ! ॥६०॥
'वनलतिकांनो ! हरिण–शुकांनो ! तुमची ही माता
सोडुन जाते, तुम्हास भरविल कोण बरे आता ?' ॥६१॥
नीर दाटले नयनि मुनींच्या अंग लुले झाले
भूकंपाने मेरुनगाचे अंतरंग हाले ॥६२॥
'येते हुंऽ सखि प्रियंवदे, अनसुये ?' म्हणे बाला
' चाललीस ?' बोलल्या स्फुंदुनी सुकल्या वनमाला ॥६३॥
' नारद, गौतम ऋषिकुमरांनो, उभय तुम्ही आता
सांभाळुन हस्तिनापुरी न्या कण्वाची दुहिता ॥६४॥
भूपवराते वचन वदा–ही कण्वाची ठेव
राया, घे पदरात रत्न हे सांभाळुन ठेव ॥६५॥
प्रिया पतीला, शकुंतले, हो तेजस्वी माता
स्त्रीजातीचे भूषण होइल उजळ तुझा माथा ' ॥६६॥
स्थितप्रज्ञ मुनि निरोप देउन शांत उभे ठेले
सजलनयन सविनय वनितेने नमन फिरुन केले ॥६७॥

आणि निघाली पुढे प्रेमला गद्‌गदले रान
रविरायाला चढावयाचे वर नुरले भान ॥६८॥
निर्झर कलकल करती निर्भर हळहळती रडती
शोकाकुल मृगकुले वनातिल धरणीवर पडती ॥६९॥
फिरुन मुनीमन होय वेदनाव्यग्र वियोगाने
जितेंद्रिया घेरिले सहज मायेच्या भोगाने ! ॥७०॥
सद्‌गद होउनि उभय मैत्रिणी पुशिती निज डोळे
आठवुनी तो शाप तयांच्या चिंता मनि घोळे ! ॥७१॥

(४)

कुरुवंशाचा मुकुटमणी दुष्यंत धराधार
सिंहासनि आरूढ तयाचा भरला दरबार ॥७२॥
सेवक सांगे 'ऋषिजन कोणी भेटाया येती'
'आणा त्यां' नृपराज अनुज्ञा भृत्यांते देती ॥७३॥
ऋषिकुमरांसह शकुंतला त्या दरबारी आली
महातरूंच्या राईमध्ये नाजुक फुलवेली ॥७४॥
सिंहांच्या गोटात जणू हरिणी शिरता भ्याली
बघवेना वर, लज्जित झाली ती बघती खाली ॥७५॥
आश्रमवासी विनम्र पुढती गौतम तो वदला
'तपोनिधी मुनि कण्व तयांची शकुंतला बाला ॥७६॥
परिणीता ही राणी तुमची पाठविली त्यांनी
स्वीकारावी ठेव, भूपते ! भाग्याची खाणी' ॥७७॥
राजा दचकुन वदे अचानक 'पाठविली कण्वे ?
शकुंतला ! ही कोण ? कोठली ? मजला नच ठावे !' ॥७८॥
असे ऐकता स्तंभित मुनिसुत, शब्द न ये ओठी
शकुंतला मनि कचली, मचली कटु गजबज पोटी ! ॥७९॥

सावरून मन धीट म्हणे ' मी अर्धांगी अपुली
कण्वकुमारी, काय विसरला? स्मृति नाथा लपली ?' ॥८०॥
क्षणैक राजा गोंधळला ' हे लचांड ये कुठले ?
आगंतुक ही कोण ? कळेना !' काहुर मनि उठले ॥८१॥
कठोर बोले ' वेडे, नाते कसे तुझे माझे ?
पती वदाया परा नराते सती न का लाजे ?' ॥८२॥
म्हणे सुंदरी त्वेषे ' कोणी दिली अहो मुद्रा ?'
' दाव ' वदे तो ; बघे मुद्रिका दावाया भद्रा ॥८३॥
अनामिकेवर नसे, नसे पदरात , नसे कोठे
प्रणयलक्षणा हाय, गळाली कुठे तरी वाटे ! ॥८४॥
हृदयावर खर वज्र कोसळे नभ फाटे वाटे
गिळुनि घ्याया पोटी धरती का न इथे फाटे ? ॥८५॥
शुद्ध गळाली, पडता पडता सावरला धीर
त्वेषाने नव जागा झाला तीमधला वीर ॥८६॥
घाव पडे हृदयास कशी ती साहे सिंहीण ?
स्वबलिची बाला चपला होय कशी दीन ? ॥८७॥
' हे राजन् गर्वांध !' खवळली कडाडली बिजली
तेज पाहुनी सर्व मंडळी दरबारी थिजली ॥८८॥
' सिंहासन पर पदस्थ नरवर ! अभिमाने फुगला
मधुरशर्करायुत वचनाते बोलुनिया भुलला ! ॥८९॥
गरिबाघरची पोर तुम्हा का खेळ मुळी गमली ?
केवळ वैभवमदे नृपाळा मति तुमची भ्रमली ! ॥९०॥
कुठे कीर्ति ? अन् कुठे वचन ते, प्रेम कुठे गेले ?
अधमाहुनिही अधम लोकपा कृत्य तुम्ही केले !' ॥९१॥

'कलंकिते ! प्रमदे निर्लज्जे ! वचन वच न मत्त
स्वये नीघ वा भृत्य काढितिल धरुन तुझा हात ' ॥१२॥

तप्त वदे दुष्यंत 'विप्र हो ! कण्व मुनिस सांगा
भ्रष्ट योषिते आश्रमात निज तुम्हीच द्या जागा !' ॥१३॥

हाय ! निराशा व्याप्तचित्त ती हतभागी नारी
फिरली वदली 'जात्ये, साक्षी राजसभा सारी ॥१४॥

परी न जाइल शीलवतीचा ताप कधी वाया !
सुखी असा ! ही अशी निघाले निराश्रिता, राया !' ॥१५॥

(५)

दुर्वासाच्या शापबलाने संभ्रम हा आला
दुष्यंता विस्मरण घडाया कारक तो झाला ॥१६॥

नसे पित्याची नसे पतीची शकुंतला आता
वनी निघाली जिकडे दिसली वाट पुढे जाता ॥१७॥

त्यक्ता वनिता वनी एकली गर्भवती माता
मूक मनाने मार्ग आक्रमी देव तिचा त्राता ॥१८॥

अघटित घटना परमेशाची जाणावी कोणी ?
वणवण फिरते दुष्यंताची शकुंतला राणी ! ॥१९॥

२०-११-१९५७

# ११३. आहुती

( जाती–चंद्रकांत )

(१)

असीम आनंदात असे हे आज अहो चूर
जिवंत चैतन्याचे आगर दिसे उदेपूर ॥१॥
चंद्रमहाली असे चालली धामधूम भारी
कुणी बांधिते तोरण लावी खांब कुणी दारी ॥२॥
चित्रविचित्रे चित्रे कोणी भिंतीवर लावी
कुणि गुणगुणते गान कुणी त्या हळूच ओ लावी ॥३॥
लगबग दासी दास गुंफिती मोत्यांचे हार
आज मंदिरी नवपरिणीता राणी येणार ॥४॥
रत्नमंडितासने मांडती नेटकीच छान
मधेच घेती चाहुल फिरुनी गुणगुणती गान ॥५॥
सावरती निज वसने, वदने आनंदे फुलली
पुलकित झाले अंग ऐकता वार्ता जो कळली ॥६॥
ललकाऱ्याने 'सावधान' ही दिधली ललकारी
सहित–नवोढा–वधू पातली सरदारी स्वारी ॥७॥
चूडावत सरदार विशीतिल ऐन युवक वीर
चंद्रमहालाधीश जयाचे ताठ सदा शीर ॥८॥
पाणिगृहीता वरुनी आणी निजगेही राणी
स्वागतरत परिचारक पुढती होउन वाखाणी ॥९॥

शुभमंगलमय मृदुल फुलांचा करुनी वर्षाव
सुवासिनी त्या मिषे उधळती हृदयातिल भाव ॥१०॥
कुलदेवी चंडिके ! कृपेने तुझ्याच गे आज
मूर्तिमंत पद्मजा पातली धरुन वधूसाज ॥११॥
चंडीपुढती युगुल नवे ते नतमस्तक ठेले
कृपाविलोकन दान भासले देवीने केले ॥१२॥
नवयुग हर्षित पुलकांकित अंबिका प्रसादाने
आसनस्थ हो, भवन निनादित मंगल नादाने ॥१३॥
उपायने घेऊन जनांची रीघ उभी दारी
अर्पायाते येती त्यातिल एक एक सारी ॥१४॥
कुणी आणिली मंदिल–साडी भगे जरीदार
काचोळी परिवसने कोणी शालींचे भार ॥१५॥
कुणी हिऱ्यामोत्यांच्या माळा, कुणी रत्नहार
कुणी कंकणे, कर्णफुले अन् कोणी तरवार ॥१६॥
दरबाराचा खास दूत ये द्याया नजराणा
सादर वदला ‘ सरदारांते आठविती राणा ॥१७॥
व्याकुळ चिंता राणाजींना करी एक भारी
सत्वर यावे, वाट पाहते दरबारी स्वारी ’ ॥१८॥
‘ काय ? असा आलोच !’ वदोनी उठे म्हणे ‘ देवी,
जाऊ ना मी ? अणु न अवज्ञा स्वामीची व्हावी ॥१९॥
परंतु चिंता नकोच, येतो जाउनिया वेगे ’
असे ऐकता वीर–बालिका वदली अनुरागे ॥२०॥

‘ अवश्य जा हो, पण दासीचे स्मरण मनी ठेवा ;
अंबे ! ठेवी कुशल सतत मम मोलाचा ठेवा !’ ॥२१॥
राजभक्त नवयुवा प्रतापी निघालाच वीर
स्वामिकार्यरत सज्ज, घेउनी तळहाती शीर ॥२२॥

(२)

भारतगौरव शिसोदियांचे ठाण उदेपूर
मोगलशाही शिणली करण्या जाळुन ज्या धूर ॥२३॥
महाराज नरवीर आसनी राजसिंह तेथ
चिंतेने आक्रांत सुचेना काय करू बेत ?’ ॥२४॥
तो दूताचे वचन ऐकले ‘ चूडावत आले ’
राणाजींच्या मुखचंद्राचे तेज तदा खुलले ॥२५॥
प्रणाम करता, उत्थापन त्या देउनिया राणा
बैसविती आसनी वानिती करिती बहुमाना ॥२६॥
‘ आधि कळावे विकळ कोणती चिंता करि देवा
खचित वेचुनी प्राणहि साधिन रायाची सेवा ’ ॥२७॥
सादर चूडावत वदता हे राणाजी म्हणती
‘ कळे न का हे मोगल ऐसे व्यर्थ कलह खणती ? ॥२८॥
दिल्लीपति औरंगजेब–गज धुंद मदे झाला
बळे कमलिनी बुंदीतनया हरावया आला ॥२९॥
वीरमृगेंद्रा, त्या रगडाया गरज तुझी आज
शक्त तूच, नच अन्य, तयाचा जिरवाया माज ॥३०॥

लाज लुटाया वीरकुलाची धजे अधम मेंढ
स्वये जायचे तुलाच त्याची काढाया धिंड ॥३१॥
आर्त देतसे रूपनगरची चारुमती हाक
विलंब करिता गळेल अमुच्या शौर्याचे नाक !' ॥३२॥
बाहु स्फुरले, डोळे चढले, ऐकुनिया बोल
भरले वीरश्रीचे वारे सर्वांगी खोल ॥३३॥
मूठ वळाली, छाती फुगली, वळवळले हात
' असाच निघतो औरंग्याचे पाडाया दात ! ॥३४॥
रजपूतांनो ! उठा ! सज्ज व्हा कूच करायास !
प्रमाण आज्ञा !'असेच वदला वीर विनायास ॥३५॥
' वीर–वरा ! शाबास ! तुझा या मेवाडा गर्व
खात्री मज तू सतिकार्याचे साधशील पर्व ' ॥३६॥
राणाजी वदताच मंडली तेज नवे शिरले
' एकलिंगजी की जय !' ऐशा नभ नादे भरले ॥३७॥

( ३ )

चंद्रमहाली प्रियनाथाची मंजुमुखी वाट
बघते, हृदयी तिच्या उसळती भाव विविध दाट ॥३८॥
षोडषवर्षा बाला आली वधू घरी आज
हळदी भरले अंग तयावर लग्नाचा साज ॥३९॥
बोलाया नच एक मिळाला प्रीतीचा बोल
तो चिंतेचे काहुर चित्ती वादळले खोल ॥४०॥
स्वाभाविक हे, अस्थिर झाले मन, तेव्हा अरुणा
भाकु लागली अनन्यभावे अंबेची करुणा ॥४१॥

'माझें पतिधन राख सुरक्षित ! हेच शिवे देई
सकल विकलता-विष, जगदंबे, विलयाते नेई !' ॥४२॥
तोच मागुनी येउन कोणी झाकियले डोळे
भानावर येऊन कामिनी 'इश्श !' असे बोले ॥४३॥
'नाथ, काय हे असले ?' म्हणुनी बाजूला सरली
स्पर्शाने नव विद्युल्लहरी वीरांगी भरली ॥४४॥
ओठांची हो थरथर, झाले गाल लालबुंद
रतीरूप मति सहज करी स्मरवीराची धुंद ॥४५॥
रणमर्दाचा दरबारातिल जिरला आवेश
भुहळ घालिती विलासिनीचे कृष्ण कुरळ केश ॥४६॥
म्हणे 'हाच गे निश्चय, नाही कुठेच जाणार !
चंचल चपले ! अशीच मजला रात्रंदिन भार' ॥४७॥
पुसे चंचला 'कुठे, कशाला आहे जायाचे ?'
वदे वीर 'गे कार्य निघाले आजच रायाचे ॥४८॥
म्हणे, आजच्या आज निघावे लढण्या मुगलांशी
परंतु नच जाईल मिळो बहु वैभव धनराशी ॥४९॥
रूपनगरची सती संकटी रक्षाया जाऊ
अन् नवनवरी माझी येथे एकटीच ठेवू ?' ॥५०॥
असे ऐकता त्या ललितेची पालटली चर्या
चंचलता ही चंड चंडिका मूर्तिमंत धैर्या ॥५१॥
'वीरत्वाते त्यजुनी नाथा वदता हे काय ?
योग्य, विलासी नच, पडण्या हा रणांगणी काय ! ॥५२॥
सतीरक्षणी वीरवराने वारावे प्राण
कर्तव्यास्तव लढता मरणे वीराची शान' ॥५३॥

'परी सुंदरी वधूटिके मी सोडू कसे तुजला ?'
ऐकुन बोले कणखर वाणी ती सबला अबला ॥५४॥
'नको फुलांची शेज, हवे यश वीराचे मजला
धिक् धिक् तुमचा बाणा नारीमोहाने थिजला ! ॥५५॥
काय कंकणे भरता ? की हो घेता तरवार ?
घ्या ही, सांडा ब्रीदरक्षणी रुधिराची धार' ॥५६॥
सरदाराच्या तोंडावरचे पार पळे पाणी
दरदरुनी ये घाम, तयाची पडे लुळी वाणी ॥५७॥
शस्त्र धराया हात धजेना तदा धीर दार
स्वयेच बांधी कटिभागावर त्याच्या तरवार ॥५८॥
'रजपूताची हीच खरोखर चिर सांगातीण'
वदे 'वरा ही वीरा वाया जिणे हिच्याविण' ॥५९॥
लावुनि कुंकुमतिलक सुमंगल नाथाच्या माथा
म्हणे 'निघा हो निरोप देते वधू स्वये आता ॥६०॥
ऐका ! भेरी, शंख, तुतारी निनादती भारी
रणरोषाने धुंद जाहली उदेपुरी सारी ॥६१॥
त्वेषाने रजपूत निघाले मारित ललकारी
निघा त्वरेने कीर्ति वराया डौलाने समरी' ॥६२॥
प्रिय वनितेच्या वचने वळली वीराची वृत्ती
'ठीक, चालतो राखायाते तुझी प्रिये प्रीती' ॥६३॥
असे बोलुनी झणी निघाला चूडावत राय
निरोप द्याया द्वारी राणी हर्षभरे जाय ॥६४॥
स्वयेच कर्तव्याच्या पात्री देइ चुडा दान
धन्य, धन्य ! ती स्त्रीजातीचा ललना अभिमान ॥६५॥

' दयावती भगवती अंबिके ! प्रणत तुझी बाला
तुझ्या कृपेने पतिदेवांना वरो यशोमाला ॥६६॥
पराक्रमाने परम पतींच्या खलबल हो क्षीण
राख सतीची लाज, तुझ्याविण तिज तारिल कोण ? '॥६७॥
प्रार्थित ऐसे असता हाडावंशलता राणी
' दूत पातला ' असे सेविका वर्तमान आणी ॥६८॥
म्हणे ' येउ दे, ' सुस्मितवदनी उत्कंठित पाहे
तोच देखिला दूत वंदनी रत पुढती आहे ॥६९॥
' सरदारांनी पत्र दिले हे देवींना द्याया '
दूते वदता सुलक्षणी ते घेई वाचाया ॥७०॥
चर्येवरती भाव बदलती क्षणोक्षणी भिन्न
क्षणैक झाली वीरनायिका वाचुनिया सुन्न ॥७१॥
दूत बोलला ' आणिक दिधली त्यांनी तरवार
की देवींच्या स्पर्शे व्हावी तेज तिची धार ' ॥७२॥
फिरुन वाचते ' प्रेमदेवते ! शक्ती मम तूच
तुलाच भरुनी नेत्री केले मी समरी कूच ॥७३॥
समशेरीला स्पर्शाने निज भारुन पाठीव
कदन-खली खलण्या खल ओतिव जिवात जी जीव ॥७४॥
सवेच पाठव कुशलसूचिका तुझी गडे खूण
जवळी असता जी शौर्याचे मुळि न पडे न्यून ' ॥७५॥

'हाय नशीबा ! मोह कसा हा ? आइ करू काय ?
स्त्रीमोहाने नरवीराचे अडखळती पाय ! ॥७६॥
धिक् धिक् यौवन ! रूप जळो हे, गळो असा देह
शौर्यघातकी अधम विषाचे जे नुसते गेह ॥७७॥
जगदंबे ! दे साहस !' कांता कळवळुनी वदली
अकालवातावर्तप्रलयी सापडली कदली ॥७८॥
तोल सावरुन नंतर उठली निर्धारे नटली
'अवश्य देते खूण !' निश्चये उठता पुटपुटली ॥७९॥
'दूता, दे तरवार धार मी तीक्ष्ण करुन देते,
अन् प्रीतीचे चिन्ह रम्य, ने रणी त्वरेने ते' ॥८०॥
आणि धावली अंतःसदनी वधू व्रती रमली
दिव्य कराया निज सत्वाचे वैदेही गमली ॥८१॥
गजबजला मनि दूत, तोच हो धाड असा नाद
वीज चमकुनी देती झाली कडाडसा साद ॥८२॥
सुन्न ! फाटले कान, आटले डोळयांचे त्राण
क्षण काही मन मूढ, तयाचे हारपले भान ॥८३॥
किंकाळीची धार तीव्र तो चिरावया चेत
उठता त्याचे सचेत हो निश्चेत उभे प्रेत ॥८४॥
कानी पडले शब्द कापरे 'घे रे तरवार
राणीने निज रुधिरे केली प्रखर जिची धार' ॥८५॥
आणि सेविका धावत गेली, चर्र मनी झाले
आकळता घटना दूताचे हृदय भरुन आले ॥८६॥

दासी फिरुनी येउन वदते 'देवीची खूण
दूता, घे ही' म्हणता आले तिला भडभडून ॥८७॥
कपाळदेशा पिटी बिचारा हळहळला दूत
घेता ते हातात तबक तै थरारले चित्त ॥८८॥
बोले दासी 'निज हाताने देवीने ताटी
तरवारीने याच उतरले शीर पतीसाठी ॥८९॥
सांगितले अन् रणमैदानी भेट झणी न्यावी
की पतिदेवा कीर्तीनवरी समरी वश व्हावी!' ॥९०॥
प्रमाण तो आदेश वंदुनी रंजित तरवार
आणि घेउनी निघे दूत तो रम्य उपाहार ॥९१॥

(५)

घोर समर हो यवनदळाचा बळावला जोर
काळमेघवेष्टणी गवसली चारु चंद्रकोर ॥९२॥
रणांगणी झुंजार पहुडले राजपूत वीर
चूडावत दिङ्मूढ, हाय! परि पाहे भिरभीर ॥९३॥
नवकांतेच्या कांतीचे चिंतन मनि दे भ्रांती
तेच आज अज करी केसरी समराच्या प्रांती ॥९४॥
तोच भंगले स्वप्न अचानक दूत पुढे ठेला
वंदुनिया स्वामीस आदरे बोलतसे बोला ॥९५॥
'सतीस्पर्शने परम पुनीता घ्यावी तरवार'
काळजात हो धस्स बघुन ती रक्तांकित धार ॥९६॥

'रक्त कशाचे ?' पुसे वीर परि उत्तर नच काही
मौन करी ते सरदाराच्या हृदयाची लाही ॥९७॥

'बोल, उगा का ? काय वधूने खूण दिली सांग ?'
पुसता वीरे त्या दूताचे थरथरले अंग ॥९८॥

तो थरथरत्या करी दाखवी मग करुनी धीर
वीर उताविळ पहावया तै ओढियले चीर

अंबर फाटे, फुटे धरा वा सुटे प्रलयवात
पाहताच ते शिर रमणीचे होय तशी मात ॥१००॥

भोवळ आली डोळ्यांवरती हादरले ऊर
नयनांमधुनी आणि लोटला पूर महापूर ॥१०१॥

'काय तुवा केलेस ?' म्हणोनी शोक करी वीर
किती वाहिले तिला सगद्गद नयनांतिल नीर ॥१०२॥

ओसरता आवेग गळाला मोह, नवा जोम
संचरला अंगात सळसळे जणू रोम रोम ॥१०३॥

हुतरमणीच्या रुधिराचा तो टिळा शिरी लावी
तीच दिव्य तरवार घेउनी नवल नवे दावी ॥१०४॥

होय रुद्रसंचार, गाजला कुमार की समरी
फुले वर्षिली स्वर्गामधुनी त्यावरती अमरी ॥१०५॥

त्या तेजाने निष्प्रभ झाला लाजुनिया सविता
तेच तेज दे स्फूर्ति कवीला रचावया कविता ॥१०६॥

२९-११-१९५९

**समाप्त**

१६९६८
४८० ९००
२।३।६८ (१६२)

# शुध्दिपत्र

| पृष्ठ | कडवे । ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| १२ | १ । २ | वद्धी | वृद्धी |
| | २ । २ | राष्ट्रेक्य | राष्ट्रैक्य |
| १५ | ३ । २ | अधउपाशी | अर्धउपाशी |
| १६ | १ । ८ | जा अपुल्या | जा पळ अपुल्या |
| २८ | २ । १ | स्वातंत्र्याचा | स्वातंत्र्याच्या |
| ३० | १ । ४ | इग्रजा | इंग्रजा |
| ३१ | १ । ३ | हक्क | हक्का |
| | २ । ४ | स्वातत्र्यवृक्ष | स्वातंत्र्यवृक्ष |
| ३२ | २ । १ | आज्ञानाच्या | अज्ञानाच्या |
| ३४ | ध्रु । २ | क्रोराळले | कोसळले |
| | १ । ४ | फाडले | फाटले |
| ३५ | ५ । ४ | मन्मती | सन्मती |
| ३९ | १ । ५ | जागा | जगा |
| | ३ । ४ | दनेला | दैनेला |
| ४४ | ६ । २ | आज्ञानाचे | अज्ञानाचे |
| ४८ | ४ । शेवटची | मजने | मजेने |
| ६१ | २ । ६ | चितिचे | चितेचे |
| ७४ | १ । ४ | अनलास | अनिलास |
| ८० | ४ थी ओळ | स्पंदन | स्यंदन |
| ९० | १ । ९ | मजदीपक | मज दीपक |
| | २ । ५ | दोलो | दोली |
| ९४ | ३ । ४ | दिप | दीप |
| १०५ | १ । १ | ज्ययाची | ज्याची |
| १११ | ७ । १ | कुशाल | कुशल |
| ११५ | ३ । ३ | स्वतंत्रेच्या | स्वतंत्रतेच्या |
| १२१ | ५ । १ | नापक | नापाक |
| १२२ | ८ । ४ | ससाड | सताड |

| पृष्ठ | कडवे । ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| १२९ | ६ । १ | अभके | अर्भके |
| १३६ | ५ । १ | लंघीला | लंघिला |
| ,, | ६ । १ | कितीक | कितिक |
| १३९ | २१ । २ | हृदयभक्तिन | हृदयभक्तिने |
| १४६ | २० । १ | हळू | हळूच |
| १४८ | ३६ । २ | त्यास | त्यांस |
| १५२ | ८५ । २ | घ्याया | घ्यावया |
| १५३ | ९५ । २ | निंघाले | निघाले |
| १५८ | ५१ । २ | ही | हो |
| १६० | ७४ । २ | ओतिव | ओतिल |

आमचे नवीन प्रकाशन :

REFBK-0016977

अस्सल व्हाडी कादंबरी

# भंडारवाडी

लेखक :
बाजीराव पाटील

[ किंमत ४ रुपये ]

सेवा प्रकाशन, अमरावती - २.

# सेवा प्रकाशनाची वाचनीय पुस्तके

**कथा**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | कानचिरी | भाऊ मांडवकर | ३.०० |
| २. | शेवटची पेंडी | क. वं. तोडसाम | ०.६० |
| ३. | निर्मलराणी | न. रा. निमजे | १.०० |

**कविता**

| | | | |
|---|---|---|---|
| ४. | पानोळख्या | भाऊ मांडवकर | २.५० |
| ५. | आहुती | पं. वि. हुलके | ३.५० |
| ६. | सृजन | वसंत गिरटकर | २.८० |

**कादंबरी**

| | | | |
|---|---|---|---|
| ७. | विद्वान सोबती की कुशल गृहिणी ? | बा. सं. गडकरी | ३.०० |
| ८. | काय गुन्हा केला ? | भाऊ मांडवकर | ४.०० |
| ९. | माझी चाळीस भावंडं | भाऊ मांडवकर | ५.०० |
| १०. | वंचना | ,, | ३.५० |

**चरित्र**

| | | | |
|---|---|---|---|
| ११. | मृत्युंजय मार्कंडेय | साहित्यभूषण तु. ना. काटकर | १.०० |
| १२. | मराठीचे आद्यकवी मुकुंदराज | ,, | १.०० |

**विविध**

| | | | |
|---|---|---|---|
| १३. | कोलाम (प्रबंध) | भाऊ मांडवकर | २०.०० |
| १४. | गळती कुचंबणा (शैक्षणिक लेख) | भाऊ मांडवकर | २.०० |
| १५. | शुद्ध कसे लिहावे ? | प्रा. श्री. व सौ. मांडवकर | ०.५० |
| १६. | दक्षिणदर्शन ( प्रवासवर्णन ) | भाऊ मांडवकर | ४.०० |